९ एप्रिल १९७७
पंचाहत्तर पैसे

# माणूस


‘ सह्याद्री ’चे ज्यांच्याशी जमत नाही,
ते राजकीय दृष्ट्या अल्पायुषी ठरतात,
असा प्रवाद असल्याने
नाईकसाहेब ‘ वर्षा ’निवासीच होते.

* * *

आमदार निवासातील ‘ ॲटॅक ॲंड डिफेन्स ’

* * *

मुक्काम मुंबई
पृष्ठ.....२



# साप्ताहिक माणूस

वर्ष सोळा–अंक पंचेचाळीसावा

९ एप्रिल १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

□

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

□

दूरध्वनी : ४३४५९

□


## मुक्काम दिल्ली

# मूल्यसंघर्ष आणि सत्तासंघर्ष

रत्नाकर महाजन

राजधानीच्या राजकीय मंचावरील चालू नाटकाचा दुसरा अंक गेल्या आठवड्यात सुरू झाला व संपला. सस्पेन्स या अंकात भरपूर होता. मोरारजींनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली आणि बाबूजींच्या घराच्या आवारात हलचल सुरू झाली. शपथ घेतल्याला चोवीस तास व्हायच्या आत कृष्ण मेनन रस्त्यावरील या घराच्या आवारात जनता पार्टी मुर्दाबादच्या घोषणा झाल्या. बाबूजींचे सुमारे ३००-४०० पाठीराखे जमले आणि घोषणा सुरू झाल्या. 'जनता किसको जानती है–बाबूजीको', 'जनता किसको चाहती है–बाबूजीको', 'हमने वोट किसको दिया–बाबूजीको.' फाटके मळके कपडे घातलेल्या पन्नाशीच्या दरम्यानच्या प्रौढांबरोबरच अपटुडेट पँट-शर्ट घातलेले, भाषणबाजीत तरबेज असलेले तरुणही होते. घूंघट घेतलेल्या बायका होत्या. ही सगळी दलित मंडळी होती. लागोपाठ तीन दिवस अशी सारखी गर्दी असायची. दिवसाच्या कोणत्याही क्षणी जा, किमान तीनेकशे लोक तिथे दिसणारच. मागणी एकच–जनता पक्षाच्या संसदीय नेत्याच्या पदासाठी म्हणजेच पंतप्रधानपदासाठी निवडणूक न घेता दोन माणसांनी आपली निवड जाहीर करायची व ते सर्वांनी मानायचे हे लोकशाहीविरोधी आहे. म्हणून पुन्हा ही निवडणूक झाली पाहिजे! नेतेपदाच्या प्रश्नावर कॉन्सेन्सस निर्माण करण्यासाठी गांधी पीस फाउंडेशनच्या सभागृहात भरलेल्या सभेतून मधूनच उठून गेलेल्या बाबूजींना हा पॉवर शो आवश्यक वाटत असला पाहिजे. जॉर्ज फर्नांडिस, मधु लिमये, राजनारायण आदी मंडळी बाबूजींचा रुसवा घालविण्यासाठी धावपळ करीत आहेत. बरोबर चंद्रशेखरही आहेत.

हे सगळे चालू असतानाचाच एक प्रसंग. दुपारी ४ ची वेळ. सुमारे ३०० बाबूजी-समर्थक जमले आहेत–त्यांच्या घराच्या आवारात. बाबूजी घरात. लोकांनी घोषणा सुरू केल्या. दहा एक मिनिटे घोषणा दिल्यावर इतस्ततः पांगलेले लोकही एकत्र आले आणि 'सभा' तयार झाली. मध्यभागी एकजण उभा राहिला आणि भाषण सुरू केले. नेता निवडीचा तरिका अप्रजातांत्रिक आहे. या लोकशाहीविरोधापायी तर काँग्रेस बुडाली. आपण याविरुद्ध लढले पाहिजे. वगैरे. भाषणाच्या शेवटी त्याने 'जनतेस' आवाहन केले, याचा जाब विचारण्यासाठी मोरारजींच्या घरी मोर्चाने चलण्याचे आवाहन केले. त्याप्रमाणे मोर्चा तिकडे जाऊ लागला. कोणीतरी घाईघाईने आत जाऊन बाबूजींना सांगितले. बाबूजींनी सर्वांना थांबविले. स्वतः बाहेर आले. पाच मिनिटे बोलले.

पृष्ठ २४ वर

## मुक्काम मुंबई

# काँग्रेसची ' अर्धी चड्डी '

### रघुवीर मुळे

काँग्रेस पराभवाची मीमांसा (सवयीप्रमाणे) विद्यार्थ्यांना समजून सांगावी, उदाहरण देऊन पटवावे या थाटात पेशाने शिक्षकच असलेले आमदार जनुभाऊ आहेर (कळवण) या शब्दात सांगत होते. ' आता बघा मुळे, एक गंमत सांगतो.'–

एका गृहस्थाने एक चड्डी शिवून आणली. घरी येऊन त्याने ती घालून पाहिली तर सहा इंच पायाखाली. त्याने पत्नीला बोलावले. सांगितले, ' हे बघ, मी आंघोळ करून येतो तोवर हा जादा सहा इंचाचा भाग कापून टाक व शिवून ठेव.' बायको फणकाऱ्याने म्हणाली, ' मला काय तेवढाच उद्योग आहे का ? अजून स्वयंपाकपाणी व्हायचंय. तुम्ही ताईला ( मुलीला ) सांगा.' बिचारा अडचणीत. मुलीला काम सांगितलं तर उत्तर तसेच– ' माझी कॉलेजची वेळ झालीय. तुम्ही भैय्याला (भावाला) सांगा.' भैय्याने त्याच्या शाळेची सबब पुढे केली अन् पँट सहा इंच कापण्याचे नाकारले. शेवटी हे काही जमायचं नाही असं समजून गृहस्थ आंघोळीला निघून गेले. धाकट्या मुलानं पँट घेतली. घाईघाईनं शिंप्याकडे जाऊन त्याने सहा इंच कापून आणली. काही वेळानं भैय्याच्या लक्षात आलं– आपली फी आज बाबांनी दिलीय तेव्हा त्यांचं काम आपण उगाचच नाकारलं. म्हणून त्यानं पँट घेतली, कात्री घेतली अन् सहा इंच कापून – शिवून ठेवून दिली व तो शाळेत निघून गेला. आता उपरतीची साथ सुरू झाली. ताईही कालच कॉलेज ट्रीप एंजॉय करून आली होती. केवळ बाबांनी पैसे दिलेत म्हणूनच आपण जाऊ शकलो असं वाटून. तिनंही सहा इंच पँट कापून खुंटाळ्यावर ठेवून दिली अन् ती कॉलेजला निघून गेली. आता आईची पाळी. " हे दिवसभर एवढे राबराब राबतात अन् त्यांनी मेलं एक काम सांगितलं अन् ते आपण टाळलं. हे काही बरं नाही ', असा विचार करून त्या बाईनंही सहा इंच पँट कापली. परिणाम काय झाला ? घरच्या कर्त्या माणसाच्या पदरात या सगळ्या कुटुंबियांच्या सेवेचं फळ पडलं. ते चड्डी अर्धी होण्यात. मुख्यमंत्र्यांची स्थिती आजची तशीच झालेली आहे. ' कापलं ' तरी रागावणं कठीण झालंय्.

¤

**संध्याछाया**

कॅम्प्स् कॉर्नर ! ग्रँड पाराडी ! ! माजी मुख्यमंत्री आणि आजी खासदार वसंतराव नाईकांचे निवासस्थान. दरवाजाशी ( पेंढा भरलेले अस्वल ) येणाऱ्या प्रत्येकाला एका पंज्यात काठी (वय झाल्यामुळे आधारासाठी की सत्तेचे प्रतीक ?) धरून दुसऱ्या 'हाताने' सलाम करीत आहे. (पाडगावकरांचे ऐकलेले दिसते.)

आत हरिभाऊ वर्तकांसह काही आमदारांचा ताफा. नावे कशाला सांगायला हवीत ? नासिकहून ' गायकवाड ' (थॉम्सन् सीडलेसची करंडी घेऊन) आल्येत. आमदार 'नाईक' आल्येत का ? केव्हा गेल्येत याची चौकशी कुणीतरी करतोय. बाहेर टॅक्सीतून लांब पागोटे, शनी ग्रहाच्या वर्तुळांसहित भासमान होणारे असे ल्यायलेले ' चारण ' पुढारी लगबगीने उतरताहेत. ' आव्हाड ' मात्र कुठे दिसत नाहीत. काँग्रेस सर्व जातीजमातींची आहे. वसंतराव नाईक काँग्रेसचे मान्यवर नेते आहेत. आनंद आहे.

' वत्सलाताईंचा साहेबांना आंघोळ करून घेण्याचा आग्रह.

' ' काहो, नाईकसाहेबांनी अजून विधानसभेचा राजीनामा दिलेला नाही म्हणजे साहेब पुनः मुख्यमंत्री होणार तर. तुमचं अभिनंदन हं. ' मी ( अहं नव्हे ! ).

' च्यायला, खूप वार्ताहरे वा ! साहेब आता खाली येत नाहीत.'

' मग राजी... '.

' तीच तर स्ट्रॅटेजीय् '

' कशी काय ? '

' आत्ताच जर सांगितलं मला मुख्यमंत्रीपदात इंट्रेस्ट नाई तर शंकररावांच्या विरोधाची धार कमी नाही का होणार ? मुव्हमेंटमधली हवा निघून जायला नको. जोरात वारं पायजे.'

माझ्या डोळ्यापुढचं अस्वल आता शंकरराव चव्हाणांना गुदगुल्या करायला लागलंय्. ( असं वाटतं. )

¤

३१ मार्च ७७. गुरुवार. सकाळची वेळ.

' तुम्हाला काही कळलं कां ?

' कळलं ना ! '

' सेनगुप्ता गडगडले, संजय गांधींनी राजीनामा दिला.'

माझ्या बावळटपणावर हास्याचा गडगडाट. आमदार निवासाच्या भिंतीच जणू हसताहेत. मी मख्ख.

' अहो, शास्त्री सकाळच्या ६·२३ च्या फ्लाईटनं गेल्येत. सोबत (नाईक) साहेबही.'

' चांगली गोष्टय्. '

' आता शंकररावला ( एकदम अरेतुरेच्या भाषेत म्हणजेच दोस्तीच्या नात्यानं? ) जायलाही वेळ नाही. '

' ते दुसऱ्या फ्लाईटनं जातील.'

पुन्हा गडगडाट. ' नाही हो. घरी.'

' ते कसं ? '

' साहेब म्हणाले, ( शास्त्री ) खानदानी बापाचा खानदानी बेटाय्. '

¤

तीच गुरुवारची सायंकाळ.

'इरॉस' थिएटर आणि. चर्चगेट रेल्वे-स्थानकाचा गजबजलेला परिसर.

करमेना आणि महत्त्वाच्या आमदारांपैकी कोणीही भेटेना म्हणून फिरायला बाहेर पडलो होतो.

राजकमल कलामंदिरच्या जनरेटरसहित गाड्या एरॉससमोर शूटिंगसाठी आवश्यक असे प्रखर प्रकाशझोत घेऊन उभ्या. लोक नेहमीप्रमाणे गर्दी करून कुतूहलाने चौकशी करीत, तर 'चल यार; क्या हेमामालिनी आनेवाली और तेरेसे शादी करनेवाली है. लोकल छुटेगी अपनी,' असा कुणाचा तरी कुणाला हिसका. समोर 'चानी'चे आकर्षक फलक (कै. चि. त्र्यं. (खानोलकर) हे शब्द मराठीतले हिंदीत चि. त्रि. होतात का? चिवरदेखील अनुस्वार हवा का असे आपले उगाचच फालतू विचार डोक्यात)— आणि प्रकाशझोतातच आवाज- अरे बघ—हृदयनाथ, ये ही आशा की मीना रे! अन् ते ... भोहन बाघ हं चित्रलेखेचे ... हा .... व्ही. शांतारामचाच मुलगा ... नाही! बेटा ... एकदम पाचपंचवीस आवाज— 'संध्या!!' आम्ही आपले शांत ... अरे कुणीच कसे दाद देत नाही एंट्रीवर!!

— (मनातल्या मनात) ते बघा नामदार के. एम्. बापूसाहेब पाटील आणि त्यांच्याबरोबर त्यांच्या सुविद्य पत्नी! सोबत आहेत (की शोभताहेत) एरंडोलचे (?) आमदार माननीय (हो आमदार म्हटला की, तो 'मा.' हवाच!) दिगंबरराव पाटील. का बरे ओरडत नव्हते हे लोक ना. पाटलांच्या नावाने? दोन दोन जिल्ह्यांचे हे पालकमंत्री. शिवाय अनेक संस्थांचे आधारस्तंभ. असे असूनही लोक दाद देत नाहीत म्हणजे त्यांनाही कळलेले दिसते की, शंकरराव चव्हाणांवरोबर हेही जाणार! (किंवा भाव डाऊन होणार!)

—गंमतच राजकारण म्हणजे. जळगाव आणि नासिक या दोन्ही संपर्कातल्या जिल्ह्यात काँग्रेसने दणदणीत झापटी खाल्ली तरी, के. एम्. बापू 'चानी'ला. वृत्तपत्रांतून रोज राजीनाम्याची मागणी होतेय् तरी हे 'चानी'ला. अन् आता ज्यांच्या कृपेमुळे १९ महिने निरंकुश कोंबड्या आणि भत्ते खाता येत होते त्या शंकररावांची झोप उडली तरी हे 'चानी'ला. राजकारणात गेंड्याची कातडी हवी असे व्यंकटराव म्हणतात ते एकूण खरेच तर. — आणि हो, मुख्यमंत्र्यांचे (?) 'हात' ना. बाबूराव काळे हेही रात्री दास्ताँ — ए — मीनाकुमारीच्या कार्यक्रमास गेले होते म्हणतात. ही गेंड्याच्या कातडीची तऱ्हा की, कलासक्ती? कलेवरची भक्ती की जाणाऱ्या 'कलेवरा'ची पसंती? ज्याचे त्याचे उत्तर वेगवेगळे असेल.

हरिकिसन (की हरेकृष्ण) शास्त्रीजींच्या मुलाखती एव्हाना अटोपल्यात. कौन्सिल हॉल गजबलेला, आता कुठे रिता झालाय्. शास्त्रीजींची आदब आणि समोरच्या आमदाराला एकदम विश्वासात घेण्याची पद्धत तर खासच. उदाहरणार्थ — आमदार आले की, शास्त्रीजी स्वतः उठून उभे राहत हस्तांदोलन करीत. आमदार खुर्चीवर बसल्यावर मगच स्वतः बसत. मुलाखत आटोपल्यावर पुनः उभे राहून निरोप देतच; पण तुम्ही कुठले? (अर्थात हिंदीत) — नासिकचे? — वा! काय काय सुंदर शहरांचं प्रतिनिधित्व करता आहातं आपण सारे. मला नासिक फार आवडतं. — म्हणजे? तुम्ही पाहिलंत नासिक — पाहिलंत काय? तीन चार वेळेस येऊन देखील गेलोय् — मग पुढच्यावेळेस — तुमच्याकडेच, भाई आप तो दोस्त बन गये नं!

—फ्लॅशबॅक-

—नासिक जिल्हा काँग्रेस कमिटी. ना. के. एम्. बापू पाटील! टोपी डोक्यावर नाही तर, पांढऱ्या कागदावर. एका पायाची घडी —एक गुडघा वर — मुलाखती स्टार्ट — दहा दहा वर्षे खासदार असलेले आले तरी कपाळावर आठ्या. नमस्कार केला की, तपकीर झटकावी तशी चिमूट वर-खाली.

—सचिवालय!

सहावा माळा. मुख्यमंत्र्यांची चेंबर. माधवराव बोरले — सहकार क्षेत्रातली मातब्बर व्यक्ती व्यंकटराव हिरे — माजी उपमंत्री!

'काय?'

'नासिकच्या —'

'तिकिटासाठी'

'अहो, तुमचं वर काय काम?' मला महाराष्ट्राची लॉबी करायचीय्.—'

(म्हणजे हे लॉबी करण्याच्या विरोधात की काय!)

'पण'

'— — — —'

'त्यासाठी चांगले हिंदी बोलणारेच पाठवायला हवेत.'

'हे हिंदी प्रवीण आहेत.' (कुणाचा तरी टोला.)

'इंग्रजी चांगले बोलायला यायला पाहिजे.'

'तुम्हाला खाली चिक्कार क्षेत्रं आहेत'

'पैठण वगैरे, ?' (चिमटा)

'नमस्कार.'

¤

## ॲटॅक ॲंड डिफेन्स

शंकरराव चव्हाण हटाव मोहिमेचा पाया काँग्रेसच्या गेल्या निवडणुकीत गेलेली शान हा असल्याचे वरवर दाखविले जात होते. तेव्हा चव्हाणवादी मंडळींनी आपलाही 'डिफेन्स' तयार ठेवला होताच. त्या गटाचे म्हणणे असे की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि त्यांच्याच माणसाचा वरचष्मा असलेली संयुक्त निवडणूक समिती व नरेंद्र तिडके हे त्यांचेच उजवे हात, या तिहेरी नात्याने मुख्यमंत्र्यांवर एकट्यावर आज राज्यातल्या काँग्रेस पानपताचे खापर फोडले जात आहे. असे असले तरी मंत्रिमंडळ असो की संघटना असो, येथे जबाबदारी सामूहिक स्वरूपाची (Collective Responsibility) असते, असा विचारही नेत्यांपासून कार्यकर्त्यांच्या मनाला शिवलेला दिसत नाही. ही बाब निश्चितपणे दुर्दैवी आहे. मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांना दोषी धरून, त्यांच्या हकालपट्टीला बरे कारण मिळाले. म्हणून मंत्र्यांपासून संत्र्यांपर्यंत सर्वजण कामाला लागले; सह्यांच्या मोहिमा व दिल्लीच्या वाऱ्या ज्या सुरू झालेल्या आहेत, हे नाहीतरी मग कशाचे निदर्शक आहे? वरवर जरी विचार केला तरी पराभवाचे खापर पूर्णपणे शंकरराव चव्हाणांवर फोडणे चुकीचे ठरते. पराभूत उमेदवारांचे मतदारसंघ जर पाहिले तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते आणि ती म्हणजे ज्या ज्या मतदारसंघातल्या मातब्बराने सत्तेचे लोणी खाल्ले, खात आहेत व काँग्रेसचे मातब्बर म्हणून जे मिरविले किंवा मिरवताहेत, त्यांच्याच मतदारसंघात काँग्रेसने दणदणीत झापटी खाल्ली

आहे. जळगाव जिल्हा घ्या. वीस-बावीस वर्षे सानेगुरुजींचे अवतार श्री. मधुकरराव चौधरी यांनी मंत्रिपद भोगले. त्यांच्या ' जिल्ह्यात काँग्रेसला दोन्हीही जागा गमवाव्या लागल्या. ( आजही या जिल्ह्यातले तीन मंत्री विद्यमान आहेतच.) कोल्हापुरात पाहा. विद्यमान मंत्रिद्वय ना. रत्नाप्पा कुंभार आणि उदयसिंहराव गायकवाड हे दोघे एकट्या दाजिबा देसाईंचा पराभव थोपवू शकले नाहीत. बाबूराव बेलोसे यांना तर अवास्तव मोठेपणा पक्षात मिळाला. अंतुले तर अखिल भारतीय काँग्रेसचे सरचिटणीस आणि बाळासाहेब सावंतही मंत्री ! ( अहो, पण ते तुमचेच ना समर्थक ? ) असे असताना रत्नागिरीतही दोन्ही जागा गमवाव्या लागल्या, त्या काय दंडवते हेच फक्त कोकण रेल्वे आणू शकतील म्हणून ? लग्नमौजीच्याही फिल्म्स् सरकारी खर्चाने तयार करवून घेणारे, ' पारवे ' कुठे घुमले नाहीत तर दाभाडी–मालेगावात ' हिरे ' आपला प्रकाश पाडू शकले नाहीत.

आता खरे म्हणजे हा डिफेन्ससुद्धा ऑफेन्स होऊ शकेल. उमेदवार निवडीपासूनच काँग्रेस पक्षाच्या पराभवाची व्यवस्था शंकरराव चव्हाणांनी अगदी चोखपणे तयार करवून ठेवली होती. अगदी मंत्रिमंडळातल्या सहकाऱ्यांनाही कधी विश्वासात घेण्याची ज्या मुख्यमंत्र्यांना गरज वाटलेली नाही, त्यांनी ( किंवा त्यांच्या समर्थकांनी ! ) पराभवाचे खापर त्या त्या विभागातल्या मंत्र्यांवर फोडावे आणि नामानिराळे व्हावे, यालाही अर्थ नाही. कॅबिनेट मीटिंगला पाच मिनिटे उशीर झाला म्हणून यशवंतराव मोहित्यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांवरही चव्हाणांनी तोंड टाकले तर, चक्क गृहपाठ तपासून विद्यार्थ्यांना पुढचा अभ्यास द्यावा, या थाटात हेडमास्तरकी करणाऱ्या चव्हाणांची (नाइकांच्या पार्श्वभूमीवर, मंत्र्यांनी शाळा केली नसती तरच नवल. मला वाटते, ही शाळा शंकररावांना धडा शिकविण्यासाठी आणि त्यांची इंदिराबॅक्ड-संजयपुश्ड नेतेगिरी आणण्यासाठीच आहे. जागा ज्या पडल्या / पाडल्या तेथे सारे शंकररावांचे विरोधक होते, असे जर चव्हाणवादी गटाला म्हणायचे असेल तर खुद्द शंकरराव चव्हाण यांचेच एक उदाहरण त्याला पुरेसे आहे. मराठवाड्याचे तर सोडाच, पण खुद्द नांदेड मतदारसंघातली जागाही या गोदापुत्राला जिंकता आली नाही ! तिथे काय शामराव कदमांनीच आतून विरोध केला होता की कोण माकणीकरांनी छुपा संग्राम आरंभला होता. बाबूराव काळे तरी चव्हाणांचेच ना ! मुख्यमंत्रिपदी येताच जे खासदार काळे खासे–दाराने मंत्री झाले, त्यांचा प्रभाव जालन्यात दिसत नाही की डॉ. रफिक झकेरियांनाही औरंगाबादची नाडी पाहाण्याची आवश्यकता वाटलेली नाही. मुरब्बी राजकारणी यशवंतराव मोहित्यांनाही ऐन निवडणुकीच्या धामधुमीत बनियांच्या दारी लोकशाही बटिक होण्याचा धोका दिसू लागावा आणि तो त्यांनी जाहीरपणे व्यक्त करण्याचे पवित्र कार्य याच वेळी पार पाडावे, याचा अर्थ काय ? रजनी पटेल तरी नाईकांना घालवा अन् चव्हाणांना बोलवा-मोहिमेत आघाडीवर होतेच ना ? मग तेही दक्षिणेवर स्वारी करायला कसे गेले निघून ? त्यांचे नवे-जुने सहकारी–समर्थक रामनाथ पांडे, लिऑन डिसुझा, प्रभाकर कुंटे हेही मुंबईचेच मंत्री लाखालाखांनी काँग्रेस उमेदवारांचा पराभव उघड्या डोळ्यांनी पाहाणारे साक्षीदार असावेत, हे कसे ?

अखेरी एक गोष्ट महत्त्वाची म्हणजे सामूहिक जबाबदारी म्हणजे कोणाचीच जबाबदारी नव्हे, असे वातावरण शंकररावांनी आपल्या कारकीर्दीत तयार केले व सामूहिक जबाबदारी म्हणजे कोणा एकट्याचीच, ही भावना तयार झाली. ते एकटे नेते म्हणजे चव्हाण. मग या पार्श्वभूमीवर जर ते एकटे पडले तर पराभवाचे खापर दूरान्वयाने मंत्री वा माजी मंत्र्यांवर फोडणे योग्य कुठे ठरते ? महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या पराभवाचा विचार केला तर विजयाला शंभर बाप असतात. आणि पराभव मात्र पोरका असतो, हे जागतिक सत्यही इथे लोप पावलेले दिसून येते. इथे विजयाला वाली नाही आणि पराभव कोणाचा अनौरस आहे, तेही कळत नाही.

□

कालच हरेकृष्ण शास्त्री दिल्लीला गेले. पण शंकररावांना ते अवघ्या बारा तासांत हरेराम म्हणायला लावतील, असे वाटत नव्हते. बारा तारखेपर्यंत ए. आय. सी. सी. च्या बैठकीपर्यंत निर्णय होणार नाही, असा अनेक जाणकारांचा अंदाज होता. पण तो खोटा ठरला.

## हटाव–हटाव–हटाव

शंकररावांच्या अरेरावीच्या आणि कार्यकर्त्यांशी जी तुसडेपणाची वागणूक झाली, तिच्या सुरस आणि चमत्कारिक कथांचे पुढेमागे पुस्तक निघाले तर नवल वाटायचे कारण नाही. आणीबाणीचे शैथिल्य व जनता पक्षाचे यश यामुळे विरोधाला आणखीनच धार चढली. डॉ. शंकरराव राख, विलासराव लोणारी, बाबूराव जगताप, राठोड आदी कितीतरी आमदार मंडळी उघडपणे विरोधात काम करू लागली, त्याचे कारण वातावरणातला हा मोकळेपणा. देवतळे–कुंटे–पवार–शिंदे–कुंभार–गायकवाड आदी नेते आपल्या पुढ्यातल्या आमदारांना मोहिमेत भाग घ्यायला सांगायला तयार झाली, हाही त्याचाच भाग. पण या मोहिमेचे श्रेय खऱ्या अर्थाने जावे ते आमदार गेडामांकडे. ( हेही शंकररावच ! ) आपल्या पाचव्या मजल्यावरच्या एक नंबरच्या खोलीतून ही मोहीम सातत्याने दीड एक वर्षे झुंजवली ती यांनीच. एकटे असोत की पाच असोत–दहा असोत. खोलीत विषय एकच. शंकरराव चव्हाण हटाव. चर्चा एकच, पुढचा पवित्रा कसा घ्यायचा त्याची ! ! आणि मग हळूहळू मोहोळ जमले. चावे घेऊ लागले. प्रत्येकाची भूमिका काँग्रेस तगावी म्हणून शंकरराव जावे, एवढी शुद्ध असणे शक्य नव्हते. अनेकांचे अनेक राग होते. कुणाचे शंकररावांवर तर कुणाचे शंकररावांच्या पाठीराख्या मंत्र्यांवर. उदाहरणार्थ, राजाराम शिंदे ! मराठी नाट्यसृष्टीतले हे बिनीचे निर्माते. हेही शंकरराव हटाव मोहिमेत आघाडीवर दिसत होते. चव्हाण विरोधी गटांच्या आमदारांच्या बैठकांना हजर राहणे, स्वतःच्या गाडीतून वेळेवर आमदारांना योग्य स्थळी पोचवणे ही कामे प्रामाणिकपणे ' स्टेज बॉय ' च्या भूमिकेतून निर्माते शिंदे करीत, तेव्हा त्रयस्थाला ( प्रेक्षक ) गंमत वाटे. नाटकात राजकारण आहे की राजकारण हे नाट्यमय आहे ? नाट्यमंदारच्या शिंद्यांकडेही नाट्यमय घडामोडी घडवून आणण्याची मदार होतीच; पण मनोरंजनाचीही ! ! आता ' पीके ' वरच्या रागाचा त्याला मुलामा

पृष्ठ २७ वर

# शुचिष्मंत दाभोळकर आणि दीर्घस्मृती विश्वनाथ

संपादक माणूस.
स. न. वि. वि.

माणूसच्या २६ मार्च १९७७ च्या अंकामधील दीर्घस्मृती विश्वनाथ यांचा लेख वाचला. मी माणूसचा बऱ्याच दिवसांचा एक वाचक आणि हितचिंतक आहे, त्यामुळे हा लेख वाचून खेद झाला. मी दाभोलकरांना जवळून ओळखतो. पण हा खेद दाभोलकरांबद्दल वाटणाऱ्या आदरापोटी झालेला नाही. माणूसच्या व्यासपीठावरून एवढी एकांगी आणि सरळ सरळ चिखलफेक करणारी गलिच्छ विधाने व्हावीत याबाबतचा हा खेद आहे.

लोकशाहीत प्रत्येकाला मतस्वातंत्र्य असते. उच्चपदस्थांच्यावर निर्भीडपणे टीका करणारे पण आवश्यक असतात. पण टीका करताना ती एकांगी नाही आणि आपले 'भाषावैभव' आपण मुक्तपणे उधळत नाही याचे टीका करणाऱ्याने भान ठेवावयाचे असते. दाभोळकरांची चांगलीच 'डाळ नासली.' दाभोळकरांना वाटले की, मास्तरे नव्या वेतनश्रेणीसाठी जिभा बाहेर काढून लाळ गाळत आहेत. दाभोळकरांच्या विचारात ते पारच 'गाभटले' असली भाषा लेखकाने खरोखरच वापरावयास नको होती. विश्वनाथांच्या लेखातील सर्वात मोठा विनोद म्हणजे, शिक्षक संघटनेनी दाभोळकरांच्या 'दादागिरी' विरुद्ध अनुशासन शंकराकडे तार करून दाद मागितली आणि त्यामुळे 'निगरगट्ट' दाभोळकरांची चांगलीच जिरली हे विधान! – आता शिक्षक संघटनेने अनुशासन शंकराकडे धाव घेतली तर, कोणाची जिरली? – दीर्घस्मृती विश्वनाथांना आठवत असावे की, विनोबांच्या आचार्य परिदेत दाभोळकर होते. त्यावेळी केलेला सर्वसमंत ठराव घेऊन ते जयप्रकाशांना भेटण्यासाठी मुंबईच्या हॉस्पिटलमधे गेले होते. या विरुद्ध चिडलेल्या 'ब्लिटझ' साप्ताहिकाने समाजवादी व जयप्रकाशवादी दाभोळकरांना पुन्हा आचार्य परिषदेत घेऊ नये अशी मागणी केली होती. अशा दाभोळकरांच्या विरुद्ध अनुशासन शंकराकडे तक्रार करून शिक्षक संघटनेने नेमके काय मिळविले व दाभोळकरांची त्यात कशी काय जिरली?

नवी वेतनश्रेणी घेताना शिक्षकांनी आणखी काही बंधने स्वीकारली पाहिजेत. परीक्षेचे काम हे शिक्षकांच्या नेहमीच्याच कामाचा एक भाग आहे, हे असे दाभोळकरांना वाटले तर, त्यात तसे काही चूक नाही. मॅट्रिकला विद्यापीठात पहिले आल्यावर इतर अनेक मोह सहजपणे सोडून एका खाजगी शिक्षण संस्थेत आजीव सेवक म्हणून कामाला लागून खादीधारी राहण्याचे व्रत घेतलेल्या दाभोळकरांना शिक्षकांनी त्याग केला पाहिजे, असे वाटत असले आणि आजच्या शिक्षकांना ते पटत नसेल तर, तो वाद अखेर दोन पिढ्यांमधील आहे. खरे पाहता लोकशाही पातळीवर हा वाद सोडवताना दोघांनाही काही तडजोड करावी लागेल. अथवा आपल्याला पूर्णपणे पटणाऱ्या तत्त्वांसाठी चालू घडीला अप्रियता स्वीकारावयाची व नोकरी गमावण्याची दोन्ही पक्षांना तयारी ठेवावी लागेल. पण विश्वनाथांच्या चर्चेत नेमका याच चर्चेचा अभाव आहे. 'माणूस'ची खरेच इच्छा असेल तर, शिक्षक संघटना, दाभोळकर आणि महाराष्ट्रातील इतर विचारवंत यांच्या विचारमंथनातून अशी एखादी पुरवणी माणूस निश्चितच सादर करू शकेल.

कळावे.

आपला,
**दीर्घस्मृती दत्तप्रसाद**

संपादक 'माणूस' यांस,

'दीर्घस्मृती दत्तप्रसाद' यांचे पत्र वाचले. वाचून आनंद अशासाठी झाला की, कोणाला तरी दाभोळकरांवरील टीकेची दखल घ्यावीशी वाटली.

दत्तप्रसादांनी माझ्या भाषेवर घेतलेला आक्षेप मी समजू शकतो. पण याविषयी कुलगुरू दाभोळकरांचीच एक गोष्ट सांगतो. मार्गे शिक्षणसचिव मोघे यांची काही पत्रे दाभोळकरांनी महाविद्यालयांकडे पाठविली होती. त्याविषयी शिक्षकसंघटनांनी 'भाषा अपमानास्पद आहे' असा आक्षेप घेतला असता दाभोळकरांनी सांगितले की, 'काही गोष्टी स्पष्टपणे मांडावयाच्या असतील तर भाषा कडकच लागते.' माझ्या लेखाविषयी हाच न्याय लागू असावा.

दत्तप्रसादांनी माझा लेखही नीट वाचलेला नसावा. मी लेखात कोठेही म्हटलेले नाही की, 'अनुशासन शंकराकडे दाद मागितल्याने दाभोळकरांची जिरली.' उलट मी असे म्हटले आहे की, दाभोळकरांच्या दादागिरीविरुद्ध अनुशासनशंकराकडे दाद मागावी लागणे ही दुर्दैवाची गोष्ट होती. पुढे मी असेही लिहिले आहे की, 'सरकारने काहीच केले नाही,' तेव्हा दाभोळकरांची जिरण्याचा प्रश्न येतोच कुठे?

नवीन वेतनश्रेणीविषयी दाभोळकरांची काहीही मते असोत. त्यासंबंधीच्या कराराची १ डिसेंबर ही तारीख ३१ ऑक्टोबरपर्यंत पुढे त्यांनी का ओढावी?

मी लेखात हे स्पष्ट केलेच आहे आणि पुन्हाही म्हणतो की, दाभोळकरांविषयी मला जो वैयक्तिक आदर आहे तितका कदाचित दत्तप्रसादांनाही नसेल. त्यांनी (दाभोळकरांनी) शिक्षकांना विश्वासात घेऊन आपल्या भूमिकेविषयी खुलासा करावा एवढाच या लेखाचा उद्देश होता. परंतु अजूनही ते 'निगरगट्ट'पणे स्वस्थ बसलेले दिसतात.

कुलगुरू दाभोळकर स्वतःला प्रथम शिक्षक व नंतर कुलगुरू समजतात, असे नेहमी सांगितले जाते. त्यांच्या या समजुतीचे थोडेतरी प्रतिबिंब त्यांच्या वागणुकीत दिसले असते तरी हा लेख लिहिण्याची वेळ न येती.

कळावे.

आपला,
**दीर्घस्मृती विश्वनाथ**

# चक्रमूचक्री (८)

दीर्घस्मृती विश्वनाथ

## भरता न भरता निमिष्य । जाणे लागे ।।

जोशी–अभ्यंकर हत्याकांडाचा अनपेक्षित शेवट कळला ना !

हां हां, ' शेवट ' म्हणू नका. आरोपी गुन्हेगार नव्हेत. संशयावरून, चार लोकांना पकडले आहे, एवढे खरे. पण यात 'अनपेक्षित' काय आहे ?

अनपेक्षित अशा अर्थाने की, आम जनतेचे अंदाज काही निराळेच होते. कुणी म्हणत की, तस्करांची टोळी या हत्याकांडामागे आहे. फार वरच्या स्थानावरील व्यक्तींचे हात यात गुंतलेले आहेत. पण एकूण प्रकरण त्यामानाने फारच फुसके निघाले. लोकांची थोडी फार निराशाच झाली असे म्हटले पाहिजे. अर्थात भीती कमी झाली आहे, हेही खरेच.

लोकांना काय, कोणतीही गोष्ट तर्काच्या आणि कार्यकरणभावाच्या चौकटीत बसवाविशी वाटते. अतर्क्य गोष्टी भीतिदायक होतात. त्यातून अतर्क्य मृत्यू अधिकच भेडसावणारा वाटतो. म्हणून खुनाच्या तपासाचा आग्रह धरला जातो. तो तपास लवकर पूर्ण झाला नाही तर, पोलिसांना शिव्याशाप दिले जातात. आणि दरम्यान वस्तुस्थितीचे पाठबळ नसलेले तर्क करून स्वतःचे समाधान करून घेतले जाते. अभ्यंकर–हत्याकांडासारख्या निर्घृण खुनानंतर उठणाऱ्या अफवांनी लोकांत भीती पसरवली जाते हे जितके खरे आहे, तितकेच हेही खरे आहे की, अटळ आणि अतर्क्य मृत्यूच्या सावलीत आपण वावरतो आहोत, या भेडसावणाऱ्या जाणीवेतून सुटका झाल्याचे समाधानही लाभते.

पण आता जो खुनाचा तपास लागू पाहत आहे, त्यावरून असे समाधान लाभेल असे वाटत नाही. कसे ते पाहा. चार उनाड आणि हाताबाहेर गेलेली मुले एका हॉटेलात गप्पा मारता मारता खुनाचा कट रचतात. हा कट त्यांनी आपण करणार असलेल्या गोष्टीचे पुरे गांभीर्य लक्षात न घेता देखील रचला असेल. ' रिकाम्या मनात सैतानाचा संचार ' या म्हणीप्रमाणे कदाचित असे काही आपण खरोखर करू असा विचार मनात न येता देखील, केवळ कागदावरचा कट म्हणून त्यांनी योजना आखली असेल. या कटाचे लक्ष्य झालेली कुटुंबे कटवाल्यांच्या माहितीचीही नसतील; किंबहुना, हत्या करण्यासाठी गुन्हेगारांनी हीच कुटुंबे का निवडली हे कधी कळणारही नाही ! थोडक्यात म्हणजे सावलीसाठी झाडाखाली बसावे आणि वरून फळ पडून डोके फुटावे, ही गोष्ट जितकी आपापतः आणि अतर्क्य रीतीने घडते तितक्याच अतर्क्य रीतीने या कुटुंबांच्या वेलीवरील जाईच्या कळ्या खुडल्या गेल्या, असे म्हटले पाहिजे.

पण माणसे मृत्यूत काही अतर्क्य आहे, हे मानायला सहजी तयार होत नाहीत. आताच पहा ना, आपल्या वर्तमानपत्रांनी पुण्याला येत असलेले बकाली रूप, आईबापांचा मुलाविषयींचा निष्काळजीपणा, चित्रपट आणि कादंबऱ्या यांतून होणारे गुन्हेगारीचे चित्रण, हॉटेलातून बसणारे तरुणांचे अड्डे अशा अस्ताव्यस्त चौकटीत आरोपींच्या तथाकथित गुन्ह्याला बेमालूम बसविण्याचा प्रयत्न चालविला आहे. आरोपी मध्यमवयीन आणि खेडेगावात राहणारे असते, तर यापेक्षा निराळी अशी चौकट त्यांनी शोधली असती. कारण कोणतीही भांबावून टाकणारी, तर्काला न पटणारी गोष्ट झाली की, एक विस्तृत चौकट घेऊन कार्यकारणाच्या अनुषंगाने ती गोष्ट त्या चौकटीत बसवायची, हा आपला एक खेळच आहे.

पण मग अशा गोष्टींकडे कसे बघावे असे तुम्हाला वाटते ! का आपला सनातन दृष्टिकोन वापरावा ? म्हणजे या गोष्टी अशा होणारच; मृत्यू अटळ आहे, तो केव्हा ना केव्हा ओढवणारच; मरण हेच खरं आहे, जीवन हा मायेचा खेळ आहे; सगळ्या गोष्टी ईश्वराने ठरवून ठेवल्या आहेत, तशाच त्या होत जाणार इत्यादी. पण अखेर तीही एक चौकटच आहे. फक्त ती इतकी ढोबळ आणि विस्तृत आहे की, ती चौकट आहे हेच आपण विसरतो. आता हे खरे आहे की, या चौकटीने आपल्या पिढ्यानपिढ्या मृत्यूच्या सावलीत समाधानी ठेवल्या; इतकेच नव्हे तर, कित्येकांना मृत्यूच्या भीतीतून मुक्तही केले. पाहा ना, रामदासांनी किती सहजपणे म्हटले आहे, ' सरता संचिताचा शेष । नाही क्षणाचा अवकाश । भरता न भरता निमिष्य । जाणे लागे ।। '

पण इथेही तर्काच्या पलीकडे असणारा एक भाग आहेच. तो असा की, आपले संचित केव्हा संपते हे कसे कळणार ?

तो भाग आपल्या तर्काच्या पलीकडे आहे, असे नाही. ते आपले अज्ञान आहे. संचित केव्हा संपणार हेही अगोदरच ठरलेले आहे. आपल्याला ते कळत नाही, ही आपली कमतरता आहे. थोर संत, योगी यांना आपले इहलोकीचे वास्तव्य केव्हा संपणार ते कळत असते, असे म्हणतात.

पाश्चात्य गणितज्ज्ञ आणि तत्त्वज्ञ लाय्ब्नीझ यानेही असाच विचार मांडला होता. त्याचे म्हणणे असे की, विश्वात घडणारी प्रत्येक घटना सूत्रात बांधणे शक्य आहे. आता ते सूत्र आपल्याला सापडत नाही, ही आपल्या बुद्धीची मर्यादा आहे. पण ' कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी । ' केव्हा तरी, कोणाला तरी हे मूलभूत सूत्र सापडेलही. आईनस्टाईनचे देखील शेवटपर्यंत असेच मत होते.

पण जे काही होणार आहे ते ठरलेलेच आहे असे जर असेल तर माणसाचे कर्तृत्व, स्वातंत्र्य, न्याय, अन्याय, मूल्ये ह्या सगळ्यांना काय अर्थ उरणार ? आपण सगळी जर

कळसूत्री बाहुली असू, आणि सूत्रधाराने कोणता खेळ करायचा ते आधीच ठरवलेले असेल तर, आपल्या कृत्यांची आपल्यावर जबाबदारी कशी येणार? आणि जबाबदारीचा प्रश्न बाजूला ठेवला, तरी आपल्या स्वतंत्र इच्छाशक्तीला या कल्पनेत कोणते स्थान राहणार?

हा प्रश्न विचारवंतांना सततच छळत आलेला आहे. विश्वाची 'विधिलिखित' कल्पना मान्य केली तर, मनुष्याचे इच्छास्वातंत्र्य कसे उरणार हा प्रश्न अतिशय बिकट आहे; आणि 'विधिलिखिता'ची कल्पना अमान्य केली तर, आपल्या तर्काला वावरायला मिळेल. अशी कोणती नवी चौकट स्वीकारायची असा हा प्रश्न आहे. पण अलीकडेच त्याचे एक बरेंच सोपे उत्तर कार्ल पॉप्पर या तत्त्वज्ञान्याने देण्याचा प्रयत्न केला आहे.

या बिकट पेचातून पॉप्परने भेद काय काढला? त्याने विधिलिखिताची कल्पना मान्य केली की अमान्य केली?

पॉप्परला विधिलिखिताची कल्पना मान्य नाही. तो म्हणतो की, विश्वात नवीन आणि पूर्वकल्पित नसलेल्या घटना घडत असतात आणि त्या मनुष्यनिर्मित असतात. उदाहरणार्थ, कोणाला नवीन संगीतरचना सुचते, कोणी कवी नवी कविता रचतो, गणितज्ञ नवी गणित-तत्त्वे शोधून काढतो. याही विश्वात घडणाऱ्या गोष्टीच आहेत. त्या पूर्वकल्पित नाहीत, असा त्याचा विश्वास आहे. म्हणजे अमूक एक कवी अशी अशी कविता अमक्या तारखेस लिहील, हे काही फॉर्म्युल्याने सांगता येईल, यावर त्याचा विश्वास नाही. अखेर हा विश्वासाचा प्रश्न आहे.

पण अखेर कविता, संगीत-रचना, शास्त्रीय तत्त्वे या काही भौतिक गोष्टी नाहीत. त्याचे विश्वात स्थान काय?

पॉप्पर तीन विश्वाची कल्पना करतो. इंद्रियांद्वारे जाणवणारे भौतिक विश्व हे पहिले, प्रत्येकाचे मानसविश्व हे दुसरे आणि मनुष्यांनी भाषेद्वारे आपल्या कल्पना आणि विचार व्यक्त केले की, त्या सार्वजनिक विचाराचे बनते ते तिसरे विश्व-विचारविश्व. विचारविश्वाचा मानसविश्वाशी आणि मानसविश्वाचा भौतिकविश्वाशी व्यापार चालू असतो. त्यामुळे जन्म-जरा, मृत्यू-व्याधी यांनी भरलेले भौतिकविश्वही बंदिस्त नाही. त्यातही नवनिर्मिती चालू असते. कारण विचारविश्वातून कल्पना मानसविश्वात येतात आणि मानसविश्वातून त्या कल्पनेचे मनुष्याच्या हालचालीने झालेले प्रकटरूप भौतिक विश्वात बदल घडविते.

पण या कल्पनेने नवे काय साधले ते कळत नाही. भौतिकविश्वाचा बंदिस्तपणा टाळण्यासाठी त्याच्या पाठीवर मानसिकविश्व आणि विचारविश्व यांची जुळी गाठोडी लादली खरी, पण तिन्ही मिळून जे झाले ते तरी बंदिस्तच आहे की नाही? सर्व विचार पूर्वकल्पित कशावरून नसतील? ते पूर्वकल्पित नाहीत असा नुसता विश्वास काय कामाचा?

याचे उत्तर फारच सूक्ष्म आणि मनोरंजक आहे हे तर खरे. त्या विचारविश्वातील नाना विचारांचा एक नकाशा बनविण्याचा प्रयत्न मनुष्य करतो. त्या नकाशाचाच एक नवा विचार बनतो. ही मालिका अनंत वाढत जाणार आहे. 'सौंदर्यमीमांसा' या ग्रंथात पाटणकरांनी हेच केले. आजपर्यंत जे सौंदर्यशास्त्रीय सिद्धान्त झाले त्यांचा एक नकाशा त्यांनी केला आणि ती रचना हाच एक नवा सिद्धान्त झाला.

एखाद्या बंद खोलीत एक चित्रकार बसला आणि खोलीचे हुबेहूब चित्र काढू लागला तर काय होईल? तो खोलीचे चित्र काढेल, स्वतःच्या टेबल-खुर्चीचे चित्र काढेल, आणि स्वतः काढत असलेल्या चित्राचेही चित्र काढेल-त्या चित्रातल्या चित्रातही पुनः यात्र सगळ्या गोष्टी असतील. पण या सगळ्या खटाटोपातून एक गोष्ट नक्कीच निष्पन्न होईल-बंद खोलीतूनही अनंताची वाट गवसेल. माडगूळकरांनी एका कवितेत म्हटले आहे नां- 'चित्रातल्या जळात हे चित्र तारवाचे', तसाच थोडासा हा प्रकार आहे.

पण आपल्याच विचाराचा नकाशा काढण्याचा हा खटाटोप कशासाठी!

तोच तर माणसाला मिळालेला शाप किंवा वरदान आहे. हाती असलेल्या गोष्टींची स्वतःला समाधान लाभेल अशी रचना करण्याचा माणसाचा छंद आहे. त्यातूनच खुनानंतरच्या अफवा पिकतात आणि त्यातूनच 'भरता न भरता निमिष्य । जाणे लागे ॥' जाण्याचा विसर पाडण्याची किमया साधते. मृत्यूची कुऱ्हाड पडेपर्यंत माणसाला असलेल्या अल्पशा इच्छाशक्तीचा एक हुंकार म्हणजे हा रचनेचा छंद आहे.

□


# पांढऱ्या डागावर मोफत इलाज

पांढरे डाग बरे करण्यात आमच्या उपचाराने मोठी ख्याती मिळविली आहे. उपचार सुरू झाले की सुधारणा दिसून येईल. रोगाच्या तपशिलासह लिहा. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**BHARAT AYURVEDASHRAM (M) P. O. KATRI SARAI (GAYA)**

# स्थळ रायबरेली ! वेळ निकालाची !

जनार्दन ठाकूर । आनंदबाजार पत्रिका । २१ मार्च १९७७

स्थळ : रायबरेली.

सकाळी साडेदहाच्या सुमाराला मी इथं पोचलो, तेव्हा राजनारायण कोर्टाच्या आवारातल्या एका पिंपळाच्या झाडाखाली बसले होते. डोक्याला नेहमीची हिरवी पट्टी. मला पाहयल्यावर ते जरा सरकून बसले. मला बसायला जागा करून देऊन त्यांनी माझ्यासाठी एक कप चहाची ऑर्डर दिली.

अगदी शांत न् किंचित् विषण्ण दिसत होते ते तेव्हा. 'इथं एकूण कसं काय ;' म्हणून मी विचारलं तर म्हणाले, 'चान्सेस चांगलेच आहेत.' बस्. एवढंच. अन् हे म्हणताना पण त्यांचा एरवीचा खळाळणारा उत्साह अजिबात नव्हता. त्यांनासुद्धा जरा शंकाच होती बहुतेक.

पण आपल्याला १०१ मतं पोस्टानं मिळालीयत् हे मात्र त्यांनी माझ्या कानावर घातलं. म्हणाले, 'इंदिरा गांधींना मिळालीयत् १९० मतं.' 'हे लक्षण चांगलंच आहे' असं त्यांचं म्हणणं. 'एवढंच काय पण १०१ हा आकडासुद्धा शुभ आहे.' अन् 'गेल्या खेपेला पोस्टानं मला एकसुद्धा मत मिळालं नव्हतं.'

इकडं कांग्रेसच्या मंडळींमध्ये तेव्हा इतका उत्साह होता की, 'दोन्ही मतदारसंघांत आम्ही प्रचंड बहुमतानं निवडून येतोय्' ह्याशिवाय त्यांच्या तोंडी दुसरी भाषाच नव्हती.

कोर्टाच्या ज्या खोलीत गेल्या महिन्यात इंदिर गांधींनी न् राजनारायणनी उमेदवारीचे अर्ज भरले होते, त्याच खोलीत आज रिटर्निंग ऑफिसर विनोद मलहोत्रांचं ऑफिस आहे. तिथं माखनलाल फोतेदारांची भेट झाली. आपण पंतप्रधानांचे मुख्य निवडणूक एजंट आहोत, असं ते म्हणाले. मोठ्या थाटात इंडिया किंग्ज सिग्रेटचे झुरके घेतघेत हे ऐटबाज गृहस्थ म्हणाले, मी काश्मीरला मीरकासीमच्या मंत्रिमंडळात होतो. सध्यासुद्धा मी काश्मीरच्या विधानसभेत आहेच. अन् निवडणूक कमिशनच्या मतदारसंघांची आखणी करणाऱ्या समितीत पण मी होतो,' रायबरेली न् अमेठीबद्दल ते म्हणाले, 'दोन्ही सीट्स आम्ही जिंकतोय्.'

पण दिवस जसा पुढंपुढं जात गेला. अन् शामियान्याखालच्या मतमोजणीच्या केंद्रांतनं जशा बातम्या यायला लागल्या, तशी ताबडतोब हवा पालटून गेली. अचानक फोतेदारसाहेब फार दमल्याभागल्यासारखे दिसायला लागले. आपला नर्व्हसनेस लपवण्याकरता ते मला म्हणाले, 'मी चेनस्मोकर आहे.' त्यामुळं त्यांचा नर्व्हसनेस आणखीच उघडा पडला.

रिटर्निंग ऑफिसरच्या खोलीमागच्या एका खोलीत यशपाल कपूर येरझारा घालत होते. त्यांनी एकदम एक डझन तारा करायला एकाला पाठवलं होतं अन् त्या तारा गेल्या का नाही ह्याची फार उत्कंठा त्यांना लागून राहली होती. खोलीत एक बिनतारी यंत्र होतं. ते सारखं चालूच होतं, अन् फोन अक्षरशः अखंड वाजत होता.

बाहेर पडल्यावर मला गणपत दुबे दिसले. नेहरू घराण्याच्या कोणत्याही निवडणुकीतले हे सर्वांत मोठे मदतनीस होते. वेगवेगळ्या बूथ्समधनं जे लोक बाहेर येत होते, त्यांच्याशी ते कुजबुजत बोलत होते. कायम हसतमुख असणारा हा अघळपघळ गृहस्थ आता मात्र मुळीच आनंदी दिसत नव्हता.

हलकेहलके हवा तंग होऊन गेली. एवढंच काय पण जनतेच्या समर्थकांतसुद्धा त्याची प्रतिक्रिया झालीच.

सीमा सुरक्षा दलाचा एक वरिष्ठ अधिकारी आरडाओरडा करत दाणदाण कंट्रोलरूममधे आला. आपल्या 'उपरवाल्या'शी बातचीत करण्याकरता त्यानं कॉल बुक केला. त्याचा हा 'उपरवाला' लखनौचा का दिल्लीचा ते काही मला समजलं नाही. त्याला लाईन मिळाल्याबरोबर भलत्याच वेगात एका सांकेतिक भाषेत त्यानं बोलायला सुरवात केली: 'रॉजर अल्फा जाकिर ... लव ...' त्याच्या शब्दांचा शेंडाबुडखा काहीच मला उमगला नाही. पण बोलण्याचा अर्थ मात्र नेमकाच कळला. की इकडं परिस्थिती काही बरी नाही. सगळं बुडत चाललंय्.

दुपारी बारच्या सुमाराला सरकारी अधिकारी माइकवरनं सांगायला लागले की, कोर्टाच्या आवारात २०० मीटर हद्दीत १४४ कलम लावलंय्. ही एकच गोष्ट ते इतक्यांदा सांगत राहले की, जणू आता कोणत्याही क्षणी प्रचंड काहीतरी घडूनच जाणाराय्.

सबंध आवारात स्मशानाची शांतता पसरली. जनतेचे समर्थकसुद्धा एकमेकांत जोरात बोलेनासे झाले. सगळ्यांनाच एक उत्कंठा लागून राहली होती.

एवढ्यात अचानक सीमा सुरक्षा दलाचे धिपाड शीख कुठनंतरी उपटले अन् रंगीत शामियान्याबाहेर पोझिशन घेऊन उभे राहला लागले. प्रत्येकाच्या हातात स्टेनगन.

तिकडं मतमोजणी अगदी सुरळीतच चालली होती. निवडणूक कमिशननं निरीक्षक म्हणून नेमलेले पी. पी. दत्त अगदी खूष होते. नाव ठेवायला काहीच जागा नव्हती.

पण कंट्रोल रूममधली हवा हलकेहलके तापत चालली होती. 'दिल्लीहून अर्जंट फोन' घ्यायला कलेक्टरला पाचपाच मिनिटांनी शेजारच्या खोलीत उठून जावं लागत होतं. उच्च पातळीवर सल्लामसलत चालली होती. पण सल्लामसलत कशाबद्दल चाललीय्, ते कुणालाच सांगता येत नव्हतं अन् त्यामुळं परिस्थिती आणखीच

बिघडत चालली होती.

मग जवळजवळ पाच वाजायला आले. 'समाचार'चा माणूस जरा चुळबुळायला लागला. पाचच्या डाकेला काहीही का होईना बातमी पाठवायलाच हवी. पण अजून अधिकृत काही जाहीरच होत नाहीय् तर तो बातमी काय पाठवणार ?

आम्ही राजनारायणना शोधून काढायला गेलो. ते आपल्या चेले-मंडळींना घेऊन मतमोजणी केंद्राच्या आसपास भटकत फिरत होते. मला पाहल्यावर मोठ्या खंबीरपणानं म्हणाले, 'मी जिंकतोय्.' आणखी म्हणाले, 'देशातल्या नाना ठिकाणहून फोन येतायत. मग किंचित् थांबून म्हणाले 'ही जनता आंधी आहे.'

आम्ही त्यांना विचारलं, 'पहिली घोषणा कधी होणार ?'

'खरंच की ! मला पण तोच प्रश्न पडलाय्. हजारो लोक खुष-खबरीची वाट बघत उभे आहेत.'

असं म्हणून ते तसेच रिटर्निंग ऑफिसरच्या खोलीत शिरून म्हणाले, 'पहिल्या फेरीच्या मोजणीचे आकडे का म्हणून जाहीर होत नाहीयत ?'

विनोद मलहोत्रा नम्रपणानं म्हणाले, 'मला आत्ताच ऑर्डर मिळालीय् की, आणखी जरासा वेळ जाहीर करू नका म्हणून.'

पण राजनारायण काहीही गोष्ट ऐकायलाच तयार होईनात. त्यांचं म्हणणं होतं, 'निवडणूक कमिशनचे नियम असे कसे बदलता येतील' ह्याही खेपेला तुम्ही खेळ संपल्यावर नियम बनवणार काय ? आकडे आत्ताच्या आत्ता जाहीर झालेच पाहिजेत.'

रिटर्निंग ऑफिसर पेचात सापडला. निवडणूक कमिशनचे निरी-क्षक त्यांच्या मदतीला पुढं सरसावले. राजनारायणचं म्हणणं त्यांनी मान्य केलं. 'एका बूथवरची मतं मोजून झाली की लगेचच ती जाहीर करायला पाहिजेत, असा नियम आहे. नियम बदलायचा काही सवालच नाही.'

लगेच रिटर्निंग ऑफिसरनं आपल्या अॅसिस्टंटला बोलवून घेतलं न् पहिल्या फेरीच्या मोजणीचे केंद्रवारी आकडे जाहीर करायचा आदेश दिला.

त्याप्रमाणं आकडे जाहीर व्हायला लागले :

डालमऊ : इंदिरा गांधी ३२४, राजनारायण ५४०,

सातात : इंदिरा गांधी ५५१९, राजनारायण ६७०६.

इंदिरा गांधींना मागं टाकत राजनारायण पुढंपुढंच जात राहले.

□

---

**'चित्त हवे भयशून्य, उंच होवो माथा' हा अशोक शहाणे यांनी अनुवादित केलेला अन्नदाशंकर राय यांचा लेख माणूस जनविराट दोन, अंकांमध्ये प्रसिद्ध झाला होता.**

**अंक अन्नदाबाबूंना मिळाल्यावर त्यांचेकडून आलेले उत्तर**

---

**संपादक माणूस—**

...माझे विचार अधिक लोकांपर्यंत पोचवल्याबद्दल मी आभारी आहे.

हा लेख जेव्हा मी बंगालीत लिहिला, तेव्हा आपलं हे आवाहन निष्फळ ठरणार नाही अशी आशा मी बाळगून होतो. मी प्रार्थना करत होतो की, आणीबाणी उठवायची नि बेचाळिसावी घटनादुरुस्ती अगदी पुरती नाही तरी, आंशिक मागं घेतली जाईल असं आश्वासन देण्याची बुद्धी इंदिरा गांधींना आणि त्यांच्या सरकारला होऊ दे. हे झालं असतं तर, मी तरी काँग्रेसला मत दिलं असतं. इंदिरा गांधींच्या-कडनं अशी हालचाल व्हायचं काही चिन्ह दिसतं का म्हणून अगदी शेवटच्या दिवसापर्यंत मी उत्कंठेनं वाट बघत होतो. त्या मख्खच राहल्या. मग मी माझ्या विचारानुसार वागलो नि मतदान केलं नाही. इतरसुद्धा कैकजणांनी असंच केलं असेल.

अन् कसा सगळाच इमला कोलमडून गेला ! हेकट नेत्यानं आपल्या हट्टापायी स्वत:चा पक्ष उद्ध्वस्त करून टाकला. त्या धरून चालल्या होत्या की, आणखी सहा वर्षांकरता भारतीय जनता बेबंद सत्ता आपल्या पक्षाच्या हाती सोपवेल. ह्या समजुतीपायीच त्यांच्या पक्षाची सत्ता संपुष्टात आली. महाराष्ट्रानंही मोठी निर्णायक काम-गिरी बजावली. मला सगळ्यात खूष करून टाकणारी गोष्ट म्हणजे गोखले पडले. आता परत ते वकील बनतील न् हायकोर्टाच्या न् सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशांना तोंड देतील.

फार मोठं श्रेय एस. एम. जोश्यांना आहे. त्यांच्या परिश्रमांना कल्पनेबाहेर यश मिळालं. तसाच वाटा पु. ल. देशपांडे नि दुर्गा भागवत ह्या साहित्यिकांचा आहे. राजकारणात 'लुडबुड' करू नका म्हणून यशवंतराव चव्हाणांनी ज्या साहित्यिकांची नि बुद्धिजीवी मंडळींची टर उडवली होती, त्या सर्वांना माझे प्रणाम. लेखणी ही तलवारीपेक्षा जास्ती ताकद बाळगून असते, हे आमच्या सत्ताधाऱ्यांना कधी उमगणार ? उजव्या कम्युनिस्ट पार्टीच्या धंदेवाईक क्रांति-कारकांनी पण हीच चूक केली न् त्याची जास्तीच कडवट फळं आता ते चाखतायत....असो.

२३ मार्च १९७७ —अन्नदाशंकर राय

# काश्मीर आणि त्रिपुरा

## दोन राज्यांत दोन न्याय

वा. दा. रानडे

केंद्रात नवे सरकार अधिकारावर आले आणि राज्यपातळीवर अस्थिरतेला सुरुवात झाली. काही काही निश्चित मार्गदर्शक तत्त्वे ठरवून नवे सरकार या अस्थिरतेला तोंड देते की, पूर्वीच्या कॉंग्रेस राजवटीप्रमाणेच पक्षाची सोय पाहून निर्णय घेते, याची कसोटी पाहणाऱ्या घटना काश्मीर आणि त्रिपुरामध्ये घडल्या. पण या दोन प्रसंगांत जनता पक्षाच्या सरकारचे जे धोरण दिसून आले, ते त्याची प्रतिमा उजळणारे नव्हते, असे खेदाने म्हणावे लागते.

काश्मीरमध्ये शेख अब्दुल्लांची नॅशनल कॉन्फरन्स आणि कॉंग्रेस यांचे संयुक्त मंत्रिमंडळ अधिकारावर होते. निवडणुका संपताच शेख अब्दुल्लांना असलेला पाठिंबा कॉंग्रेसने काढून घेतला. नॅशनल कॉन्फरन्सने कॉंग्रेसशी केलेला निवडणूक समझोता पाळला नाही, कॉंग्रेसला सहकार्य दिले नाही, अशी कॉंग्रेस नेत्यांची तक्रार होती, म्हणून कॉंग्रेस सरकारने पाठिंबा काढून घेतला. विधानसभेत कॉंग्रेसचे बहुमत आहे. केवळ कॉंग्रेसचेच मंत्रिमंडळ बनवावे म्हणजे आगामी विधानसभा निवडणुका जिंकण्यास त्याचा उपयोग होईल, हा पक्षीय उद्देश त्यामागे होता. लोकसभा निवडणुकांत कॉंग्रेसचा पराभव झाल्याने कॉंग्रेसशी समझोता चालू ठेवण्याची आवश्यकता शेख अब्दुल्लांनाही वाटत नव्हती. जनता पक्षाशी सहकार्याची भूमिका त्यांनी घेतली. काश्मीरमध्ये पाय रोवायला ही संधी चांगली आहे, असे जनता पक्षाच्या नेत्यांनाही वाटले. म्हणूनच विधानसभा बरखास्त करून नव्या निवडणुका घेण्याची शिफारस शेख अब्दुल्लांनी राज्यपालांना केली व केंद्र सरकारने त्यास मान्यता दिली.

काश्मीरची घटना वेगळी आहे. घटनेप्रमाणे विधानसभा बरखास्त करण्याची शिफारस मुख्यमंत्र्यांनी राज्यपालांना केल्यास राज्यपालांना ती मानावी लागते. तेव्हा काश्मीरमध्ये जे घडले ते, तेथील घटनेच्या काटेकोर तरतुदीनुसार असेलही पण असे प्रसंग उद्‌भवतात तेव्हा निश्चित लोकशाही प्रथांबद्दल आग्रह धरायला नको का? बहुमताचा पाठिंबा गमावलेल्या मुख्यमंत्र्याने केलेली शिफारस मानणे लोकशाही संकेतांशी सुसंगत नाही. काश्मीर घटनेतील कलमे याबाबतीत लोकशाही तत्त्वांशी विसंगत असतील तर, ती बदलून घ्यावयास हवीत. हे लागलीच करणे शक्य नाही. पण ही जाणीव तरी कोणी दर्शविली का? या विषयावर लोकसभेत झालेल्या चर्चेचे जे वृत्तान्त वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाले आहेत त्यावरून तरी तसे दिसत नाही. कॉंग्रेस सरकार अधिकारावर आणायचे असा कॉंग्रेस नेत्यांचा प्रयत्न, तर त्याला अधिकारावर येऊ द्यावयाचे नाही, असा जनता पक्षाचा प्रयत्न होता. दोन्ही पक्षांनी केवळ पक्षीय हिताच्या भूमिकेवरूनच विचार केल्याचे दिसून आले. बहुमत गमावलेल्या मुख्यमंत्र्यांचा सल्ला मानलाच पाहिजे असे बंधन नसावे. एकंदर परिस्थितीचा विचार करून योग्य वाटल्यास तो मानला जावा, अयोग्य वाटल्यास बाजूला सारला जावा. असा निश्चित संकेत याबाबतीत ठरवायला हवा.

विधानसभा बरखास्त करणे हा शेवटचा उपाय. एखाद्या पक्षास किंवा आघाडीस बहुमताचा पाठिंबा असेल तर, सरकार स्थापण्याची संधी त्या पक्षास किंवा आघाडीस द्यायला हवी. हा दुसरा संकेत रूढ केला जाणे आवश्यक आहे. आपले सरकार होत नसेल तर, प्रतिस्पर्धी पक्षाचेही होऊ द्यावयाचे नाही, असे धोरण पूर्वीच्या कॉंग्रेस राजवटीत अनेकदा स्वीकारण्यात आले होते व आवश्यकता नसता विधानसभा बरखास्त करण्यात आल्या होत्या. जनता पक्षाचे सरकारही तसेच धोरण अवलंबणार असेल तर, मग कॉंग्रेस आणि जनता पक्ष यांच्यात फरक काय राहिला, असा प्रश्न जागरूक नागरिकांच्या मनात आल्याशिवाय राहणार नाही. काश्मीरमध्ये कॉंग्रेसचे बहुमत असता तेथे सरकार बनविण्याची संधी कॉंग्रेसला द्यायला हवी होती. विधानसभा बरखास्त करण्याचा निर्णय चुकीचा होता. त्याबाबत आता काही करता येण्यासारखे नाही. पण अशा चुका पुनः होऊ देऊ नयेत, यासाठी दक्षता घ्यावयास हवी.

काश्मीरच्या मुख्यमंत्र्यांप्रमाणेच त्रिपुराच्या मुख्यमंत्र्यांनीही विधानसभा बरखास्त करण्याचा सल्ला राज्यपालांना दिला होता. पण काश्मीरच्या बाबतीत जे धोरण जनता पक्षाच्या सरकारने अवलंबले ते त्रिपुराच्या बाबतीत मात्र अवलंबले नाही. तेथे विधानसभा बरखास्त करण्यात आली नाही, याचे कारण जनता पक्ष व त्याच्या सहकारी पक्षांच्या दृष्टीने ते सोयीचे नव्हते. लोकशाहीवादी कॉंग्रेस आणि मार्क्सवादी यांचे बहुमत होत असल्याने त्यांचे संयुक्त मंत्रिमंडळ तेथे अधिकारावर येण्याची संधी मिळत असता केंद्रातील सत्तारूढ आघाडी ती कशी दवडील? राष्ट्रपती निवडणुकीपूर्वी आपल्या बाजूचे सरकार त्रिपुरामध्ये अधिकारावर येत असेल तर, ते त्यांना हवेच होते. पक्षाच्या दृष्टीने जेथे जे सोयीचे असेल ते करावयाचे. निश्चित तत्त्वे किंवा संकेत ठरवून त्यानुसार वागावयाचे नाही, ही कॉंग्रेसचीच परंपरा जनता पक्ष व त्याच्या सहकाऱ्यांनीही पुढे चालू ठेवली.

त्रिपुरामध्ये खरा महत्त्वाचा प्रश्न पक्षांतराबाबत काही ठाम तात्त्विक भूमिका घ्यावयाची की नाही हा होता. जनता पक्ष व त्याच्या सहकाऱ्यांची तशी तयारी दिसली नाही. विरोधी पक्षांची सरकारे पाडण्यासाठी फोडाफोडीचा डाव कॉंग्रेस अनेकवेळा खेळली. विरोधी पक्षांच्या नेत्यांनी त्याबाबत कॉंग्रेसवर कडक टीकाही केली आणि आता केन्द्रात सत्तेवर आल्यावर हे पक्ष तेच तंत्र अवलंबीत आहेत असे त्रिपुरातील घटनांनी दाखवून दिले. तेथील विधानसभेच्या एकूण ६० सभासदांत कॉंग्रेसचे ४० होते. म्हणजे कॉंग्रेसला केवळ जेमतेम नव्हे तर दोन तृतीयांश बहुमत होते. पण चौदा सभासद फुटून त्यांनी लोकशाहीवादी कॉंग्रेस पक्ष स्थापला. कॉंग्रेसचे बहुमत गेले आणि लोकशाहीवादी कॉंग्रेस व मार्क्सवादी यांचे बहुमत झाले आणि त्यांचे संयुक्त मंत्रिमंडळ तेथे अधिकारावर आले. १९६७ च्या निवडणुकीनंतर हरियाणापासून पक्षांतराची साथ सुरू झाली होती तशी यावेळी त्रिपुरापासून सुरू होणार असे दिसते. पक्षांतरीत सभासदास पक्षात मुक्त प्रवेश देऊ नये. पक्षांतर करणाऱ्या आमदार—खासदाराने विधानसभा किंवा लोकसभेच्या सभासदत्वाचा राजीनामा देऊन नव्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आले पाहिजे हे तत्त्व सर्वांनी मानायला हवे. पक्षांतराला आळा घालण्याचा हाच प्रभावी उपाय आहे. पण आमचे राजकीय पक्ष अजूनही झटपट सत्ता मिळविण्याच्या मागे आहेत. कॉंग्रेसपेक्षा जनता पक्ष व त्यांचे सहकारी या प्रश्नावर निराळी ठाम तात्त्विक भूमिका घेतील असे वाटले होते पण कॉंग्रेसपेक्षा ते निराळे नाहीत हेच त्रिपुरातील त्यांच्या धोरणावरून स्पष्ट झाले आहे. □

# सोलकढी

## □ रेल्वेच्या बाबतीत आता काहीही घडू शकेल

आमचे मित्र मधू दंडवते केंद्र–सरकारात मंत्री झाले आहेत. जनता पक्षाचे सरकार व्हायचे निश्चित झाले तेव्हाच मधू दंडवत्यांचे हे असे काहीतरी होणार, असा संशय आम्हाला आला होता. आम्ही आमचे स्वामी नसल्यामुळे तो संशय आम्ही कोठेही जाहीर न करता आपल्यापाशीच ठेवला होता. मात्र मधू दंडवते नेमके रेल्वे-मंत्रीच होतील, हे आम्हालाही वाटले नव्हते. आम्ही त्यांच्याकडे शिक्षणखाते सोपवणार होतो. पण आपल्या घाईघेवडेपणामुळे हे प्राध्यापक-महाशय शिक्षणक्षेत्रात नको तितक्या वेगाने प्रगती करून नुसती धुईधांदल उडवून देतील, अशी धास्ती पंतप्रधानांना वाटली असावी. उलटपक्षी मधू दंडवत्यांच्या घाई-घेवडेपणाच्या इंधनावर, रेल्वे, रूळावरूनच, पण अधिक वेगाने, सहज धावेल, असा हिशेब करता येण्यासारखा होता. शिवाय, भारतीय रेल्वे ही जनतेची संपत्ती आहे; आणि जनतेच्या संपत्तीचा सांभाळ करायला मधू दंडवते भलतेच लायक आहेत; कारण त्यांच्या खादीच्या कपड्यांना खिसेच नसतात, असाही विचार त्यांनी केला असेल.

रेल्वे-मंत्री झाल्यामुळे यापुढे सारा प्रवास दुसऱ्या वर्गाने करायचे स्वप्न मधू दंडवत्यांच्या डोळ्यांपुढे तरळत असेल. प्रत्यक्षात तसे त्यांनी करू नये. पत्रकार, छायाचित्रकार यांच्या जथ्याबरोबर एकदाच दुसऱ्या वर्गाने प्रवास करून त्या वर्गाच्या प्रवाशांच्या अडचणी आणि समस्या समजावून घ्याव्या. म्हणजे त्या साहानुभूतीने सोडवता येतील, आणि पूर्वीच्या रेल्वे-मंत्र्यांची आचारसंहिता पाळल्यासारखेही होईल. विरोधी पक्षाने प्रत्येक पायंडा नवीन पाडला पाहिजे, असा जनतेचा आग्रह नाही.

पण काही ठिकाणी या नव्या रेल्वे-मंत्र्यांचा नाईलाज होईल, असा आमचा अंदाज आहे. उदाहरणार्थ, मोगलसराई. मोगलसराई हे एक अद्भुत स्थानक आहे. जगातले सगळ्यात मोठे मालआवार येथे आहे. असे म्हणतात की मोगलसराईला दररोज एक लाख रुपयांच्या मालाचा अपहार होतो. ('अपहार' म्हणजे 'चोरी.' पण दंडवत्यांबद्दल लिहितो आहे तेव्हा 'चोरी'ला 'अपहार' म्हटलेले बरे. त्यामुळे चोरीचे त्यांना अभिप्रेत असलेले गांभीर्य यथास्थित लक्षात येईल. दंडवत्यांच्या बोलण्यात असे गांभीर्य मुबलक. 'शक्य ते सारे प्रयत्न मी करीन' असे म्हणायचे असेल तेथे 'देहात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी लढीन' अशी भाषा ते वापरतात. अस्तु–म्हणजे असो.) अपहाराचा हा उद्योग म्हणे वर्षानुवर्षे चालला आहे. मोगलसराईचे हे वैशिष्ट्य टिकवण्याचा आपल्यापरीने प्रयत्न सगळ्या माजी रेल्वेमंत्र्यांनी केला आहे. त्यामुळे मोगलसराई हे आधुनिक भारतातले एक प्रेक्षणीय स्थळ होऊन राहिले आहे. मधू दंडवत्यांचा काटकसरी स्वभाव लक्षात घेता, मोगलसराईच्या एक रुपयांच्या दैनंदिन व्यवस्थापकीय खर्चात थोडी कपात अपेक्षित आहे.

काटकसरी असले तरी दंडवते कोंझे नाहीत. त्यांच्यापाशी चांगली कलमी रसिकता आहे. साधे पत्र लिहायचे तरी कागदीपाकिटाच्या आकाराची–पोताची, शाईची निवड मोठ्या कसोशीने केलेली असते. त्यांच्या कारकीर्दीत रेल्वेची समयसारिणी एखाद्या देखण्या आणि टवटवीत स्मरणिकेसारखी निघेल, अशी अनेकांची अपेक्षा आहे.

रेल्वे हा विषय मधू दंडवत्यांना नवा आहे. पण तो फार काळ नवा राहणार नाही. लौकरच आपल्या रेल्वेसंबंधी आवश्यक ती आणि अनावश्यक तीही, सगळी माहिती त्यांच्यापाशी जमा होईल. आणि ती हवी तेव्हा, आणि नको तेव्हाही, तत्परतेने सादर करून सर्व संबंधितांना ते अहिंसक पीडा देतील, असा मला विश्वास आहे. भारतीय रेल्वे लांबीच्या हिशेबात जगातली दुसऱ्या क्रमांकाची रेल्वे आहे; तिच्या लोहमार्गाची लांबी एक लाख किलोमीटरपेक्षा जास्त आहे; रेल्वेच्या नोकरवर्गाची (पुन्हा कामावर घेतलेल्या कर्मचाऱ्यांसह) संख्या चौदा लाख छपन्न हजार सातशे एकूणनव्वद आहे; दर वर्षी बावीस कोटी प्रवासी आणि वीस कोटी टन माल एवढ्यांची वाहतूक केली जाते; दररोज ९,५०० गाड्या धावत असतात; रेल्वेमार्गाच्या बाजूला तीन मीटर्स अंतराच्या आत कसलीही लागवड करू नये असा नियम आहे; या गोष्टी तर ते दिल्लीहून आल्या आल्या सांगायला लागले होते, थोडे थांबा. कोकण रेल्वे किती किलोमीटर्स लांबीची असेल, तिला खर्च किती येईल, मार्गावर बोगदे किती असतील, काठगोदाम येथे किती मालाची उलाढाल होते, मुंबई ते शिलाँग तिकिटाला काय पडते, इत्यादी प्रश्नांची उत्तरे नवे रेल्वेमंत्री लीलया देऊ लागतील. प्रत्येक गोष्टीत स्वतः लक्ष घालण्याची आदत असल्यामुळे, ज्या गाडीने मधू दंडवते प्रवास करत आहेत ती मध्येच नादुरुस्त झाली असता स्वतः दंडवत्यांनी ती दुरुस्त करून चालती केली. इतकेच नव्हे तर, पुन्हा चालू होताना स्वतः शिट्टी वाजवून हिरवे निशाणसुद्धा दाखवले, असे काही उदाहरण कानावर आले तर मला यत्किंचित आश्चर्य वाटणार नाही.

रेल्वेच्या बाबतीत आता काहीही घडू शकेल.

प्रत्येक स्थानकावर चालणारे घड्याळ असेल. प्रत्येक डब्यात फिरणारे पंखे असतील.

कोणत्याही वेळी, कोणत्याही गाडीत पाय पसरून बसण्याइतपत जागा असेल.

हे सगळे सहन करण्यासाठी मी माझ्या मनाची तयारी केली आहे.

—अनंतराव

# मुक्तिसंगराचा पन्नासावा स्मृतिदिन

## वीस मार्च १९७७

प्रा. राम बिवलकर

शुक्रवारी १८ मार्च रोजी सकाळी शंकरभाई गांधी जुन्या पोस्टाजवळ भेटले. म्हणाले,

'प्रोफेसरसाहेब रविवार सकाळ मोकळी ठेवा हं–नाही तर काढाल काहीतरी काम'

'काय आहे रविवारी?'

'अहो प्रधान मास्तर आणि बाबा आढाव ८।१० जणांना घेऊन महाडला येताहेत त्यादिवशी. रात्री फोन आला होता.'

'कशाकरता?'

'काही उलगडा झाला नाही बुवा. पण बाबा आढाव येताहेत म्हणजे 'एक गांव एक पाणवठा' आपल्याला मीटिंग लावायला हवी.'

'तुम्ही विचारले नाहीत का? उद्या दिवसभर मतदानाची गडबड राहणार, रविवारी सकाळी ८ वाजता मतमोजणी सुरू आहे. पाच वाजेपर्यंत निकाल फुटायचे नसले तरी, बातमी मिळवण्याचे उद्योग लोक चालूच ठेवणार. या धावाधावीत ती मंडळीही गुंतलेली असणार. मग रविवारी 'एक गांव एक पाणवठा' इथे आणण्यात काय हंशील?'

'काही कल्पना नाही बुवा. आज फोन येईल. कोण, केव्हा, कसे येताहेत ते समजेल. पण मीटिंगची दवंडी कधी देणार?'

'का देता येणार नाही? आता आणीबाणी शिथिल झालीयू, आणि परशुराम मंदिरात सभा घ्यायला काय हरकत आहे. तुम्ही तहसिलदाराना फोन करून सांगा.'

'ते बघूया. मंडळी येताहेत की नाही ते तर नक्की होऊ द्या. अहो रविवारी गुढीपाडवा आहे. इलेक्शनी दौऱ्यातून ही मंडळी मोकळी होऊन दोन दिवससुद्धा पुरते उलटले नाहीत. लगेच महाडचा दौरा कां समजत नाही!'

'पण येताहेत हे नक्की झाले की मला मात्र त्वरित कळवा.'

'कां?'

'अहो रविवारी २० मार्च. चौदार तळ्याच्या सत्याग्रहाला त्यादिवशी पन्नास वर्षे पूर्ण होतात. मुक्तिसंगराचा हा सुवर्ण महोत्सव फार मोठ्या प्रमाणात साजरा करायचे ठरले आहे. पण इलेक्शनच्या गदारोळात २० मार्चऐवजी ३ मे असा बदल त्या कार्यक्रमात करावा लागला. पण परवा २० मार्चला प्राचार्य रामटेके यांच्या नेतृत्वाखाली आम्ही कॉलेजची सर्व मंडळी त्यादिवशी आंबेडकर चौकाला आणि मनुस्मृती दहनभूमीला भेट देऊन हार–फुले समर्पण करून सुवर्ण महोत्सवी वर्षाची प्रतिकात्मक सुरवात करणार आहोत. ही मंडळी येणार असली तर त्यांच्या सोयीने हा कार्यक्रम घेऊन सुवर्ण महोत्सवाची सुंदर सुरवात साधता येईल.'

'मी कळवतो तुम्हाला' शंकरभाईंची एस्. टी. आल्याने ते घाईघाईने निघून गेले.

चौदार तळ्याच्या संबंधात काही लिहायचा संकल्प मनात धरून, त्याची रूपरेषा हाती घेऊन शनिवारी सकाळी मी नानासाहेब टिपणिसांकडे गेलो. म्हणालो 'नाना, या पुस्तकात 'चौदार तळ्याचे साक्षीदार' नामक एक प्रकरण मी घालणार आहे. चौदार तळे संगराविषयीची मी घेतलेली तुमची मुलाखत त्यात देणार आहे. त्यासाठी श्रीकांत सुतार तुमचे रेखाचित्र तयार करणार आहेत. पण आपल्या अल्बममधले गुळगुळीत रिटचिंग केलेले फोटो त्यांना नको आहेत. तुमचा नवा फोटो घ्यायला हवा. उद्या सकाळी ९ वाजता 'विश्वकर्म्याला' इथे बोलावू की, आपण त्याच्या स्टुडिओत जायचे?' दाढी–आंघोळ करून, कपडे करून हाती काठी घेऊन नाना कुठे बाहेर जायला निघाले होते. म्हणाले,

'आत्तासुद्धा मी बाहेर निघालो होतो. काही मित्रमंडळींना घरातून बाहेर काढल्याशिवाय ते मतदानाला जायचे नाहीत, म्हणून तिकडे निघालो होतो. तुम्हाला हवा तो फोटो आत्ता घेत असाल तर, अर्धा ताससुद्धा मी तुम्हाला देईन. पण उद्या सकाळचे जमायचे नाही.'

'का?'

'का काय?' अहो, उद्या नानासाहेब गोरे, बाबा आढाव ही मंडळी आणखी साताठजणांना बरोबर घेऊन इथे येताहेत. पुण्याहून सकाळी निघतो म्हणाले. म्हणजे १० वाजेपर्यंत येतील असे धरले तर, सकाळपासून ती मंडळी महाड सोडीपर्यंत मला वेळ कसा मिळेल?'

'काल शंकरभाई गांधी आणि बाबा येताहेत असे म्हणाले होते. नानासाहेब येताहेत का? त्यांना दिल्लीला जायचे नसेल का?'

'ते येताहेत एवढं मला कळलंय्. बरोबर कोण कोण आहेत, त्यांची नावे काही कळली नाहीत. पण माझा रविवार मोकळा नाही, एवढे खरे.'

मग मी विश्वकर्म्याला धरून आणून माझे आणि नानांचे फोटो जसे श्रीकांत सुतारांना काढून हवे होते तसे काढून देवविले. फोटो काढण्याचा विधी संपल्याबरोबर नाना काठी टेकत आपल्या आळी-

तल्या मतदारांना जागवायला त्वरित निघून गेले.

दुपारून नानासाहेब, बाबा, यदुनाथ थत्ते, अनिल अवचट, प्राचार्य ए. बी. शहा वगैरे मंडळी पुण्याहून मेटॅडोर काढून महाडला १०–१०॥ ला पोचताहेत हे नक्की झाल्यावर–१०॥ ते १२ गप्पाटप्पा–चर्चा–दुपारी १ वाजता प्रभुराम मंदिरात सभा–सभेनंतर पुण्याच्या पाहुणे मंडळींसह सर्वांनी मिरवणुकीने प्रथम आंबेडकर चौकात जाणे, ज्या घाटाच्या पायऱ्या उतरून, पन्नास वर्षांपूर्वी डॉ. आंबेडकरांनी पाणीबंदी तोडली होती त्या घाटाचे दर्शन, पाठीला आणि स्मृतिशीलेला हार अर्पण, त्यानंतर मनुस्मृती दहनभूमीवर जाऊन क्रांतिस्तंभाच्या शीलेला हार समर्पण, असा सारा कार्यक्रम नानांनी व प्राचार्य रामटेके यांनी ठरविला. कॉलेजचा कार्यक्रम अर्थातच या कार्यक्रमात सामावला गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी १०॥ वाजता नानांकडे गेलो. 'पुण्याची मंडळी आली नाना ?'

नाना आपल्या गोविंद निवासाच्या सोप्यावर बसले होते. म्हणाले,

'आलेत, असा फोन आला. शंकरभाईंच्या घरी आहेत. आज त्यांचा मुक्काम शंकरभाईंकडेच राहणार आहे. पण भोजनापर्यंत कार्यक्रम काय ते काही कळले नाही.'

'मी जातो शंकरभाईंकडे. तुम्हाला कळवतो.' मी माझी स्कूटर बाजारपेठेतल्या शंकरभाईंच्या घराकडे वळवली. दारातच तात्यांनी–शंकरभाईंच्या वडीलबंधूंनी–माझे स्वागत केले.

'या. मंडळी वर बसली आहेत.'

मी काळोख्या जिन्याने माडीवर गेलो. शंकरभाईंनी माझी ओळख करून दिली.

मी बैठकीत बसता बसता यदुनाथजींनी ओळख दिली. इतर मंडळींची करून दिली. प्राचार्य आणि सौ. ए. बी. शहा, अनिल अवचट, प्रा. व्ही. डी. देशपांडे, डॉ. नेने आणि डॉ. बाबा आढाव–

बाबा म्हणाले,

'कार्यक्रम काय ठरला आहे ?'

'तो प्रश्न मीच तुम्हाला विचारतोय्. फोनवरून आपण सगळी मंडळी निवडणुकांच्या गडबडीतही इतक्या तातडीने महाडला यायचे कसे ठरवले याचा उलगडा झाला नाही.'

'जानेवारी अखेरीला आम्ही मुक्तिसंग्रामाच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यासाठी पुण्यातल्या विविध संस्थांच्या सहकार्याने एक विचारविमर्ष आयोजित केला होता. त्याला तुम्हाला आणि प्राचार्य रामटेक्यांना निमंत्रण पाठविले होते. तुम्ही येऊ शकला नाहीत. त्याचवेळी आम्ही २० मार्च रोजी महाडच्या चौदारतळे नामक मुक्तितीर्थाला भेट द्यायचे ठरवले होते. निवडणुकांच्या गडबडीत कोण कोण निघणार–हे ठरेपर्यंत–आधी कळवता येईना. ग. प्र. येणार होते. दौलतराव भोसले येणार होते. पण जमले नाही.'

'आम्ही २० मार्च साजरा करणार होतोच. आपण आल्याने दुधात साखर पडली. दुपारी १-१॥ ला प्रभुराम मंदिरात सभा होईल आणि मग सर्वांनी मिरवणुकीने जाऊन चौदारतळ्याला आणि मनुस्मृतिदहनभूमीला भेट देऊन हार समर्पण–असा कार्यक्रम ठरला आहे.' तेवढ्यात नाना पुरोहित आले. आगतस्वागत झाले.

'मग बाबा म्हणाले, नानासाहेब आपण नाना टिपणिसांना प्रथम भेटून येऊ. मग पोटपूजा आणि मग सभा.'

'त्याआधी सरबत आलंय् ते घ्या. बारा-साडेबाराला पंगत बसवू. आज गुढीपाडवा आहे–साधुसंत घरा आले आहेत'–शंकरभाई म्हणाले.

'साधू आहेत, संत आहेत की नाही माहीत नाही' कुणीतरी म्हणाले. हशा पिकला. पेयपानानंतर मंडळी नानांकडे निघाली.

तिथे बाबा, नानासाहेब, नाना टिपणीस यांची तासभर चर्चा रंगली.

मुक्तिसंग्रामाला पन्नास वर्षे पुरी झाली. अस्पृश्यांना अनेक संरक्षणे मिळाली, सवलती मिळाल्या, नोकरीत अग्रहक्क मिळाले. त्यांची शिक्षणात प्रगती झाली–पण अस्पृश्यता गेली का ? याचे उत्तर नाही–आपण स्पृश्य मंडळींनी त्यासाठी काही केले का ? याचेही उत्तर नाही.

'अहो अस्पृश्यता जाचते ती अस्पृश्यांना. त्याची तोशीश सवर्णांना तर नाही. मग अस्पृश्यता नाहीशी व्हावी म्हणून सवर्णांनी प्रयत्न करण्याऐवजी अस्पृश्य पुढाऱ्यांनीच नेट लावायला नको का ?' कुणीतरी प्रश्न टाकला आणि म्हणाले–

'याचे उत्तरही नाही असेच आहे. बाबासाहेबांमागे रिपब्लिकन पक्षातील सुशिक्षित मंडळी आपल्या दुबळ्या बांधवांचे उत्थान करण्याऐवजी राजकीय दंगलीत सत्तास्पर्धेच्या कार्यात गुंतली. त्यातून त्यांची फाटाफूट झाली. अजूनही अस्पृश्यता दूर झाली नाही याची त्यांना ना खंत ना खेद ! ती मंडळी तर ब्राह्मण बनून राहिली आहेत.'

हे खरे असले, तरी हिंदू समाजाला अस्पृश्यता हा कलंक वाटतो की नाही ? अस्पृश्यतेमुळे एक कर्तृत्ववान गट मागे पडण्यात हिंदू समाजाचे बळ वाढते की घटते ? समाजातील माणसामाणसांत उच्च आणि नीच असे भेद मानणे आणि ते पाळणे योग्य आहे का ? याही प्रश्नांचे उत्तर 'नाही' असे असेल तर, स्पृश्यांना आपली जिम्मेदारी नाकारता येईल का ? बाबा तावातावाने बोलत होते. म्हणाले,

'नाना, तुम्ही गेली ५० वर्षे या चळवळीत झिजलात. अस्पृश्यता गेली नाही. स्पृश्यास्पृश्य नेत्यांना राजकारणात रस आहे– सामाजिक परिवर्तनात नाही याबद्दल तुम्हा मंडळींना काय वाटते ?'

'दुःख वाटते. खंत वाटते.'

'याबाबत काय करावे असे तुमचे मत आहे ?'

'मी डायरेक्ट अॅक्शनवाला माणूस आहे. मला वाटते अस्पृश्यांचे महारवाडे, चांभारवाडे मोडून टाकून त्यांना ब्राह्मणा गुजरांच्या शेजारी घरे बांधून द्यावीत – सक्तीने – जबरदस्ती करण्यावाचून इलाज नाही.'

'अस्पृश्यता सर्व समाजाच्या मनात घर करून आहे. जबरदस्तीने काही साधेल असे मला मुळीच वाटत नाही. अहो, माझ्या मुस्कटात मारून का तुम्ही मला अस्पृश्यता पाळू नको म्हणणार ? हा प्रश्न मनात परिवर्तन झाल्यावाचून सुटायचा नाही.' नाना पुरोहित म्हणाले.

' 'परिवर्तन' या गुळगुळीत शब्दावर माझा मुळीच विश्वास

नाही. परिवर्तन व्हायचे नाही. '– पिढ्यान्‌पिढ्या परिस्थिती बदलायची नाही.' नाना टिपणीस वैतागाने म्हणाले.

'नाना, गेल्या ५० वर्षांत परिवर्तन झाले नाही का ?'

'अहो सारी ढोंगबाजी. लिपसिम्पथी. स्पृश्यांनी यापेक्षा अधिक काही करायला हवे.'

'त्यांना तसे करायला भाग पाडण्यासाठी तरुणांच्या जथ्यांनी कांही वर्षे तरी या प्रश्नाला वाहून घेतले पाहिजे. स्पृश्यांनी प्रतिकात्मक अस्पृश्यता निवारण करण्याची ढोंगबाजी बंद केली पाहिजे.'

एवढ्यात शंकरभाईंच्या घरून पाने वाढल्याचा निरोप आला. मंडळी उठली.

दुपारी दीड-वाजता प्रभुराम मंदिर स्त्री-पुरुषांनी भरून गेले. घरात सणवार असूनही स्त्रीवर्ग बहुसंख्येने सभेला हजर होता. सभागृहाच्या खिडक्या दारांना आणि गॅलरीलाही डोळे फुटले होते. मी सभागृहात पाय ठेवताच नाना पुरोहित माझ्याजवळ आले. म्हणाले,

'दीड वाजला आहे. तुम्ही सभेचे प्रास्ताविक करून श्री. नानासाहेब टिपणीस यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारावे अशी सूचना मांडा. माधवभाई अनुमोदन देतील.'

मी रीतसर प्रास्ताविक करून २० मार्चचे महत्त्व कथन केले. पाहुण्यांची ओळख करून दिली. २७ सालच्या मुक्तिसंगराचे एक अध्वर्यु दलितमित्र श्री. नानासाहेब टिपणीस यांनी या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्यात कसे औचित्य आहे ते सांगितले. अनुमोदन दिले गेले. नानांनी अध्यक्षपद स्वीकारले. प्रास्ताविकात, त्यांनी आपला डायरेक्ट अ‍ॅक्शनचा मुद्दा मांडला. समाजातील जातींच्या भिंती तोडायला स्पृश्यांनी पुढे आले पाहिजे असे सांगितले. पुढे मोठ्या अभिमानाने म्हणाले,

'बावा, आमच्या भागात २७ च्या सत्याग्रहाचा उत्तम परिणाम झाला आहे. लोटीबंदी, भेटीबंदी, रोटीबंदी संपली आहे. महाडच्या पेठेत अस्पृश्यांना दुजाभावी वागणूक मिळत नाही.'

अध्यक्षांच्या प्रास्ताविकानंतर श्री. नानासाहेब गोरे यांच्या हस्ते भगवान् बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना हार समर्पण करण्यात आले आणि मग पाहुण्यांची भाषणे झाली.

'साधना' चे संपादक श्री. यदुनाथजी थत्ते प्रथम उभे राहिले. ते म्हणाले, 'डॉ. आंबेडकरांना एकदा एका पाश्चात्य माणसाने विचारले, 'व्हॉट ईज् इंडिया ?' डॉक्टर म्हणाले, 'भारत म्हणजे एक रेतीचा ढिगारा आहे – भाऊगर्दी आहे.'

'तो आहे तसाच कायम राहील का ?'

'तुम्ही आम्ही काय करू शकतो, त्यावर ते अवलंबून आहे.'

'आम्ही काय करावे, अशी आपली अपेक्षा आहे ?'

'समाजात सहभाग हवा. एकमेकांना समजून घ्यायला हवे. त्यासाठी एक व्यासपीठ हवे.'

'हे कसे करायचे ?'

'हे प्रबोधनातून साध्य होईल. संघटनांच्या वाटेने केलेल्या चळवळींतून साध्य होईल. समाजाच्या पुनर्संघटनांतून आणि एकात्मकतेच्या भावनेतून साध्य होईल.'

यदुनाथजी पुढे म्हणाले, 'एक गाव एक पाणवठा तर नाहीच, पण एक गाव एक मस्नवटाही इथे नाही ! मेल्यावरसुद्धा इथे जात सुटत नाही. तरुणांनी याची खंत बाळगून वरील कार्यात मनोमन सहकार्य द्यायचे ठरवले पाहिजे.'

यदुनाथजींनंतर प्राचार्य ए. बी. शहा म्हणाले,

'अठरा महिन्यांच्या आणीबाणीत तुमचे आमचे स्वातंत्र्य वर्ष–दीड वर्ष हरवले होते, त्याची केवढी टोचणी आपल्याला लागली होती ? सारा समाज घुमसत होता. पण ज्या अस्पृश्य मंडळींचे स्वातंत्र्य गेली हजारो वर्षे त्यांना नाकारले गेले आहे, त्याची खंत मात्र आपल्याला वाटत नाही. इथे डायरेक्ट अ‍ॅक्शन हवी. पण प्रबोधनावर विश्वास आहे. हा लढा सामाजिक व सांस्कृतिक समतावाद्यांमध्ये आणि सनातनी मंडळींत आहे. कॉंग्रेसमध्येही दोन्ही मतांची मंडळी आहेत आणि जनता पक्षातही आहेत. म्हणजे राज्ययंत्र बदलून हा प्रश्न सुटायचा नाही, प्रबोधन हवे.'

प्राचार्य शहांनंतर डॉ. बाबा आढाव बोलायला उठले तेव्हा श्रोत्यांनी टाळ्यांच्या गजराने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. 'एक गाव एक पाणवठा 'वाले बाबा श्रोत्यांना ठाऊक होते. त्यांचे भाषण ऐकायला मंडळी उत्सुक दिसली. बाबांनी सुरुवात केली. म्हणाले,

'आज २० मार्च १९७७. आज इथे यायला मिळाले, नानांसारख्या त्या चळवळीतल्या अध्वर्यूंचे दर्शन घडले, चौदारतळे आणि मुक्तिभूमीलाही नंतर भेट द्यायची आहे–मला धन्य वाटते. मन एकदम उडून पन्नास वर्षांपूर्वीच्या २० मार्चचे चित्र डोळ्यापुढे साकार करण्याचा प्रयत्न करीत आहे. पन्नास वर्षांपूर्वी गाडीतळावरच्या परिषदेत घेतलेला तो निर्णय, ती मिरवणूक, चौदारतळ्याच्या घाटावर बाबासाहेबांनी तोडलेली ती पाणीबंदी–सारे दृश्य रोमांच उभे करणारे. त्या घटनेला ५० वर्षे उलटली तरी, नाना टिपणिसांसारखी माणसे आज आपल्यात आहेत–केवढा भाग्याचा दिवस !

पण गेल्या पन्नास वर्षांत घडले काय ? चळवळीचे पाऊल पुढे पडले का ? मनुस्मृती जाळली तरी अस्पृश्यता जळली का ? चिमणी गेली हजारो वर्षे आपले घरटे एकाच पद्धतीने, एकाच आकाराचे बांधीत आली आहे. माणसांच्या घरांचे रूप, रंग, आकार, प्रकार दर दोन पिढ्यांनी बदलत आला. म्हणून माणूस चिमणीहून भिन्न आहे. बदल–बुद्धिपुरस्सर बदल करणे त्याला शक्य होते–म्हणून माणुसकीचा दाखला द्यायचा. पण अशा परिवर्तनप्रिय माणसाने गेली हजारो वर्षे–आपला समाज तसाच परंपरागत ठेवावा ? विषमता का पोसावी ? माणसामाणसांना समान वागणूक का न द्यावी ? कुटुंबातही आपण विविध व्यक्तींना विषम न्याय का देतो? याचे उत्तर मात्र मिळत नाही.

'एक गाव एक पाणवठा' ही चळवळ फक्त अस्पृश्यांना पाणी मिळवून देण्याची नाही. तिची व्याप्ती फार मोठी आहे. या देशातील जातिव्यवस्थेलाच मूठमाती देण्याचा हा प्रश्न आहे. दलित प्रश्न म्हणजे बुद्धांचाच फक्त प्रश्न नव्हे. तो सर्वच दलित जातींचा–नव्हे सर्वच दुर्बल समाजांचा प्रश्न आहे. दलितांचे प्रश्न दलितांनीच सोडवले पाहिजेत, ही गोष्ट जितकी खरी तितकीच स्पृश्यांनी दया म्हणून या प्रश्नाकडे पाहून निभणार नाही–काही तरी प्रत्यक्षात करावे लागेल. आकारांची पूजा या देशात खूप होते. पण आकारांची पूजा करून विचारांचा मुडदा इथे पाडला जातो. मुक्तिसंग्रामाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात–महाराष्ट्रातील निदान ५० खेड्यांत जाऊन

तरुणांच्या ५० जथ्यांनी दलितांचे प्रश्न समजावून घ्यावेत आणि ते सोडविण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत, असे आम्ही ठरवले आहे.

धर्मनिरपेक्ष-ऐहिक राज्याचा आम्ही डंका पिटतो. समाजवादाच्या आणि विज्ञाननिष्ठेच्या घोषणा करतो. जातीपातींना समाजवादात स्थान आहे ? जात विज्ञानात बसते ? ५० वा क्रांतिदिन ही तुम्हाआम्हाला शरमेची आणि प्रेरणेचीही बाब आहे. तरुणांनी याचा विचार करावा. प्रतिज्ञा घ्यावी आणि कामाला लागावे.

बाबांनी-म. ज्योतिबा फुल्यांचे ' निर्मिकाने जर एक पृथ्वी केली ' हे गीत गावून आपले भाषण संपवले.

रात्री दिल्लीला जायचे असूनही नानासाहेब गोरे या समारंभासाठी महाडला आले होते. ते म्हणाले,

' १९३० साली महात्माजींनी एक चिमूटभर मीठ उचलले. त्याने सारा देश ढवळून निघाला. पण १९२७ साली डॉ. आंबेडकरांसारख्या एका स्वयंप्रज्ञ माणसाने चौदार तळ्याचे चुळकाभर पाणी उचलले आणि एका नव्या सामाजिक क्रांतीला जन्म दिला. त्याची फारशी दखल गेल्या पन्नास वर्षातही तुम्ही आम्ही घेतली नाही. आम्ही सामाजिक प्रश्नापेक्षा राजकीय प्रश्नांत रस घेणारी माणसे आहोत. सामाजिक समतेवाचून समाजाच्या विकासाला पायबंद बसतात हे आपण समजूनच घेतले नाही. हिंदू समाज एका उंच मनोऱ्यासारखा आहे. या मनोऱ्याच्या दिविध मजल्यावर जायला यायला जिने मात्र नाहीत. जो ज्या मजल्यावर जन्मतो तिथेच राहतो. इतर मजल्यावरील मंडळींशी त्याचा संपर्कही येत नाही. अभिसरण बंद आहे. या देशातील ६० टक्के जनता दारिद्र्य रेषेच्या खाली आहे. ती सारीच दलित आहेत. त्या साऱ्यांचे प्रश्न आपण आपले म्हटले पाहिजेत. तरुणांनी या वर्षप्रतिपदेच्या दिवशी तसा निश्चय करायला हवा. स्त्रीवर्गाने पुढील पिढीला अस्पृश्यता घालवायला शिकवावे. '

श्री. अनिल अवचट यांनीही बोलावे म्हणून श्रोत्यांची मागणी होती, पण पुणेकर पाहुण्यांना लवकर परतायची घाई असल्याने, अध्यक्ष समारोपार्थच उभे राहिले. नाना म्हणाले, ' एकदा डॉक्टरांना एकाने विचारले, ' हिंदूधर्म म्हणजे काय आहे ? ' ' एक जंगल आहे. ' ' मग तुम्ही त्या जंगलाचे माळी का होत नाही ? ' मी माळी होऊ शकत नाही. कारण मी महार आहे. मी शंकराचार्य कसा होणार ? ' डॉक्टरांची खंत आपण जाणून घेतली पाहिजे. त्यानी देशाला अनेकवार सावरले आहे. ते ऋण म्हणून तरी त्यांचे कार्य पुढे चालवले पाहिजे. '

आभारप्रदर्शन, पाहुण्यांना पुष्पगुच्छ देऊन झाल्यावर-सर्व श्रोत्यांनी मिरवणुकीने प्रथम चौदार-तळ्याच्या दक्षिण-पश्चिम कोपऱ्यावरील घाटावर जायचे आहे व तेथून-हार समर्पण करून-क्रांतिभूमीवर जायचे आहे अशी घोषणा झाली. तीनचारशे स्त्रीपुरुषांचा तो समाज-चौदारतळ्याची वाट चालू लागला. पुणेकर पाहुणे, प्राचार्य, प्राध्यापक, गावकरी, सारे त्या, मिरवणुकीत सामील झाले होते. बाबा आढाव मधून मधून घोषणा देत होते-म. ज्योतिबा फुले की जय ! डॉ. बाबासाहेब आंबेडकरकी जय-दोही ठिकाणी-हार-पुष्पे समर्पण झाल्यावर मंडळी पांगली. पाहुणे नाना पुरोहितांकडे चहा घेऊन पुण्याच्या वाटेला लागले.

योजूनसुद्धा करता येणार नाही एवढा सुविहीत कार्यक्रम पार पडल्याबद्दल साऱ्यांनाच बरे वाटले. मुक्तिसंगराच्या सुवर्णमहोत्सवाची सुरवात सुयोग्य झाली होती. ☐


☆ ☆

दुसऱ्या आवृत्तीच्या वाटेवर असलेली

**राजहंस प्रकाशने**

☐ **सांगत्ये ऐका**
हंसा वाडकर
(तिसरी आवृत्ती)

☐ **टॉलस्टॉय एक माणूस**
सुमती देवस्थळे

☐ **श्रीग्रामायन**
श्री. ग. माजगावकर

☐ **शतपावली**
रवींद्र पिंगे

☐ **पुरंदऱ्यांची दौलत**

☐ **पुरंदऱ्यांची नौबत**
ब. मो. पुरंदरे

☆ ☆

पुस्तके

# मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र : पुनर्विचार

## धीटपणाने केलेली डोळस चर्चा

निशिकांत मिरजकर

कलासमीक्षा हे एक सचेतन शास्त्र आहे. सचेतन अशासाठी की, यातील सिद्धान्त आणि नियम हे कधी साचेबंद व ठरीव बनू शकत नाहीत. तसेच ते कधी त्रिकालाबाधित अंतिमही बनू शकत नाहीत. कोणीतरी एखादा विचारवंत एक नवा विचार घेऊन पुढे सरसावतो, त्या विचारातून सिद्धान्तांची एक नवी चौकट तयार होते, कलासमीक्षेतील काही प्रश्नांची अंतिम उत्तरे गवसल्यासारखी वाटतात. परंतु कालांतराने वेगवेगळ्या अंगांनी प्रकाशझोत टाकल्यावर काही नवेच पैलू उजळले जातात, काही नवे प्रश्न उभे राहतात आणि सिद्धान्तांच्या चौकटीचा अपुरेपणा लक्षात आणून देणारे विचारमंथन चालू होते. एका परीने हे विचारमंथन अपरिहार्य आणि आवश्यक असते. कारण त्यातच भावी क्रांतिकारक विचारवंताच्या आगमनाची पुसट चाहूल असते. असे नवेनवे विचारमंथन होत राहणे आणि प्रस्थापित सिद्धान्त सातत्याने घासूनपुसून नवे आकार घडवीत राहणे हे कलासमीक्षेचे सचेतनत्व.

मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राने मराठी समीक्षेला तर एक नवी दृष्टी दिलीच, पण काहींच्या मते जागतिक कलासमीक्षेतही त्यांनी मोलाची भर घातली. ('सौंदर्यशास्त्रातील माध्यमाच्या कल्पनेचे त्यांनी केलेले विश्लेषण आणि ललित वाङ्मयाच्या माध्यमाविषयीचे त्यांनी केलेले संशोधन ही जागतिक कलामीमांसेतील एक क्रांतिकारक घटना आहे.' – गो. वि. करंदीकर, 'परंपरा आणि नवता') मर्ढेकरांच्या नव्या सिद्धान्तांनी तत्पूर्वीच्या कलासमीक्षेचे जडत्व घुसळून काढले व एक नवी वाट उजळून निघाली. कलेच्या मूल्यमापनाचे अंतिम सिद्धान्त अखेर एकदाचे सापडले अशी काही भाबड्या समीक्षकांची बालंबाल खात्री होऊन चुकली आणि त्यांना हायसे वाटले.

तथापी स्तिमिततेचा पहिला भर ओसरल्यावर कलासमीक्षेच्या सचेतनत्वाच्या अपरिहार्यतेने पुन्हा विचारमंथनाला प्रारंभ झाला आणि मर्ढेकरांनी मांडलेले नवे विचार पुन्हा पारखून पाहिले जाऊ लागले. असे करताना त्यांतील कित्येक त्रुटी आणि उणीवा धाऊकपणे नजरेस येऊ लागल्या, आणि काही दुर्लक्षित बलस्थानेही उजळून निघाली. मर्ढेकरांच्या सौंदर्यमीमांसेचे तपशीलवार खंडण करण्यासाठी प्रा. प्रभाकर पाध्यांना स्वतंत्र ग्रंथ लिहावा लागला, तर मर्ढेकरांचे अपुरे विचार पुसून टाकून स्वतंत्रपणे सौंदर्यमीमांसेची नेटकी प्रतिष्ठापना करण्यासाठी डॉ. रा. भा. पाटणकरांचा ग्रंथराज अवतीर्ण झाला.

'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र : पुनर्विचार' या छोटेखानी पुस्तकातही अशाच सर्वांगीण विचारमंथनाचा प्रयत्न धीटपणाने केलेला आहे. नुसती धिटाई कधी कधी उच्छृंखल उताविळीनेही निर्माण होते. परंतु प्रस्तुत पुस्तकाची भूमिका डोळस चिकित्सेची व अभ्यासपूर्ण वजनदारपणाची आहे. पुस्तकात एकूण आठ लेख आहेत. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राची तात्त्विक भूमिका रा. भा. पाटणकरांनी तपासून पाहिली आहे. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राची मानसशास्त्रीय बैठक प्रा. कि. मो. फडके यांनी विशद केली आहे. प्रा. अशोक रानडे यांनी मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राचा संगीताशी, व प्रा. संभाजी कदम यांनी त्याचा दृश्यकलेशी अनुबंध शोधण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. व. दि. कुलकर्णी यांनी मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र व वाङ्मयकला यांच्या परस्परसंबंधांची चिकित्सा केली आहे. मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र साहित्यसमीक्षापद्धतीस कितपत नि कसे उपयुक्त ठरेल, याचा विचार डॉ. आनंद यादव यांनी केला आहे. मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र व वाङ्मय यांच्यातील नाते प्रा. प्रभाकर नारायण परांजपे यांनी चर्चिले आहे आणि मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रावरील विविध मतांतरांचा परामर्ष कमलाकर दीक्षित यांनी घेतला आहे.

पुस्तकाच्या प्रस्तावनेत कमलाकर दीक्षित यांनी समीक्षेची प्रक्रिया स्पष्ट करून समीक्षेच्या विविध उपपत्तींचे सार सांगणारे सूत्ररूप, नेटके विवेचन केलेले आहे. आशयनिष्ठ आणि आकृतिनिष्ठ समीक्षांच्या सर्व उपपत्तींचा समावेश या विवेचनात आहे; तसेच मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राची भूमिका आग्रहीपणाने, परंतु निरभिनिवेश वृत्तीने मांडलेली आहे. संपूर्ण पुस्तकातील आठही लेखांमध्ये आलेल्या प्रतिपादनाचा सूत्रबद्ध सारांश अतिशय नीरसपणे प्रस्तावनेत दिलेला आहे. त्यावरून संपादनाची सुव्यवस्थित दृष्टीही लक्षात आल्यावाचून राहत नाही.

पुस्तकातील पहिलाच, म्हणजे रा. भा. पाटणकरांचा लेख काहीसा धक्कादायक आणि विचार करायला लावणारा आहे. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राची परंपरा शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला आहे. मर्ढेकरांची समीक्षाविषयक भूमिका वास्तववादी आहे असे मानले जाते. परंतु खरे म्हणजे ती कांटच्या विश्वचैतन्यवादी परंपरेत बसणारी आहे, असे पाटणकरांनी सिद्ध केले आहे. मर्ढेकरांनी स्वतःला विश्वचैतन्यवादी नसल्याचे वारंवार म्हणवून घेतलेले असल्यामुळे पाटणकरांचा हा निष्कर्ष धक्कादायक आहे. परंतु अतिशय जाणतेपणाने त्यांनी याची चर्चा केलेली आहे. विश्वचैतन्यवादी आणि कांट यांचा सूक्ष्म अभ्यास त्यातून जाणवल्याखेरीज राहत नाही. पूर्वग्रहरहित कृतीने मातबर सिद्धान्त विचारतर्काच्या धारेवर पारखून घेण्याची तयारी व क्षमता लेखकाच्या ठायी असल्याचे सहजपणे दिसून येते. त्यामुळे या लेखाला स्वतःचे मूल्य प्राप्त झाले आहे. अर्थात विवेचनाच्या ओघात काही गोष्टी सोयीस्करपणे गृहीत धरून पाटणकरांनी मुसंडी मारलेली आहे, अशा ठिकाणी मतभेदाची प्रश्नचिन्हे वाचकाच्या मनात उभी राहणे साहजिक आहे. (कदाचित लेखाच्या मर्यादित पृष्ठसंख्येचा आवाकाही याला कारण असेल!) पण एकूण लेख

विचार करायला लावणारा आहे, हे निश्चित.

कि. मो. फडके यांचा लेख वाचताना मला असे वाटत राहते की, या लेखाला 'पाध्यांचे खंडण' असे नाव का दिले नाही? सबंध लेखाची बांधणीच अपेक्षेपेक्षा वेगळ्या दिशेने झालेली आहे. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राची मानसशास्त्रीय बैठक लेखकाला स्पष्ट करायची आहे. परंतु लेखाच्या पहिल्या वाक्यापासून अखेरच्या वाक्यापर्यंत पाध्यांचे आक्षेप कसे अग्राह्य आहेत हे स्पष्ट करणे हेच विवेचनाचे केंद्र राहिले आहे. त्यामुळे फडके यांचे निष्कर्ष प्रामाणिक असले, तरी ते योग्य न्याय देऊन मांडले गेलेले नाहीत.

शुद्धतम संवेदना ही संगीताचा कच्चा माल असल्याने संगीत ही कला सर्वश्रेष्ठ, या मर्ढेकरी भूमिकेतील मोहकपणा आणि सदोषता या दोन्हींची मुद्देसूद चिकित्सा अशोक रानडे यांनी केली आहे; आणि मूलभूत संवेदनांच्या अर्थमुक्ततेवर आधारलेले मर्ढेकरांचे संगीताचे उन्नयन संगीताच्या संकुचित कल्पनेवर आधारलेले आहे असा निष्कर्ष काढलेला आहे. अशोक रानडे यांचे विवेचन तर्कशुद्ध असून त्यांची विचारांची पद्धती स्वच्छ व मूलगामी आहे. मर्ढेकरांच्या प्रज्ञेविषयी योग्य तो आदर कायम ठेवूनही त्यांच्या चुकांचे विश्लेषण त्यांनी परखडपणे केलेले आहे. मर्ढेकरांनी घडविलेले लयतत्त्वाचे नियम दृश्यकलांच्या ओझ्याने वाकलेले आहेत आणि खऱ्या अर्थाने Basic ही नव्हेत; हे त्यांचे मत विचार करायला लावणारे आहे.

संभाजी कदम यांचा लेख बराच दीर्घ आहे. 'आजच्या सुखवस्तू, सुसंस्कृत मानवाची कलासक्ती, आदिमानवी कलासक्तीच्या तुलनेत कदाचित कणभर कमीच ठरेल.' अशांसारखी काही वादग्रस्त विधाने त्यांच्या लेखात आढळतात. अशा विधानांची स्पष्टीकरणेही बिनबुडाची वाटतात. जे सिद्ध करण्याची जबाबदारी उचलायला हवी, तेच बिनधास्तपणे गृहीत धरण्याचा सोयिस्करपणा अशा ठिकाणी जाणवतो. पण अशा वादग्रस्त विधानांकडे दुर्लक्ष केले (आणि असे दुर्लक्ष करता येण्यासारखी ती प्रतिपादनाच्या केंद्रापासून दुरावलेली आहेत) तर, लेखकाचा सखोल व्यासंग आणि विचारांचा नेमकेपणा या दीर्घ लेखातून जाणवल्यावाचून राहत नाही. संस्कृत आणि पाश्चात्य टीकाशास्त्रातील मान्यवर सिद्धान्त चिकित्सक दृष्टीने तळापासून तपासून आपली मते त्यांनी बनविलेली आहेत. आणि अशा पक्क्या नि व्यापक पायावर मर्ढेकरांच्या कर्तबगारीचे मूल्यमापन केलेले आहे. मर्ढेकरांच्या संकल्पनांचे (विशेषतः सौंदर्यभावना या संकल्पनेचे) महत्त्व त्यांनी मोकळेपणाने मान्य केले आहे. तरीही मर्ढेकरांच्या विचारातील गोंधळावर त्यांनी अचूक बोट ठेवले आहे. निकोप मूलभूत भूमिका घेऊनही मर्ढेकरी सौंदर्यशास्त्राच्या व्यूहाचे बांधकाम कच्चे का राहिले, या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. त्यांची दुर्लक्षित उपांगे पुढे आणली आहेत. ग्रहमाध्यम किंवा Binding material या चित्रकलेतील संज्ञेच्या कक्षा स्पष्ट करून मर्ढेकरांनी त्याकडे कसे दुर्लक्ष केले ते त्यांनी सोदाहरण दाखवून दिले आहे. मर्ढेकरी विवेचनाचा प्रवाह कोणत्या दिशेने गेला असता त्याला परिपूर्तता आली असती तेही सांगण्याचा विधायक प्रयत्न या लेखात झालेला आहे. 'स्वतः एक युगप्रवर्तक कवी असूनही कलानुभवाचे पुरेसे आकलन मर्ढेकरांना आले नाही. कलेबद्दलच्या आत्यंतिक आदराने प्रवृत्त झालेल्या त्यांच्यामधील सौंदर्यमीमांसक चांगला आराखडा घेऊन शास्त्र घडविण्यास निघाला; आणि तत्त्वज्ञानाच्या परिभाषेत ते मांडण्याच्या भरात कलेतील चैतन्यालाच मुकला आणि पर्यायाने त्याने स्वतःमधील कवीला अंतर दिले... कवी मर्ढेकर व सौंदर्यमीमांसक मर्ढेकर हे एकमेकांचे प्रतिस्पर्धीच ठरले.' अशा भाषेत मर्ढेकरांचे नेमके दर्शन घडविण्याचा नेमका प्रयत्न लेखकाने केला आहे. दृश्यकलेच्या पातळीवरून 'मर्ढेकरी विचारांचा छेद घेताना शुद्ध वाङ्मयीन भाष्यकारांपेक्षाही अधिक नेमकेपणा संभाजी कदम यांच्या या लेखात आलेला दिसावा, हे एक सुखद आश्चर्यच.

व. दि. कुलकर्णी यांनी मर्ढेकरांच्या Arts and man या पुस्तकाच्या प्रस्तावनेचे महत्त्व विशद करून, त्या प्रस्तावनेत मर्ढेकरांनी सांगितलेल्या आत्मनिवेदनाच्या आधारे त्यांच्या सौंदर्य–शास्त्राचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रस्तावनेत मर्ढेकरांनी आत्मप्रतीती म्हणून जे सांगितले तेच शास्त्रीय रूपाने सांगण्याचा त्यांनी पुढे सतत प्रयत्न केला असा सिद्धान्त त्यांनी मांडला आहे.

### मर्ढेकरांच्या सिद्धान्ताचे ॲप्लिकेशन

संवाद, विरोध, समतोल या मर्ढेकरी लयतत्त्वांची चिकित्सा करताना मूळ अनुभवाचेच हे स्वभावधर्म असतात असा विचार आनंद यादव यांनी मांडला आहे. अनुभवाचे हे मूलभूत वैशिष्ट्य लक्षात ठेवले की, मर्ढेकरांची साहित्यसमीक्षापद्धती समजावून घेताना होणारे अनेक गैरसमज टळतील असे त्यांना वाटते. 'अनुभवाची मांडणी कलावंत लयतत्त्वानुसार करतो, तर्कप्रमाणे करीत नाही' यांसारखी मर्ढेकरांची वाक्ये त्यातील एकांतिकता बाजूला ठेवून नीट समजावून घ्यावी लागतात, असा इशारा यादव देतात. लयतत्त्वांचे उपयोजन वाङ्मयीन समीक्षेत करताना व्यक्तिनिष्ठेच्या पोटातील व्यक्तिनिष्ठा तशी स्वीकारावी लागते, त्याचे सोपपत्तिक विवेचन उदाहरणाच्या साह्याने करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. समीक्षकाला जाणवलेले लयसंबंध दाखवून दिल्यावर साहित्यसमीक्षा संपत नाही; उलट ती इथे सुरू होते असे त्यांचे म्हणणे आहे. लयतत्त्वापाशी सुरू झालेली समीक्षा वाङ्मयीन महात्मतेपाशी येऊन पूर्ण होते असे मर्ढेकरांचे अनुसंधान यादवांनी दाखविले आहे. मर्ढेकर आकृतिवादी की, आशयवादी याचा ऊहापोह करताना, "वास्तविक मर्ढेकर हे सौंदर्यवादी आहेत. आणि सौंदर्यात कलावस्तूच्या आकृतीपासून तो कलावस्तूच्या आशयापर्यंत सर्वच एकात्मतेने सामावलेले असते" असा समन्वय साधण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. कलेचे अंतिम ध्येय सौंदर्यानुभव देणे हे मर्ढेकरांनी मानल्यामुळे साहित्यकृतीत येणारे उपरे अलंकार, वर्णने, कलाटण्या इत्यादी दुय्यम बाबी तर नाहीशा झाल्याच; पण विवेचने, जीवनभाष्ये, तत्त्वाभिनिवेश येणेही नाहीसे झाले, असा यादवांचा दावा आहे. कलाकृतीतील कथानक, पात्रे रस, वातावरणनिर्मिती यांचासुद्धा लयसंबंधाच्या संदर्भात विचार करता येतो, असे दाखविण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. एकूण, मर्ढेकरांच्या सिद्धान्तांचे ॲप्लीकेशन आणि त्याकरता केलेले बरेचसे सिंप्लीफिकेशन असे यादवांच्या लेखाचे स्वरूप आहे.

प्रभाकर नारायण परांजपे यांनी

मर्ढेकरांच्या टीकालेखनाचे चार विभाग केलेले आहेत, तथापी 'त्यांच्या प्रत्येक निबंधामागे त्यांच्या 'संपूर्ण साहित्यमीमांसेचा' संदर्भ आहे,' असे म्हणले आहे. नाद व ज्ञानात्मक अर्थ यांच्याकडे झालेल्या दुर्लक्षामुळे मर्ढेकरांची प्रात्यक्षिके एकांगी, यांत्रिक उतरली आहेत, असे ते म्हणतात. मराठी समीक्षेत मर्ढेकरांच्या सौंदर्यमीमांसेतील संज्ञा वापरल्या गेल्या तरी, लयतत्त्वांचा प्रत्यक्ष वापर फार अल्प प्रमाणात व बऱ्याचशा ढोबळ पद्धतीने झाला, हे त्यांचे विधान बरोबरच आहे. पण लयतत्त्वे ही साहित्यसमीक्षेतील एकमेव कसोटी म्हणून मर्ढेकरांना अभिप्रेत नव्हती; तर घटकांची समीक्षा आत्मनिष्ठा, तादात्म्य इ. मानसशास्त्रीय – समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून करावी व घटकांच्या रचनेची समीक्षा लयतत्त्वान्वये करावी, अशी व्यवस्था मर्ढेकरांना अभिप्रेत असावी, असे ते मानतात, तेव्हा इतके ढोबळ व स्पष्ट विभाजन मुळात शक्य व इष्ट आहे काय हा मतभेदाचा प्रश्न संभवतो. कारण त्यांनीच श्री. प्रभाकर पाध्ये यांच्या प्रश्नातील वदतोव्याघात दाखविताना भावार्थ आणि लय यांचे एकजिनसीपण आग्रहाने प्रतिपादलेले दिसते. मर्ढेकरांच्या १९४२ मधील 'न्हिदम इन लिटरेचर' आणि १९४६ मधील 'वाङमय आणि सौंदर्यशास्त्र' या दोन व्याख्यानांची तुलना करून, मर्ढेकरांच्या समीक्षापद्धतीत बदल कसा व कुठे झाला हे मात्र, त्यांनी साधार स्पष्ट केले आहे, त्यात नावीन्य आहे.

### मुद्देसूद, नेटका आढावा

मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र नाकारणारे प्रा. मे. पुं. रेगे, मर्ढेकरांच्या गफलती नेमक्या टिपणारे डॉ. रा. भा. पाटणकर, मर्ढेकरांना शास्त्राधारे विरोध करणारे प्रा. नरहर कुरुंदकर, मर्ढेकरांची गृहीते तपासून त्यांची उपपत्ती समीक्षेला लागू पडत नाही असा निष्कर्ष काढणारे प्रा. म. द. हातकणंगलेकर, मर्ढेकरांचा अपुरेपणा दाखविणारे प्रा. संभाजी कदम, संपूर्ण मर्ढेकर–विचारावर तर्काचा प्रकाश टाकणारे प्रभाकर पाध्ये, इत्यादी टीकाकारांच्या विवेचनांचा अतिशय मुद्देसुद व नेटका आढावा प्रा. कमलाकर दीक्षित यांनी शेवटच्या लेखात घेतला आहे. मर्ढेकरांच्या विशुद्ध संवेदनांच्या कल्पनेच्या निराधारपणापासून सौंदर्याच्या वस्तुनिष्ठेबद्दलच्या त्यांच्या निष्फळ दाव्यापर्यंत विविध आक्षेप मर्ढेकरांच्या टीकाकारांनी घेतले असले, तरी 'लयतत्त्वावरचे त्यांचे आक्षेप मात्र निर्णायक वाटत नाहीत,' असे मत दीक्षितांनी प्रदर्शित केले आहे.

अशा तऱ्हेने, एका अतिशय महत्त्वाच्या विषयाची धिटाईने, परंतु डोळसपणाने केलेली तात्त्विक चर्चा या पुस्तकात पहायला सापडते. त्यातील कित्येक विधाने वादग्रस्त असतील, काही ठिकाणी विस्कळीत मांडणी असेल, पण पुस्तकाचा छोटेखानी आकार लक्षात घेता ते क्षम्य मानावे लागेल. या पुस्तकाच्या वाचनाने मर्ढेकरांच्या कलाविषयक सिद्धान्तांवर वेगवेगळ्या अंगांनी प्रकाशझोत पडत राहतात आणि वाचकाचे मन विचारप्रवण होते, हे खरे महत्त्वाचे आहे. आणि तयार मतांचे छापे पुरविण्यापेक्षा विचारप्रवृत्त करणारे साहित्य केव्हाही विकासाच्या दृष्टीने आवश्यकच असते ! ◻

'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र : पुनर्विचार
संपादक : कमलाकर दीक्षित
युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर २.
पृष्ठे ११६, किंमत बारा रुपये.

---

## I AM NOT AN ISLAND

An experiment in autobiography–
By Khwaja Ahmad Abbas—
( Vikas Publishing House, Pvt. Ltd, pages 551, Rs·45/–

---

ख्वाजा अहमद अब्बासचे नाव लेखक म्हणून फारसे प्रसिद्ध नाही परंतु सिनेमा डायरेक्टर म्हणून त्याचे नांव बऱ्याच लोकांना माहिती आहे. त्यांनी उर्दू, इंग्रजी व हिंदी या तिन्ही भाषेत एकूण साठ पुस्तके लिहिली आहेत. इंग्रजीमध्ये 'Return Of The Red Rose' व 'That Woman' ( Indira Gandhi ) ही दोन पुस्तके बरीच प्रसिद्ध झाली.

त्यांच्या 'शहर और सपना' या चित्रपटाला राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले होते. 'ब्लिटझ' मध्ये तर त्यांचे 'The last page' हे सदर ३० वर्षेपर्यंत चालू होते.

या पुस्तकात त्यांचे बालपण, ते अलिगढ विद्यापीठात असताना, पत्रकाराचे ट्रेनिंग घेत असताना, नेहरू, म. गांधी, शेख अब्दुल्ला वगैरे नेत्यांशी त्यांचा झालेला संपर्क, ते चीन, रशिया, अमेरिका व इतर ठिकाणी जाऊन आले त्याचे वर्णन व इतर अनेक गोष्टी आहेत.

प्रस्तावनेत अब्बास लिहितात की, हे पुस्तक त्यांनी ६० व्या वर्षी लिहावयास घेतले. थोड्या दिवसांनंतर पुस्तक अर्धे संपले खरे, पण तोवर अब्बासांची प्रकृती बिघडली. त्यांना डोळ्याला मोतिबिंदू झाला व त्यांना अर्धांगवाताचा झटका आला. आता मोतिबिंदू म्हणजे आपल्याला साधी गोष्ट वाटते, पण मोतिबिंदूमुळे डोळ्यावाटे मेंदूपर्यंत प्रकाश पोचण्याचे काम थांबते व सबंध शरीराच्या रसायनक्रियेत बदल घडतो व त्यामुळे चयापचय क्रियाच बिघडते असे 'The Brain Revolution' या पुस्तकात हे लिहिले आहे. या पुस्तकाचा परिचय मी वाचकांना करून दिला आहेच.

यानंतर पुस्तकाचा पुढचा भाग त्यांनी तोंडी सांगून दुसऱ्याकडून लिहून घेतला.

चित्रपटाचा समीक्षक म्हणून अब्बासने १० वर्षात ३००० चित्रपट पाहिले! त्याच्या या आत्मचरित्रात खालील लेखकांचे उल्लेख आहेत:–Emil Zola, P. G. Woodhouse, Edgar Wallace, Voltaire, Jean Paul Sartre, Edgar Snow, George Bernard Shaw, Rudyard Kipling, Rosseau, Romain Rolland, Somerset Maugham, Manohar Malgaonkar, Lin Yutang Sinclair Lewis, John Gunther, Ernest Hemingway, Charles Dickens, G. K. Chesterton वगैरे. यांवरून अब्बासचे आत्मचरित्र निश्चितच वाचनीय असेल असे वाटते व ते तसे आहे.

सॉमरसेट मॉम व जॉन गुंथर यांची त्यांनी मुलाखत ताज हॉटेलमध्ये घेतली होती. ती पुढे त्याने 'The Lion and The Lamb of Literature' या नावाखाली छापली. अर्थात त्याने 'लाजाळू',

'तोतरा' मॉम यास Lamb नाव दिले. खरे म्हणजे मॉमने जेवढा मनुष्यस्वभावाचा वेध घेतला होता, मॉमचे नाव जेवढे लोकप्रिय होते, तेवढे जॉन गुंथरचे नव्हते. पण मनुष्य असा एकदा हॅन्डीकॅप झाला की, त्याला या ना त्या कारणाने अनेक गोष्टी सहन कराव्या लागतात. निव्वळ तो खुजा, तोतरा, लाजाळू होता म्हणून अब्बासनी त्याला 'Lamb of The Literature' बनवले.

माझ्या वाचनालयातील एका चोखंदळ वाचकाचे या पुस्तकाबद्दल मत विचारता त्यांनी सांगितले की, पुस्तकात अहंगंडाची 'व्हेन' सतत आढळते. आत्मचरित्रात नेहमीच A B व C असे टाईप आढळतात. टाईप 'अ' हा नेहमीच वल्गना करणारा असतो. पण तसे तो कबुलही करतो. 'बी' टाईप हा परिस्थितीप्रमाणे जेवढे सांगायचे असेल तेवढेच सांभाळून सांगतो. टाईप 'सी' मात्र सातत्याने सत्याचाच पाठपुरावा करीत राहील. मग तो कुणाचीही पर्वा करणार नाही. स्वतःलासुद्धा फसवणार नाही. मला सर्वांत जास्त वाचनीय वाटतात ती ही टाईप 'सी' ची आत्मचरित्रे. पण तीच फार कमी आढळतात.

अब्बास कबूलच करतात की, 'ब्लीटझ' मध्ये ३० वर्षे त्यांनी लिखाण केलं तरी सुद्धा, दर आठवड्याला त्यांच्या घरी 'ब्लिटझ' आला की त्यांचे सदर व छापील नाव त्याच्यात आलं की नाही हे बघायला ते आतुरलेले असतात! पुस्तकामध्ये वल्गनाच असली तर, त्या वल्गनेत एक प्रकारचा बालीशपणा आहे व अहंगंडाची व्हेनच आढळत असेल, तर त्या अहंगंडात एक प्रकारची निखालस मिश्किलता आहे. 'ए' टाईपच्या आत्मचरित्रात लेखक स्वतःची टिमकी वाजवेल असे गृहीत धरूनच ती वाचली पाहिजेत.

'बी' टाईपच्या आत्मचरित्राचे उदाहरण द्यायचे झाले तर व्ही. व्ही. गिरींच्या 'My Life and Times' या पुस्तकाचा उल्लेख करायला लागेल. 'बी' टाईपची आत्मचरित्रे नेहमीच गुळगुळी असतात.

एके ठिकाणी अब्बास म्हणतात की, साहित्य, वृत्तपत्रव्यवसाय, चित्रपटव्यवसाय यांमध्ये फारसा फरक नाही! साहित्य व वृत्तपत्रव्यवसाय यांमध्ये कदाचित बरेच साम्य असेल, पण चित्रपटव्यवसाय त्यातून वगळला पाहिजे. बहुतेक स्वतः त्यांनी हे तिन्ही व्यवसाय केले म्हणून त्यांना तसे वाटत असेल. आणि ते असेही म्हणतात की, स्टीनबक व हेमिंग्वेनी 'Grapes of wrath' व 'For Whom The Bell Tolls' हे उत्कृष्ट ग्रंथ लिहिले तेव्हा त्यांना वृत्तपत्रकाराचे काम दिले गेले होते व सुरुवातीला त्या त्या विषयावर ते संशोधनासाठी हिंडले होते.

अब्बासचा जन्म ७ जून १९१४ मध्ये झाला आणि केवळ योगायोगाने दोन महिन्यांत पहिले जागतिक युद्ध सुरू झाले. पण या कारणामुळे अब्बासचा जन्म म्हणजे एक अपशकुनी इशारा असेच त्यांना वाटते!

या पुस्तकाचे मुख्य आकर्षण म्हणजे अब्बासची इंग्रजी भाषा लिहिण्याची शैली. आणि म्हणूनच खोडसाळ व लांबलचक वर्णने करणारा हा ५५१ पानांचा ठोकळा कंटाळवाणा वाटत नाही.

पुस्तकातली दोनच चित्रे थोडीशी मजेदार वाटली. 'शहर और सपना' चे शूटिंग जेव्हा चालले होते तेव्हा एका झोपडपट्टीच्या समोर गुडघाभर घाण पाण्यात अब्बास कमरेवर हात ठेवून उभे आहेत ते एक चित्र व दुसरे चित्र ठेंगण्या अब्बासचे व उंच सत्यजीत रे चे. अब्बासच्याच शब्दात सांगायचे झाले तर, हे दोघे 'The Lion and The Lamb of Indian Hilm World!' आहेत.

श्री. के. पी. एस. मेननची रशियाबरोबरची 'love affair' सर्वांना माहीत आहे. तशीच अब्बास यांची नेहरू कुटुंबाविषयीची 'love affair' सर्वश्रुत आहेच आणि खुद्द अब्बासनेच त्याला 'My Long Love Affair' असे नाव दिले आहे.

एकदा डी. आर. मंकीकर यांच्याकडे भोजनासाठी श्री. अब्बास, मनोहर माळगावकर व प्र. के. अत्रे वगैरे मंडळी जमली होती. त्या वेळेला अब्बास म्हणतात की, श्री. मनोहर माळगावकर यांच्याऐवजी आडदांड अत्र्यांनीच मिलिटरी ड्रेस घातला असता तर ते उठून दिसले असते! तसा अत्र्यांना कोणताही पोषाख खुलून दिसला असता म्हणा!

—जे. एन् पोंडा
फिनिक्स लायब्ररी


## नवीन दाखल झालेली काही पुस्तके

१. ब्रुस ली : (चरित्र)–रविंद्र गुर्जर — रु. ९/–
२. असाही एक अश्वत्थामा : (कादंबरी)–चि. त्र्यं. खानोलकर — रु. १०/–
३. एरिअल आणि पोरकं पाखरू : (कथासंग्रह)–अनिल डांगे — रु. १५/–
४. दिशाभूल : (कथासंग्रह)–सौ. शकुंतला गोगटे — रु. १५/–

1. **do me a favour–drop dead :** (hard–cover editions–4 copies)–James Hadley Chase — Rs. 49·60
2. **Unseen Revolution :** (Bestseller–How Pesnion & Socialism Came to America)–Peter H. Drucker — Rs. 64/–
3. **The Origin of Species :** (One of the few books that changed the course of thinking)–Charles Darwin — Rs. 16/–
4. **The Double Helix :** (Bestseller–Regarding the important discovery about the structure of DNA)–James D. Watson Rs. 15/–

- नॉन–मेंबर्सना डेली बेसीसवर पुस्तके वाचावयास मिळतील.
- आपणास पाहिजे असलेली पुस्तके परगावीही पुरवू. (V. P. नाही)

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.

# टेक इट लाईटली....

संजीव मंगरूळकर

## ☐ मारामारी झिंदाबाद

आठ दहा दिवसांपूर्वीचीच गोष्ट. टिळक रोडवरून चाललो होतो. संध्याकाळची वेळ आणि निवडणुकीचं कसलंसं भाषण. त्यामुळे नको इतकी गर्दी होतीच. आजकालच्या राजकीय परिस्थितीविषयी एकदम जागरूक असलेला सगळा समाज जथ्यानेच भाषणाला निघाला होता. तर अशी एकूण धामधुमीची वेळ. तेवढ्यात माझं लक्ष समोर गेलं. काहीतरी विशेष घडण्याचं चिन्हं दिसू लागलं होतं. एक रिक्षावाला आणि एक दुसरा तरुण, कुठल्याशा मतभेदावरून मारामारीच्या पवित्र्यात उभे ठाकले होते.

अर्थात पुणेकरांना हे दृश्य काही नवीन नव्हे. त्यातून निवडणुकीच्या काळात इतक्या क्षुल्लक मारामाऱ्या म्हणजे अळणीच ! एवढ्या गर्दीत तिकडे कुणाचेच लक्ष गेले नाही. आणि मारामारीला एकंदर चांगलाच चेव आला. त्या चपळ तरुणाने छलांग मारून रिक्षावाल्याचे नरडे धरले, रिक्षावाला आपल्या रिक्षातच होलपडला आणि आता मारामारी रिक्षाच्या बंदिस्त भागात सुरू झाली. लोकांचे लक्ष वेधून घेण्याइतपत रंग भरला. हा हा म्हणता लोक जमू लागले. थांबून विचारपूस सुरू झाली. कोण हो ? कशानं हो ? वगैरे वगैरे. त्यातून वर्ण्य विषय बनून राहिलेले दोघे वीर रिक्षात पडून असल्याने मारामारीचे गांभीर्य कुणाच्याच ध्यानात येईना. उत्कंठा तर शिगेला पोहोचली.

समोरच्याच चौकातला ट्रॅफिक पोलिस मघापासून डोळ्यात तेल घालून हे दृश्य पाहत होता. अर्थात मारामाऱ्या हा विषय त्याच्या अधिकारातला नव्हे, म्हणून त्याचा नाइलाज झाला. आपल्या जागेवरूनच तो एकंदर परिस्थितीचे निरीक्षण करीत होता. जमलेल्या गर्दीचा वाहतुकीला काही फारसा अडथळा होत नसल्याने त्याला अर्थातच या भानगडीत लक्ष घालण्याची जरूर भासली नसावी. तो फक्त तत्परतेने येणाऱ्या–जाणाऱ्या वाहनांना हात दाखवीत राहिला.

पण एव्हाना गर्दी फारच वाढली. काही उत्साही तरुणांनी रिक्षात घुसून दोघाही वीरांना बाहेर काढले. आणि आता सौम्य खडाखडी सुरू झाली. पुन्हा एकदा दोघांनाही सोडविण्याचे प्रयत्न...पुन्हा खडाखडी असा नेहमीचाच प्रकार. तेवढ्यात रिक्षावाल्याशी परिचित असणाऱ्या काही दोस्तांचा ग्रुप तिथं आला असावा. अचानक या नव्याच तांड्याने परिस्थिती ताब्यात घेतली. मारामारी सोडवण्याचे जोरदार प्रयत्न झाले, आणि त्यामिषाने अर्थातच समोरचा तरुण चांगलाच बडवला गेला. नाकातोंडातून रक्त वाहू लागले. परिस्थितीने घेतलेला हा 'टर्न' पाहून अर्थातच आम्हा सर्व उपस्थितांचे हृदय चरकले. 'एव्हाना पोलिसही वाहतूक नियंत्रणाचे काम सोडून खाली उतरला आणि' घटनास्थळी आला. कदाचित आता या गर्दीचा वाहतुकीला अडथळा होत असावा. त्याने आधीच सुटलेली मारामारी आणखी सोडवली. आधीचे मारामारी सोडवणारे, करणारे तरुण मधल्या काळात गायब झाले होते आणि एकूण प्रकरणावर असा पडदा पडला होता. झाल्या प्रकाराबद्दल हळहळ, आश्चर्य वगैरे व्यक्त करीत गर्दी पांगली.

तुमच्या आमच्या जीवनात हरघडी आढळणारा हा एक प्रसंग अगदी बेफाम मनोरंजक प्रसंग ! हुकमी आणि मोफत मनोरंजन ! आपण तर ह्या मारामाऱ्यांचे चक्क चाहते आहोत. ह्या मारामारीचेही एक शास्त्र आहे. त्याची एक शिस्त आहे. मारामारी करणाऱ्या धडाडीच्या तरुणांचीही एक वेगळी जात असते. (ही जात आपल्या नेहमीच्या जातीयतेपेक्षा अर्थातच वेगळी आहे ! ) मारामाऱ्या सोडवणाऱ्यांचाही एक खास वर्ग असतो. त्यांना दाद देणारे आमच्यासारखे रसिकही एका वेगळ्याच जातीचे ! हा सगळा कोरम भरल्याशिवाय काही मारामारीला रंग येत नाही. आणि मारामारीशिवाय तरी काही खरं नाही !

आता मारामारीचा हा फालतू विषय इतक्या चवीनं चघळण्याचं खरं तर काहीच कारण नाही. हा विषय घटकाभर करमणुकीचा. पाहावा आणि सोडून द्यावा अशा प्रकारचा ! त्यावर इतका विचार करणं काही जरूरीचं नाही. खरं तर अशा विचारानं मारामाऱ्यांची मजाच जाईल आणि त्या होणेही बंद होईल. पण हेच तर आमचं खरं दुःख आहे, मारामाऱ्या बंद पडल्याचं. मारामाऱ्या पाहायला इतके सोकावलेले आम्ही, पण मधला काळ फारच सुस्त गेला. कुठंच मारामारी नाही. टीकेची झोड नाही. निषेधांची सरबत्ती नाही. मोर्चे नाहीत. नुसतीच आबादीआबाद ! सगळीकडे समृद्धी नुसती उतू चाललेली. घरात समृद्धी, घराबाहेर समृद्धी, झोपडपट्टीत समृद्धी. समस्त प्रजानन सुखासमाधानाच्या ढेकरा देऊ लागलेले ! अशा परिस्थितीत आपला जीव तर अगदी कुचंबून गेला. अगदी हातपाय हलवता येईनात. आता मारामारी हा प्रकारच नामशेष होतो की काय, अशी दाट शंका आणि भीती मनाला व्यापून राहिली. मोठेच दुःख वाटू लागले.

पण आमचे सुदैव ! तोच निवडणुकांची घोषणा झाली आणि मग...बहोत खूब ! मारामारीला पुन्हा एकदा 'न भूतो न भविष्यति' असा बहर आला. दोन्हीही पहिलवान कसून तयार झाले. युद्धप्रसंग तर अगदी मनासारखा जमून आला. परस्परांच्या वस्त्रहरणांना ऊत आला. वक्त्यांनी विनोद तर अमाप केले. निषेध झाले. आव्हाने झाली. थोरली आश्वासने ओसंडून वाहू लागली. इतक्या दिवसांच्या समृद्धीच्या चिंध्या उडाल्या आणि राजकीय मंडळी परस्परांचे बुरखे फाडण्यात कार्यमग्न झाली. अगदी भरगच्च नंगानाच झाला आणि अगदी मजा आला.

आता मारामारीचेसुद्धा इतके वर्णन करण्याचे कारण असे की, आम्ही मारामारीचेही विलक्षण चाहते आहोत. भारताची भुकेकंगाल जनता या मारामारीला विलक्षण दाद देते. कधी नव्हे तो आमच्या दारिद्र्याचा विषय चव्हाट्यावर येतो. ते दूर होण्याची स्वप्ने दिसतात. ही स्वप्ने साकार करणारे देवदूत एकदम एकसमयावच्छेदेकरून उगवतात. आपापल्या कसरती करून दाखवतात. ठिकठिकाणच्या जाहीर सभांतून या कुस्त्या बघण्यासाठी आम्हाला निमंत्रण येते. आमच्याकडेही आशाळभूतपणे पाहणारे, आम्हालाही भाव देणारे हे प्रेषित आणि त्यांच्या या लोकविलक्षण मारामाऱ्या पाहिल्या की, आपला ऊर चक्क भरून येतो. आपली भूक मारून आम्ही या चढाओढी अगदी मिटक्या मारत बघतो. त्यात

वेळही चांगला जातो. डोक्याला ताप न होता विरंगुळा होतो. या सगळ्या मारामाऱ्या आपल्या जिवावर आणि आपल्याच मनोरंजनासाठी चाललेल्या आहेत, ही जाणीव तर मनाला कोण सुखकारक वाटते! भारतीय जनतेचा हा एकुलता एक मोफत विरंगुळा आहे आणि म्हणून आपला निवडणुकांना अगदी भरघोस पाठिंबा आहे. अशा निवडणुकांतूनच तर लोकशाही विकसित होते.

आता भीती वाटते, निवडणुका झाल्या आहेत. मारामाऱ्याही संपतील की काय? अशाने आम्हाला पुन्हा गरिबीची आठवण होईल की काय? ते होणे नाही. आमची गरिबी विसरलीच पाहिजे. आमचे अगदी पोटभर मनोरंजन व्हायला हवे. पार पोटे खपाटीला लागेपर्यंत आम्ही हसलो पाहिजे. तेच आमच्या प्रकृतीला मानवते, असा आजवरचा अनुभव आहे. गेल्या तीस वर्षांतल्या आमच्या दोन पिढ्या याच जल्लोषात वाढल्या. बहरल्या. विनोद हा आमचा अगदी जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो करणे हे पुढाऱ्यांचे नैतिक कर्तव्य आहे. निवडणुका अगदी वारंवार झाल्या पाहिजेत, अशी आमची तळतळून मागणी आहे. आमच्या गरिबीचा निषेध असो! मारामारी झिंदाबाद!! ◻

## ◻ जनता सरकारचे पहिले यश

निवडणुका तर झाल्या, आता पुढे काय? असा एक यक्षप्रश्न (म्हणजे तसा नेहमीचाच, पण आता पुन्हा नव्याने उपटलेला) सध्या पुण्याच्या काही वृत्तपत्रांसमोर आणि साप्ताहिकांसमोर उभा राहिला आहे. आता या प्रश्नात तसे नवीन काहीच नाही. पण त्याचं असं झालं की, मध्ये अचानक, अगदी अनपेक्षितपणे भारतात निवडणुका झाल्या, अगदी चक्क खुल्या वातावरणातील निवडणुका. आता हा अनुभव फारा वर्षांनंतर येत असल्याने (आणि तो पुन्हा येईल याचीही शाश्वती नसल्याने) काही पत्रकारबंधूंनी त्याचा अगदी बेदम फायदा उठवला. काही मंडळींनी तर या काळात काही नफा मिळवून पुंजी जमवल्याचेही ऐकून आहोत. इथपर्यंत सारे ठीक! पण आता निवडणुका झाल्यावर त्याचे काय? या भीतीने अचानक वृत्तपत्र-क्षेत्रात मरगळ येते की काय, अशी आम्हाला धास्ती वाटून राहिली होती. पण या पत्रकारांचे भाग्य तसे बलवत्तर. अचानक जोशी-अभ्यंकर खून प्रकरणाचे आरोपी सापडले आणि पुढच्या काही दिवसांचा प्रश्न तरी असा निकालात निघाला.

अल्लया पुण्याने गेल्या काही महिन्यांत अगदी मनापासून चर्चिलेले हे खूनसत्र म्हणजे काही साधी गोष्ट नव्हे. पुण्यात खून तसे थोडे का होतात! पण सगळेच काही असे गाजत नाहीत. त्यालाही एक भाग्य लागते. तर अशा रीतीने भर वस्तीत, भर रात्री, जोशी–अभ्यंकरांसारखी दोन निरपराध कुटुंबे मारली गेल्याने तमाम पुणेकर तर हादरलेच, पण पटवर्धन, रानडे, परांजपे, गोखलेप्रभृती सालस मंडळी तर मुळापासूनच टरकली. त्यांना हा अनुभवच अगदी कोराकरकरीत वाटला. काही दिवस या तंग हवामानात आम्हीही घराबाहेर तोंड काढीनासे झालो. आपल्या जिवाची आपल्यालाच खरी किंमत! घरातल्या घरात बसून चर्चा तर मनसोक्त झाल्या. खुनी मंडळींची खून–पद्धती आणि पोलिसांची तपासपद्धती पाहून दोघांच्याही हुशारीचे कौतुक झाले. अगदी देशभर तपास चालल्याचे ऐकून होतो.विविध धागेदोरे सापडत असल्याचे समजले. आता या धाग्यादोऱ्यांतून खरंच खुनी सापडतो की काय, असेही वाटू लागले. काही शहाणी मंडळी हे सर्व धागेदोरे फोल असल्याच्या वल्गना करू लागली होतीच; पण तपासाचे निष्कर्ष पाहून ही शहाणी मंडळी खरोखरच शहाणी ठरतात की काय, अशीही शंका आमच्या बालमनाला वाटू लागली. खून करून पैसे मिळविणे हा प्रकार अशा रीतीने सोपा असल्याचे निदर्शनास आल्याने हाच व्यवसाय सहकारी तत्त्वावर घाऊक प्रमाणावर करता येईल काय, याचाही विचार काही सुशिक्षित बेकार करू लागले.

अशा सनसनाटी प्रकरणानंतर हमखास घडणारी गोष्ट म्हणजे लोकांच्या कल्पनाशक्तीचा अचाट विस्तार! (यालाच काही पूर्वग्रहदूषित मंडळी 'अफवा' म्हणतात.) या कल्पनाविस्तारालाही ऊत आला. या सगळ्या खुनांमधली विलक्षण बुद्धिमत्ता पाहून, हा प्रताप काही विदेशी विरांचा असावा, असा दावा काही तज्ज्ञांनी केला; तेव्हा मात्र माझ्या अस्सल भारतीय मनाला मोठेच दुःख वाटले. भारतीयांच्या बुद्धिमत्तेविषयी स्वदेशीयांनीच असा अविश्वास दाखवावा, यापरते अधिक दुःख ते कोणते? काही मंडळींच्या मते हे रजनीश-शिष्य होते. आता हा दावा तर किती फोल आहे, हे अगदी माझ्यासुद्धा लक्षात आले. (म्हणजे अगदी कमालच!) एवढ्या चलाखीने खून करणारी मंडळी फार हुशार नसली तरी, किमान 'शुद्धीवर' तरी असणे अपरिहार्य आहे की नाही? मग हे काम रजनीश-शिष्यांकडून कसे होईल? काही मंडळींनी याचा संबंध स्मगलिंगशी जोडला. हे मात्र आपल्याला पटले. कारण एक तर स्मगलर मंडळी (मी सिनेमात पाहिलेली) असे काहीही करू शकतात, असा आपला दृढ विश्वास आहे आणि दुसरे म्हणजे आपण स्मगलर नाही; तेव्हा आपल्याला यात काही धोका नाही, ही एक दिलासा देणारी गोष्ट! आणि यावरही कळस म्हणून काही मंडळींनी याचा संबंध राजकारणाशी जोडला आणि यात बऱ्याच वरच्या मंडळींचा हात असल्याचेही छातीठोकपणे सांगितले. तेव्हा आता या प्रकरणात कोणाकोणाची लफडीकुलंगडी बाहेर पडतात याची तमाम मंडळी मोठ्या उत्सुकतेने वाट पाहू लागली!

आणि अचानक हा निकाल लागला. आरोपी सापडले, अगदी मुद्देमालासकट सापडले! आम्ही आनंदाने अगदी जल्लोष केला. पोलीस खात्याच्या तत्पर कार्ययंत्रणेचेही कौतुक केले. काही विघ्नसंतोषी मंडळींना लफडी-कुलंगडी चघळण्याचे सौख्य मात्र न मिळाल्याने त्यांची निराशा झाली असणे साहजिक आहे. पण आपला जीव तर भांड्यात पडला. आता मोकळेपणाने रात्रीदेखील शहरात हिंडण्याची सोय होणार. आपल्या घरात सुखाने राहता येणार, याचा विलक्षण आनंद झाला!

आणि यानंतर भर म्हणूनच आमच्या पत्रकारबंधूंनाही नवीन आव्हान मिळाले. आता पुन्हा खास अंक, पुरवणी अंक निघतीलच. आरोपींचा संपूर्ण परिचय, स्वभाववैशिष्ट्ये, त्यांच्या आवडीनिवडी यांविषयी रसाळ चर्चा होतील. त्यांचे विविध सामाजिक आणि राजकीय संदर्भ शोधले जातील. नमुन्यादाखल परवाच एका सार्वजनिक फलकावर लावलेली ही घोषणा देतो. पत्रकारबंधूंना यातून बरेच शिकता येण्यासारखे आहे. ती घोषणा अशी होती–

'जोशी–अभ्यंकरांचे खुनी सापडले.
जनता सरकारचे पहिले यश!
जनता सरकार विजयी होवो!!'

◻

मुक्काम : पुणे

# लेखक, कलाकार यांची सामाजिक–राजकीय बांधिलकी

## मूळ विषयापासून दूर गेलेला परिसंवाद

राजा दीक्षित

मध्यंतरी लोकसभेच्या निवडणुका झाल्या, तेव्हा प्रचाराच्या रणधुमाळीत अनेक साहित्यिक, कलावंत उतरले होते. राजकारणाच्या क्षेत्रात इतक्या हिरीरीने उतरण्याची 'संयुक्त महाराष्ट्रा'च्या चळवळीनंतरची ही पहिलीच वेळ. कलाकारांच्या सहभागामुळे प्रचारकार्यात एक वेगळाच उत्साह संचारला. कलाकारमंडळींच्या कल्पनेत कधी बसली नसेल अशी गर्दी त्यांच्या भाषणांना लाभली. मुंबईच्या झोपडपट्टीवासीयांनी पडद्यावरचे आपले लाडके कलाकार चक्क आपल्या दाराशी आल्याचे पाहिले. राजकारण्यांच्या चिखलफेकीत साहित्यिकांवरही शिंतोडे उडाले. नेहमी तोलूनमापून बोलणाऱ्या यशवंतरावांची जिथे पु. ल. ना 'विदूषक' म्हणण्यापर्यंत मजल गेली, तिथे इतर राजकारण्यांची काय कथा! 'कलाकारांची बांधिलकी' या विषयावर एरवी शालेय वादस्पर्धांपासून साहित्यिक व्यासपीठांपर्यंत नेहमी चर्चा होत असते. पण आता, निवडणूक प्रचाराच्या धामधुमीत राजकीय व्यासपीठावरही या विषयाला वाचा फुटली. पुन्हा एकदा ह्या जुन्या विषयाला, नव्याने उजाळा मिळाला.

ज्या संस्थेच्या 'घाशीराम कोतवाल'मुळे ह्या विषयावर यापूर्वी जोरदार वादंग माजले होते, त्या 'थिएटर ॲकॅडमी'चा चौथा वर्धापनदिन दि. २७ मार्चला पुण्यातल्या चितळे सभागृहात पार पडला. त्या निमित्ताने लेखक, कलाकार यांचा सामाजिक व राजकीय बांधिलकी' या विषयावर एक परिसंवाद झाला. अध्यक्षस्थानी श्री. विजय तेंडुलकर होते.

सुरुवातीला 'विठ्ठलफेम' पुंडलिक बोलले. निवडणुकीच्या काळात डॉ. विद्याधर पुंडलिक यांनी जनता पक्षाचा प्रचार केला होता. अर्थातच सुरुवातीला त्यांनी आणीबाणीतील बंधने आणि निवडणुकीतील साहित्यिकांची भूमिका याची चर्चा केली आणि कलावंतांना बंधनात जखडणारी हुकूमशाही संपल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

डॉ. पुंडलिकांच्या मते कलेचे आणि संस्कृतीचे वर्तुळ विशाल असून कोणतेही सरकारी धोरण त्याला छेदून जाऊ शकत नाही. साहित्यिकांनी 'कमेटीदार' बनणे त्यांना पसंत नाही. 'बांधिलकी'बाबत त्यांचे असे मत आहे की, कोणत्याही 'इझम'ची बांधिलकी लेखकांनी पत्करू नये. एका रशियन कादंबरीच्या सुरुवातीलाच नायिका त्या दिवशीच्या प्रॉडक्शनचा तपशील दिल्याशिवाय फॅक्टरीतून आलेल्या नायकाला चुंबन देत नाही! विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या बांधिलकीतून अशी हास्यास्पद निर्मिती होते. प्रत्येक लेखकच 'कमिटेड' असतो, पण फक्त आपल्या अनुभवाशी. लेखकाने आपल्या अनुभवाशी इमान राखावे, तोच त्याचा 'धर्म' आहे. आपल्या अनुभवाच्या बांधिलकीशिवाय इतर कोणतीही बांधिलकी साहित्यिकांनी मानू नये.

डॉ. पुंडलिकांनंतर काँग्रेसचा (मुख्यतः श्री. यशवंतराव चव्हाणांचाच) प्रचार केलेले प्रा. दिलीप जगताप बोलले. त्यांचे बोलणे 'काँग्रेस छाप' असेल हा अंदाज खोटा ठरला. प्रा. जगताप हे निवडणुकीपूर्वी आपण यशवंतरावांचा प्रचार केला हे निवडणुकीनंतरही तितक्याच ठामपणे विचारपूर्वक सांगत होते. त्यांचे बोलणे प्रामाणिक आणि सडेतोड होते. मात्र भाषणाचा बराच भाग त्यांनी आपल्या प्रचाराच्या आणि यशवंतरावांच्या समर्थनातच घालवला. मधूनच 'प्रभातरोडवर चांगले बोललेल्या पु. लं. ची शनिवारवाड्यासमोर फे फे उडाली.' असा एकांगी कटू सूरही येऊन गेला.

प्रा. जगतापांच्या मते देशाच्या सर्व समस्या बाजला ठेवन एक विचारस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य हेच विषय जनतेपुढे मांडणे कितपत योग्य आहे? – हे एक आणि दुसरे म्हणजे आणीबाणीत नेहमीप्रमाणेच भरपूर लिखाण त्यांनी केले. आणीबाणी त्यांच्या अभिव्यक्तीच्या आड अजिबात आली नाही. त्यांचा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आणीबाणी नसतानासुद्धा काही अप्रत्यक्ष मर्यादा असतात. त्यांच्यासारख्या उदयोन्मुख लेखकांना उपेक्षा सहन करावी लागते, त्यांची न्याय्य दखल घेतली जात नाही, त्याचे काय? (सत्यदेव दुबे यांनी जगतापांच्या लेखनाचा गौरव केल्यावर मगच अमोल पालेकरांना त्यांच्या लिखाणाचे महत्त्व लक्षात येते हे उदाहरण या दृष्टीने बोलके आहे. पुणे–मुंबईकर कलावंतांना 'काहीतरी होण्या'-चीच फार ओढ लागलेली असते. नाटक हेच आपले क्षेत्र आहे, त्यासाठी आपल्याला खूप करायचय् असे म्हणत 'टॅक्सी टॅक्सी'त काम करणारे अमोल पालेकर त्याचीही एक 'फिलॉसॉफी' बनवतात, ही प्रा. जगतापांची तक्रार होती.'

पहिल्या दोन भाषणांत निवडणूक–प्रचाराचे समर्थन बरेच येऊन गेले होते. डॉ. अनिल अवचट हे या प्रचारात 'तटस्थ' होते. त्यामुळे ते काय बोलतात याबाबत उत्सुकता होती. पण त्यांनी 'वेळ खूप झालाय, तुमची परवानगी असेल तर मी आता बोलतच नाही.' अशीच सुरुवात केली. पब्लिकनी 'बोला, बोला' म्हटल्यावर डॉ. अवचटांनी इमानदार हशे घेत, पुष्कळसे पुण्यातल्या नेहमीच्या परिसंवादात शोभेल असे भाषण ठोकले! त्यांच्या भाषणातला महत्त्वाचा भाग असा–

अनुभवांची बांधिलकी गृहीतच आहे, अनुभवाशी प्रामाणिक नाही तो साहित्यिकच नाही, पण तेच तेच मध्यमवर्गीय अनुभव मांडले जातात. समाजात इतरही अनेक गोष्टी आहेत, अनेक प्रश्न आहेत. त्यांचे चित्रण साहित्यात फार कमी दिसते. समाजातील कित्येक घटक असे असतात की, ज्यांची माहिती लेखकांना नसते.–तर ही अवचटांची तक्रार, ग्रामीण, मागासवर्गीय भागातले विविध अनुभव त्यांनी सांगितले. त्यांच्या मते निवडणूक ही फार महत्त्वाची गोष्ट आहे याची जाणीवच या लोकांना नसते, ही दुर्दैवाची पण सत्य परिस्थिती

आहे. त्यांचे प्रश्नच फार वेगळे आहेत. त्यांचे प्रतिबिंब साहित्यात दिसणे आवश्यक आहे. निवडणुकीच्या निमित्ताने तरी हे साहित्यिक समाजात मिसळले हे फार चांगले झाले. आपण ज्या समाजात राहतो त्याचे वास्तव स्वरूप जाणून घेऊन ते साहित्यात चित्रित केले गेले पाहिजे, या मुद्यावर डॉ. अवचटांनी भर दिला.

त्यानंतर श्री. मणी कौल यांनी थोडक्यात आपले विचार मांडले. त्यांच्या मते वर्तमानकालीन काय किंवा ऐतिहासिक काय, जशीच्या तशी वस्तुस्थिती मांडणे एवढेच कलाकाराचे काम नाही. कलाकाराने वास्तवतेच्या पलीकडे जायला हवे. वास्तवता आणि त्याचबरोबर तिचे interpreration हे दोन्ही कलाकाराकडून अनपेक्षित आहे. 'घाशीराम कोतवाल'वरील आपल्या आगामी चित्रपटाच्या चित्रिकरणातील उदाहरण देऊन त्यांनी आपला मुद्दा स्पष्ट केला.

### तेंडूलकरांच्या मते........

अध्यक्ष श्री. विजय तेंडुलकर यांनी आणीबाणीच्या काळात अभिव्यक्ती-स्वातंत्र्यावर आलेल्या बंधनाचा उल्लेख करून ही भयंकर स्थिती आता दीर्घकाळ चालू राहण्याची भीती वाटत होती, असे सांगितले. तेव्हा या परिस्थितीशी जुळवून घेऊन मार्ग कसा काढायचा हा प्रश्न होता. तुरुंगात जाणे, रेडिओ-दूरदर्शनावर बहिष्कार टाकणे आणि आपले विचार पूर्णपणे मांडता येत नाहीत म्हणून निषेधासाठी आपला उरलासुरला आवाजही बंद करणे तेंडूलकरांना मान्य नाही. उलट आपले विचार पूर्णांशाने नाही, तरी जेवढे मांडता येतील तेवढे अशा वेळी मांडलेच पाहिजेत असे त्यांना वाटते. त्यांच्यामते स्वातंत्र्याची मुस्कटदाबी होत असताना त्याविरुद्ध आवाज उठवून तात्त्विक लढत देऊन तुरुंगात जाणे जेवढे महत्त्वाचे आहे, तेवढेच त्या परिस्थितीमधून चोरवाटा काढून आपले विचार मांडणे हेही महत्त्वाचे आहे. या मुद्द्याच्या संदर्भात त्यांनी आपले रशियातील अनुभव सांगितले. एक अनुभव मोठा बोलका आहे. ते रशियात झारशाहीवरील एका कादंबरीवरून तयार केलेले एक नाटक पाहत होते. हे नाटक पाहत असताना प्रेक्षक सतत हसत होते. याबाबत त्यांनी आपल्या दुभाषाला विचारले. पण तोही सारखा हसतच राहिला. पुढे नंतर त्याने हळूच सांगितले की, 'नाटक जरी झारशाहीविरुद्ध असले तरी ते सद्यःस्थितीलाही लागू पडणारे आहे!'–रशियात कायमच 'आणीबाणी' आहे, पण तेथेही अशा रीतीने चोरवाटा काढून आपले विचार मांडले जातात. याची आणखीही काही उदाहरणे तेंडुलकरांनी दिली. तेथील नाट्यक्षेत्रातील काही तरुण मंडळींच्या मते सोल्झेनित्सिन आदींप्रमाणे रशियाबाहेर जाऊन रशियातील परिस्थितीवर प्रकाश टाकण्यापेक्षा रशियात राहूनच खुबीने, शक्य होईल तसे आपले विचार मांडणे महत्त्वाचे आहे.

('राजकारण हे फार खोल असते' ह्या आधीच्या काही वक्त्यांच्या म्हणण्याचा आधार घेऊन तेंडुलकरांनी आपले त्या बाबतीतले काही अनुभव सांगितले. ते अतिशय विदारक होते. त्यांनी काही काँग्रेसी मुख्यमंत्र्यांच्या आणि विविध राजकारण्यांच्या मुलाखती घेतल्या होत्या. त्यांचे भन्नाट किस्से सांगून ते म्हणाले की, राजकारणात वरकरणी, प्रभावी आणि आदरणीय वाटणारी अनेक माणसे असतात. वास्तविक ती बदमाशच असतात. त्यांची व्यक्तिमत्त्वे खरोखर अभ्यासण्याजोगी असतात.) साहित्यिकांनी राजकारण जवळून समजावून घेतले पाहिजे. आणीबाणीत मुस्कटदाबी होत होती. हे खरे आहे. पण यातली तीन चतुर्थांश मुस्कटदाबी आणीबाणीपूर्वीही अस्तित्वात होती हे स्पष्ट करण्यासाठी त्यांनी आपले ग्रामीण भागातले अनुभवही सांगितले.

ग्रामीण भागातली प्रस्थापित व्यवस्था, तेथील स्थानिक पुढाऱ्यांची वर्षानुवर्षे चाललेली अनिर्बंध सत्ता, यामुळे तेथील जनतेची सतत कोंडी होत आलेली आहे; ही कोंडी लेखकांनी समजावून घेतली पाहिजे, असे ते म्हणाले.

तेंडुलकरांच्या मते आपण पूर्णवेळ साहित्यिक नाही, पण पूर्णवेळ माणूस आहोत. तेव्हा साहित्यिक म्हणून नव्हे तर, माणूस म्हणूनही अशा अनेक गोष्टी समजावून घेतल्या पाहिजेत. त्याशिवाय आपल्याला माणसाविषयी बोलण्याचा अधिकार नाही. 'साहित्यिकाचा धर्म मी मानतो, पण त्या-धर्माचे कर्मकांड आपल्याला मान्य नाही.' असेही त्यांनी सांगितले.

आधीच लांबलेल्या कार्यक्रमातले हे शेवटचे भाषण मोठे असूनही कंटाळवाणे झाले नाही, हे विशेष. परिसंवादात मूळ विषय अधून–मधून बाजूला राहत होता, तसेच कलाकारांमधले फक्त साहित्यिकच मुख्यतः विचारात घेतले जात होते. तरीही पुण्यातल्या इतर उथळ आणि करमणूकप्रधान परिसंवादांसारखा मात्र तो झाला नाही, ही निश्चितच समाधानकारक गोष्ट आहे. अर्थात काही प्रश्न या परिसंवादाने अनुत्तरितच ठेवले. मला जाणवलेल्या काही गोष्टींचा शेवटी उल्लेख करणे आवश्यक आहे.

'पूर्णवेळ माणूस' असणाऱ्या कलाकाराला कलाकार म्हणून वेगळी आणि माणूस म्हणून वेगळी बांधिलकी असते का? तसे मानले तर या दोन बांधिलकींचा एकमेकींशी संघर्ष येतो का? तसा तो आला तर कोणती बांधिलकी गौण?–याचा विचार झाला नाही. दुसरे असे की, कलाकारावर दोन प्रकारची बांधीलकी असू शकते–त्याने मानलेली व इतरांनी मानलेली वा लादलेली यापैकी समर्थनीय काय? समाजातले 'लिंगवाद – निर्मूलन-समिती' सारखे गट दहशतवादी बांधिलकी घालू पाहतात. डॉ. अवचटांसारखे विचारवंत अपेक्षेतून बांधिलकी घालू पाहतात. श्री. शंकरराव चव्हाणांसारखे राजकारणी साहित्यिकांनी राजकारणात पडू नये' असे म्हणून कलाकारांच्या कलाबाह्य (=कलेव्यतिरिक्त इतर या अर्थाने) वर्तनावर बांधिलकी घालू पाहतात. आणीबाणीसारख्या कृतीतून देशाची केन्द्रसत्ता कलाकारातल्या कलाकारावर आणि माणसावरही दुष्ट बांधिलकी लादते. काही कलाकारच 'इसम' ची वा अन्य बांधिलकी स्वीकारतात. थोडक्यात कलाकारांची आणि अ-कलाकारांची, अ-कलाकारांची अ-कलाकारांतही विचारवंत व रसिकांची आणि अ–रसिकांची, कलेवर आणि कालबाह्य वर्तनावर–अशी विविध प्रकारची बांधिलकी येऊ पाहत असते. त्यातील योग्य काय आणि अयोग्य काय आणि अयोग्य गोष्टींना आळा कसा बसणार याचा अधिक सूक्ष्म व व्यापक विचार होणे आवश्यक आहे. □

# मूल्यसंघर्ष आणि सत्तासंघर्ष : पृष्ठ १ वरून

सर्वांना शांत राहण्याचे आवाहन केले. बाबूजींनी बजावले, कोणाच्याही घरावर मोर्चा नेऊ नका, कोणाचा निषेध करू नका. एक लड़ाई जनताने जीती है. अब दूसरी लड़ाई भी वही जीतेगी. फैसला वही होगा जो जनता चाहती है, हमारे मनमे किसीके प्रति कटुता नही है. भाषणानंतर लोक पांगले. घोषणा थांबल्या. बाबूजींचे हे भाषण चालू असतानाच जॉर्ज त्यांना भेटण्यासाठी आले. त्यांना काय झाले ते सर्व सांगितले. ऐकून घेऊन ते आत निघून गेले. अशी तणावपूर्ण परिस्थिती. जनता पक्षाचे सरकार येऊन एक दिवस पुरा झाल्याबरोबर हे होत असल्याने सामान्य माणूस गांगरून गेलाय. काय होणार, कसे होणार अशा चर्चा रस्त्यावर व सर्वत्र चालू आहेत.

बाबूजींचा रुसवा काढण्यासाठी पंतप्रधान मोरारजीसुद्धा औपचारिक संकेत बाजूला ठेवून स्वत: आले. बाबूजींनी मंत्रिमंडळात येण्याचे मान्य केले. सर्वांनी सुटकेचा निश्वास टाकला. रात्रीच बाबूजींच्या निर्णयाची माहिती वृत्तपत्रांकडे गेली. पण रात्री अकरा वाजता पुन्हा बाबूजींनी मोरारजींना फोन करून आपली असमर्थता व्यक्त केली. परिणामी दुसऱ्या दिवशीच्या शपथविधीस बाबूजी व बहुगुणा गैरहजर. पुन्हा अस्वस्थता. तर्क-वितर्क, तणाव, चिंता. आता चंद्रशेखर यांची धावपळ सुरू झाली. दिल्लीहून उठले ते तडक जसलोकमध्ये जयप्रकाशजींना जाऊन भेटले. अन्य मात्रा चालेना तेव्हा त्यांनी ही उगाळण्याचे ठरविले आणि ती बरोबर चालली. जयप्रकाशजींनी स्वत: जगजीवनराम यांना मंत्रिमंडळात येण्याची विनंती केली. बाबूजींनी ती मानली. अखेर २८ मार्चला त्यांनी व बहुगुणांनी मंत्रिपदाची शपथ घेतली आणि या राजकीय नाटकाचा अखेर पडदा पडला. बाबूजींच्या घरासमोरील गर्दीही कमी झाली. काल ज्या घरात दोन-तीनशे माणसे दिवसभर सारखी दिसत होती त्या घरात आज फार तर पाच माणसे होती.

## सत्तासंघर्ष महत्त्वाचा

तर अशा रीतीने हे बाबूजी प्रकरण संपले. तुटेपर्यंत ते न ताणता मिटले याचा प्रत्येकालाच आनंद झाला. पण हे सर्व चालू असताना लोकांच्या प्रतिक्रिया अत्यंत तीव्र होत्या. कोणी बाबूजींना दोष देत होते, तर कोणी जनता पक्षाच्या नेतृत्वाला. पण एक मात्र जाणवले, या सगळ्या प्रकारामुळे, बाबूजींनी गेल्या दोन महिन्यांत मिळविलेली साहानुभूती आणि सत्तासंघर्ष या राजकारणाच्या दोन बाजू. दोन्हीही सारख्याच आवश्यक. निवडणुकांच्या आधी मूल्यसंघर्ष अधिक तीव्र होता. बाबूजींचा राजीनामा हा खुर्चीसाठी नसून मूल्यासाठी आहे. असे ते स्वत:, त्यांचे पाठीराखे व इतरही-सांगत होते. त्यावर विश्वासही ठेवला जात होता. मात्र २५ मार्च ते २८ मार्च या काळात जे काही घडले त्यावरून सत्तासंघर्ष हाच अधिक महत्त्वाचा असतो असा निष्कर्ष निघतो. मूल्य व सत्ता यात सत्तेसाठी अधिक स्टेक्स लावायला माणूस तयार होतो हे या ४ दिवसांच्या इतिहासाचे सार आहे. अन्यथा, हुकूमशाहीचा पाडाव ही मूल्यनिष्ठ गोष्ट साध्य झाल्यावर 'मीच पंतप्रधान' हा आग्रह का राहिला असता? म्हणजेच काँग्रेसमध्ये इंदिरा गांधी व त्यांचा प्रभाव कायम आहे तोपर्यंत आपल्याला पंतप्रधानपद मिळणे शक्य नाही, हे ज्या क्षणी बाबूजींना कळून चुकले त्या क्षणी त्यांनी मंत्रिपद व काँग्रेस पक्ष सोडण्याचा 'कटू' निर्णय घेतला. हा निर्णय घेताना बदलत्या राजकीय परिस्थितीचा अंदाज त्यांना आला होता. तो अंदाज बरोबर निघाला तर, आपल्या सरकारातल्या व एकूणच राजकारणातल्या ज्येष्ठतेच्या जोरावर आपण सरळच पंतप्रधान होऊ हा त्यांचा साधा व नक्की आडाखा होता. हे गणित मांडून त्यांनी पुढच्या फळाची अपेक्षा मनात बाळगून 'योग्य वेळी योग्य कृती' केली. पण इतिहासाने त्यांच्यासमोर वेगळेच वाढून ठेवले होते. अपेक्षाभंगाचे दु:ख भयंकर असते. त्यांनी बाळगलेली अपेक्षा पूर्ण झाली नाही, तेव्हा ते हबकले आणि 'खाईन तर तुपाशी' न्यायाने हटून बसले. अखेर सर्वच उपाय खुंटल्याची जाणीव होताच जयप्रकाशजींच्या संदेशाचे निमित्त करून त्यांनी ढाल ते घेतो म्हणण्याची तयारी केली. बाबूजींबरोबर बहुगुणांचीही यात्रा झाली! या सगळ्या प्रकरणात बाबूजी स्वत: आपल्या आत्मसन्मानाविषयी जागरूक होतेच; पण या त्यांच्या आत्मसन्मानावर फुंकर घालण्याचे काम बाबूजींचे सुपुत्र सुरेश व बहुगुणा यांनी केले असे जाणकारांचे मत आहे. यमुनेतून बरेच पाणी वाहून गेल्यावर अखेर २८ मार्चला बाबूजी-बहुगुणा यांनी शपथ घेतली आणि एक सत्तासंघर्ष संपुष्टात आला. यानंतर केंद्रस्थानचे सरकार सुरळीत चालावे अशी सर्वांची अपेक्षा आहे. जनमताच्या जागरूकतेची पातळी सध्या इतकी आहे की, त्याचे भान ठेवून या सत्तेवरच्या मंडळींना गुण्यागोविंदानें नांदावेच लागेल. या निवडणुकांनी 'आपण मनावर घेतले तर सरकार बदलू शकतो' हा लोकशाहीत आवश्यक असलेला आत्मविश्वास जनतेमध्ये निर्माण केला आहे. कधीकधी हा अयोग्य ठिकाणीही प्रगट होतो. पण तो अस्तित्वात आहे. हा आत्मविश्वास जनतेत निर्माण झाला आहे ही जाणीवच सत्ताधाऱ्यांना जबाबदारीने वागायला आणि गतकाळातल्या चुका पुन्हा न करायला भाग पाडेल असे आज तरी वाटते.

## वादग्रस्त जॉर्ज

नेता निवडीच्या प्रश्नावर केवळ जगजीवनराम आणि त्यांचे पाठीराखेच नाराज होते असे नाही. जनता पक्षाचे एक जबाबदार पुढारी व आता मंत्री असलेले जॉर्ज फर्नांडिस यांनीही नेतानिवडीची पद्धत लोकशाहीविरोधी होती असे म्हटले होते. खरे म्हणजे नेता निवडण्यासाठी जनता पक्षाच्या खासदारांची जी बैठक भरली होती तीत मोरारजींच्या नावाला पाठिंबा देणारे भाषण जॉर्जने केले, आणि त्याच दिवशी संध्याकाळी बाबूजींच्या घरी पत्रकारांसमोर आपली नाराजी जाहीर केली. हे कसे काय? यासंबंधी मला जे समजले ते असे-मोरारजींच्या नावाला पाठिंबा देणारे भाषण करण्यासाठी त्यांचे नाव अडवानींनी ऐन वेळी पुकारले. भर बैठकीत

भाषणास नकार देणे म्हणजे प्रथमग्रासे मक्षिकापात: झाला असता म्हणून त्यांनी तिथे भाषण केले. अर्थात मोरारजींना नेता निवडण्यास त्यांचा विरोध होता असे नव्हे. दुसरे, नेता निवडीच्या बैठकीपूर्वी कॉन्सेन्सस निर्माण करण्यासाठी जी बैठक झाली त्यापूर्वी या बैठकीत येणाऱ्या प्रस्तावाची त्यांना माहिती नव्हती. कारण त्याविषयी जयप्रकाश मधू लिमये यांची बोलणी झाली होती. मधू लिमयेंशी बोलणे झाल्यावर जॉर्जशी वेगळे बोलण्याची आवश्यकता जे. पी. ना वाटली नाही. या चर्चेविषयी मधू-जॉर्ज बोलणेही झाले नाही. त्यामुळे कॉन्सेन्ससचा फॉर्म्युला व त्यामागचे लॉजिक जॉर्जला शेवटपर्यंत अज्ञात राहिले. म्हणून या सबंध नेता निवडीच्या प्रक्रियेविषयी आपली प्रथमदर्शनी प्रतिक्रिया त्यांनी पत्रकारांना सांगितली. पण ते छापून येताच विघ्नसंतोषी राजकीय निरीक्षक पुढाऱ्यांना केवढा आनंद झाला! जॉर्ज हे आधीच वादग्रस्त व्यक्तिमत्त्व, त्यातून त्यांनी विरोधी पक्षातून सत्ताधारी पक्षात जात असतानाच्या या संधिकाळात असे हे स्टेटमेंट केले. त्यामुळे या प्रकारचे व्यक्तिमत्त्व आधीच ज्यांना आवडत नाही अशा पांढऱ्या कॉलरवाल्यांनी तावडत तोंड नाके मुरडायला, जॉर्जविषयी स्वैर बोलायला सुरवात केली. विशिष्ट व्यक्तींविषयीच्या या पूर्वग्रहातून आणि गेल्या दहा वर्षांतल्या कॉंग्रेसच्या प्रचारामुळे निर्माण झालेली अस्थानी भीतीही मग व्यक्त होऊ लागली- 'काय हो, हे सरकार सहा महिने तरी टिकणार की नाही?' पण गंमत अशी की, ही भीती केवळ शिकलेल्या पांढरपेशा वर्गातूनच व्यक्त होत होती. जनता पक्षाचा खरा रस्त्यावरचा मतदार हा सर्व बिनधास्त होता. जॉर्जला मंत्रिमंडळात जाण्याचा आग्रह करण्यासाठी मुजफ्फरपूरहून तरुण पोरे आली होती. विठ्ठलभाई पटेल हाऊसच्या हिरवळीवर २७ तारखेच्या संध्याकाळी सुमारे दीड हजारांच्या जमावाने जॉर्जला गाठले व त्याची भूमिका विचारली. अनेक सवाल जवाब झाले. तुम्ही मंत्रिमंडळात गेलेच पाहिजे हा आवाज वारंवार उठत होता. काही पत्रकारांनी या प्रसंगाचे वर्णन 'घेराव' असे केले. पण तो विरोधी घेराव नव्हता. त्यात जॉर्जला वठणीवर आणण्याचा किंवा त्याला ऑफेंड करण्याचा उद्देश नव्हता. तसा तो असता तर जमावातून वारंवार 'जॉर्ज फर्नांडीस झिंदाबाद' अशा घोषणा का झाल्या असत्या? अर्थात या जमावात काही हुल्लडबाज मंडळीही होती. त्यांनी काही गडबड करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना यश आले नाही. तुमच्या भावनांचा आदर करीन असे सांगून श्री. फर्नांडिसनी त्यांचा निरोप घेतला आणि दुसऱ्या दिवशी मंत्रिपदाची शपथ घेतली.

## डोईजड इमाम

जामा मस्जिदचे शाही इमाम सय्यद अब्दुल्ला बुखारी हे गेल्या काही महिन्यांत प्रकाशझोतात आहेत. इंदिरा गांधी व कॉंग्रेस पक्ष हेच खरे फॅसिस्ट आहेत, हिंदू-मुस्लिम एकता ही त्यांनाच नको आहे म्हणून संघ-जनसंघ मुस्लिमविरोधी, फॅसिस्ट असल्याचा ते प्रचार करतात, वगैरे त्यांची वक्तव्ये प्रसिद्ध झाली आहेत. साहजिकच जनता पक्षाच्या सभांमध्ये त्यांना मानाचे स्थान असते. इमामसाहेब वावरतात ते एखाद्या धर्मगुरूस शोभेल अशा रुबाबाने. परवा रामलीला मैदानावरच्या सभेस ते आले. सभा आधीच सुरू झाली होती. मोरारजी, जगजीवनराम हे आधीच येऊन बसले होते. इमामसाहेब आले. मोरारजींच्या जवळ जाऊन उभे राहिले आणि म्हणाले, 'जरा उठो तो.' पंतप्रधान मोरारजींना कळेना हे असे का म्हणताहेत. पुन्हा इमामसाहेब आपल्या भरदार आवाजात म्हणाले, 'जरा उठो तो.' मोरारजी उभे राहिले, आणि इमामसाहेबांनी त्यांना प्रेमभराने मिठी मारली व अभिनंदन केले. शेजारच्या बाबूजींनाही त्यांनी उभे राहायला लावून अशी मिठी मारली. त्या दिवशीच्या आपल्या भाषणात ते म्हणाले, 'मी मोरारजीभाईंना सांगतो की तुमच्या मंत्रिमंडळात तुम्ही कोणकोणत्या मुस्लिम मंत्र्यांना घेणार ते आधी मला सांगा. तुमच्या मंत्रिमंडळाची यादी मला दाखवा. त्यांतले कोणते मुस्लिम मंत्री चांगले आहेत ते मी सांगतो. माझ्या सल्ल्याप्रमाणे ती नावे ठरवा.' सभेतले हे वक्तव्य तसे अनेकांना खटकले. पण कोणी काही म्हणाले नाही. पण इमामसाहेब 'बोले तैसा चाले' च्या परंपरेतले निघाले. दुसऱ्या दिवशी ते मोरारजींच्या घरी गेले आणि त्यांना मंत्रिमंडळाची यादी मागू लागले. मोरारजींनी त्यांना मुस्लिम मंत्र्यांचे नाव सांगितले. पण इमामसाहेबांचे तेवढ्याने समाधान होईना. त्यांनी यादीचा आग्रह कायम ठेवला. पण मोरारजी काही बधेनात. यादी दाखविण्यातल्या अडचणी सांगून मोरारजींनी त्यांना कटविले. शेवटी इमामसाहेब यादी न पाहताच परतले. असे हे 'एक्स्ट्रॉ-कॉन्स्टिटयूशनल पॉवर सेंटर' बनता-बनता राहिले! सध्या इमामसाहेब आजारी असल्याची बातमी अनेकांनी रेडिओवर ऐकलीच असेल.

## निवडणुकांचा धूमधडाका

राजधानीतल्या राजकीय निरीक्षकांच्या मते पुढील सहा महिने देशात निवडणुकांचा धूमधडाका उडणार आहे. राजकीय व घटनात्मकदृष्ट्या निवडणुका आता आवश्यक झाल्या आहेत. राष्ट्रपतींची निवडणूक येत्या ४ महिन्यांच्या आत झाली पाहिजे. कारण कार्यवाहक राष्ट्रपती सहा महिनेच राहू शकतो. पण त्यापूर्वी विधानसभांच्या निवडणुका झाल्या पाहिजेत. तामिळनाडू, नागालॅंड व काश्मीर विधानसभा विसर्जित आहेत. त्यांच्या निवडणुका घ्याव्या लागतील. देशभर कॉंग्रेस पक्षाचा धुव्वा उडाल्याने जी राजकीय परिस्थिती निर्माण झाली आहे, त्या नव्या परिस्थितीत सर्वच राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका घेण्याचा विचार चालू आहे. पण सर्वांची मुदत अजून संपलेली नाही. मुदतीपूर्वी विधानसभा बरखास्त केल्याने कॉंग्रेसवर आजपर्यंत जी टीका होत होती तीच नव्या सत्ताधारी पक्षावरही होईल. पण ४२ वी घटनादुरुस्ती रद्द करण्यासाठी लोकसभा, राज्यसभा यांच्याबरोबरच दोन तृतीयांश राज्यांच्या विधानसभांनाही ती रद्द ठरवावी लागेल. यासाठी केंद्राप्रमाणेच राज्यांतही जनता पक्षाचे बहुमत होणे आवश्यक आहे. अशा रीतीने राजकीय व घटनात्मक प्रश्नांची या प्रश्नात झालेली गुंतागुंत सोडवण्यात व त्यातून इष्ट तो मार्ग काढण्यात नव्या कायदा मंत्र्यांचे डोके व त्यांची यंत्रणा सध्या गुंतली आहे. योग्य मार्ग निघाल्यास दि. १२ ते १५ मे या दरम्यान सर्व राज्यांत विधानसभा निवडणुका होतील असा अंदाज आहे. विधानसभा निवडणुकांनंतर लगेच राष्ट्रपतींची निवडणूक होईल. सध्याचे राष्ट्रपती बी. डी. जत्ती. यांची उपराष्ट्रपतीपदाची मुदतही संपत आली आहे. तेव्हा तीही घ्यावी लागेल. राष्ट्र-

पती निवडणूक संपते न संपते तोच राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुका जवळ येऊन ठेपतील. १९७८ साली त्या व्हायच्या असल्या तरी त्यांचे वेध या वर्षाच्या शेवटी शेवटीच लागतील. राज्यसभेत काँग्रेसचे बहुमत आहे. ते समाप्त करण्याच्या दृष्टीने या राज्यसभा निवडणुका जनता पक्षासाठी महत्त्वाच्या आहेत. अशा रीतीने नवा निवडणुकांचा मोसम येऊ घातला आहे.

निवडणुकांविषयी अधिकृत धोरण अजून जाहीर झाले नसले तरी, जनता पक्षाच्या राज्या – राज्यांतील कार्यकर्त्यांना निवडणुकांचे वेध आत्तापासूनच लागले आहेत. उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश या राज्यांतून तालुका – जिल्हा – राज्य पातळ्यांवरील कार्यकर्त्यांच्या झुंडीच्या झुंडी पटेल हाऊसमध्ये सतत येत आहेत. निवडणुकांच्या तिकिटासाठी आपापला क्लेम कायम ठेवू पाहत आहेत. विशेषतः गेल्या वेळी निवडणुकीत हरलेले व ऐन वेळी नाव मागे घ्यायला लावलेले उमेदवार यावेळी पुन्हा मैदानात उतरण्याचा, आपला क्लेम कायम ठेवण्याच्या खटपटीस लागले आहेत. अगदी खर्चाची सोय आपण कशी व किती करू इथपर्यंत चर्चा सुरू झाल्या आहेत. पटेल हाऊसच्या विविध पक्ष कचेऱ्यांमधली गर्दी यामुळे अजून कायम आहे. आता या साऱ्या सत्ताधारी पक्षांच्या कचेऱ्या झाल्या आहेत त्यामुळे तर गर्दी अधिक वाढली आहे !

## राष्ट्रपती भवन !

मोरारजीभाईंच्या नेतृत्वाखालील सरकारने काटकसरीचे व साधेपणाने राहण्याचे वचन दिले आहे. मंत्रिमंडळातील सदस्य या वचनास बद्ध आहेत. मंत्र्यांच्या घरावर असणारी सिक्युरिटी व अन्य व्यवस्था कमी होईल अशी अपेक्षा आहे. आजच मोरारजींच्या घरावरील सिक्युरिटी व्यवस्था इंदिरा गांधींच्या मानाने किती तरी कमी आहे. मोरारजी, जॉर्ज फर्नांडिस या दोघांनी दोन वेगवेगळ्या वेळी जनतेचा राष्ट्रपती, राष्ट्रपती भवनासारख्या अलिशान जागेत राहणार नाही, त्याचा बडेजावही कमी होईल असे सूचित केले आहे. मोरारजींनी पत्रकार परिषदेत, 'भारत हा गरीब व समाजवादी देश आहे, म्हणून राष्ट्रपती भवनावरील खर्चाचा पुनर्विचार करावा लागेल' असे सांगितले आहे. तेथे राष्ट्रपतींनी राहावे की नाही याचा पुनर्विचार करू असेही त्यांनी सांगितले आहे. मोरारजी स्वतः साध्या राहणीचे म्हणून प्रसिद्ध आहेत. साहजिकच आपल्या उदाहरणाने आपल्या सहकाऱ्यांना व अधिकाऱ्यांना ते साधेपणाचा धडा गिरवायला लावतील अशी लोकांची अपेक्षा आहे.
¤

सत्ताधारी पक्ष बदलला आहे. आधीच्या पक्षाने जे काही केले, ते सारे त्याला बदलून टाकायचे आहे. काँग्रेस व इंदिराजींची खास अशी जी माणसे मोक्याच्या जागी होती, त्यांनी धडाधड राजीनामे दिले आहेत. ते स्वीकृतही झाले आहेत. महंमद युनुस, पी. एन्. धर, धवन, हक्सर ही काही निवडक नावे. यांच्या जागी नव्या नेमणुका होत आहेत. ज्यांनी ज्यांनी अती उत्साहाच्या भरात, आणीबाणीच्या काळात संजय–इंदिरांच्या सोयीने सर्व कारभार केला ते सर्व घरी बसणार आहेत. महंमद युनुस हे समाचारचे मालक होते. त्यांनी राजीनामा दिल्याने समाचारमधल्या पत्रकारांनी सुटकेचा निःश्वास टाकला. पी. एन. धर हे पंतप्रधानांचे मुख्य सचिव होते. त्यांचा राजीनामा स्वीकृत झाला आहे. सध्या काश्मीरचे राज्यपाल असलेले श्री. लक्ष्मीकांत-झा हे त्या जागी येतील असा अंदाज आहे. मोरारजी अर्थमंत्री असताना श्री. झा त्या खात्याचे सेक्रेटरी होते. ही जुनी ओळख असल्याने पंतप्रधानांचे व त्याचे चांगले जमेल अशी अपेक्षा.
¤

आणीबाणीच्या काळात ज्या न्यायाधीशांनी सरकारविरोधी निकाल दिले त्यांच्या दूर-दूर बदल्या करण्यात आल्या होत्या. नव्या कायदा मंत्र्यांनी हे प्रकरण लगेच हातावेगळे करण्याचे ठरवलेले दिसते. त्या काळात सरकारविरोधी निकाल दिल्याने काहींच्या बदल्या झाल्या, तर काहींच्या नोकऱ्याच गेल्या. असेच नोकरीवरून काढलेले माजी न्यायाधीश दिल्लीच्या सुप्रीम कोर्टात वकिली करीत आहेत. त्यांना परत नोकरीत येणार का म्हणून विचारण्यात आले. तुम्हाला पाहिजे असल्यास दिल्लीतच तुम्हाला अॅकोमोडेट करतो असे सांगितले गेले. पण सदर महाशयांनी ही ऑफर चक्क नाकारली. म्हणाले, 'ब्रिटिश राजवटीत मी एक दिवस फरारी होतो, म्हणून मला स्वातंत्र्यसैनिकाचे पेन्शन मागण्यासारखेच ते होईल, म्हणून मी नकार दिला.' लवकरच गुजरात, दिल्ली, मद्रास, मुंबई या हायकोर्टांचे बदललेले न्यायाधीश पुन्हा आपापल्या वा पाहिजे त्या जागी लवकरच परततील, अशी शक्यता आता निर्माण झाली आहे.

## निर्नायकी काँग्रेस

काँग्रेस पक्षाच्या आघाडीवर आता हळूहळू हालचाल सुरू झाली आहे. पराभवाच्या धक्क्यातून सावरलेले एक–एक पुढारी हळूहळू बोलू लागले आहेत. काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वात बदल झाला पाहिजे अशी मागणी जोर धरत आहे. सर्वांचा असंतोष व राग देवकांत बरुआ यांच्यावर आहे. असे असले तरी, इंदिरा गांधींनाही कुणी दोषमुक्त केले नाही. परवा माजी मंत्री चंद्रजीत यादव यांच्या घरी काँग्रेसी पुढारी जमले होते. त्या बैठकीत बाईंवरही टीका झाली. एकूण वाऱ्याची दिशा लक्षात घेऊन श्रीमतीजींनी परवापरवा निवडणुकीतील अपयशास मीही जबाबदार आहे असे म्हटले आहे. सत्ता हा प्रमुख घटक नसल्याने बाईंचे काँग्रेसमधले संघटनात्मक स्थान आज तरी निश्चित नाही. 'वादातीत नेतृत्व' हे त्यांचे आणीबाणीतले व त्यापूर्वीचे स्थान आता राहिलेले नाही, त्यामुळे खरे तर, आजघडीला काँग्रेसची अवस्था निर्नायकी झाली आहे. असे असले तरी, सवयीने काही राज्यांतील काँग्रेस पुढाऱ्यांची पावले बाईंच्या घराकडे अजूनही वळतात. परवा महाराष्ट्राचे नेते आपले भांडण घेऊन इथे आले होते. ते सवयीने १. सफदरजंग रोडकडे वळले. बाईंसमोर त्यांनी आपले गाऱ्हाणे मांडले. बाई काय बोलणार ? बाहेर आल्यावर हे म्हणाले, 'नेतृत्व बदलायला श्रीमतीजींनी अनुकूलता दाखविली आहे.' काँग्रेस अध्यक्ष देवकांत बरुआंबरोबरच इंदिरा गांधी, संजय गांधी, बन्सीलाल, विद्याचरण शुक्ला यांच्याविरुद्ध असंतोषही खदखदतो आहे. देवकांत बरुआ यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरीत आहे. एका वर्किंग कमिटी सदस्याच्या म्हणण्याप्रमाणे तर, १२ एप्रिलला होणाऱ्या बैठकीच्या दरम्यान सध्याची कार्यकारिणीच

आपला राजीनामा देईल. त्याऐवजी (कायम व्यवस्था होईपर्यंत) काही तात्पुरती व्यवस्था केली जाईल. संजय गांधींनी तर अ. भा. काँ. कमिटीतल्या आपल्या जागेचा, 'नको ती कटकट' म्हणून राजीनामाच देऊन टाकला आहे. अंबिका सोनींनीही युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. त्यांच्या जागी आलेले नवे अध्यक्ष प्रियरंजन दास मुन्शी हेही अनेकांना पसंत नाहीत. त्यामुळे त्यांची नेमणूक होताक्षणीच युवक काँग्रेसच्या तीन सरचिटणिसांनी आपला विरोध नोंदविला आहे. दुसरीकडे काँग्रेस पक्षांतर्गत पूर्वी असलेल्या सोशलिस्ट फोरमचे पुनरुज्जीवन करण्याची खटपटही सुरू झाली आहे. के. पी. उन्नीकृष्णन, मालवीय, चंद्रजीत यादव वगैरे मंडळी त्या दृष्टीने तयारीलाही लागली आहेत. त्यांना यश आले तर काँग्रेस अंतर्गत पुरोगामी डाव्या शक्तींना एकत्र आणण्याचे जुने चऱ्हाट चघळण्याला त्यांना व सी. पी. आय्. ला सोय होईल. वर म्हटल्याप्रमाणे सध्या काँग्रेस बेवारशी झाल्याने या मंडळींना यश येईलही.

□

जुन्या लोकसभेत काँग्रेसच्या पहिल्या बाकावर शेजारी शेजारी बसणारे यशवंतराव चव्हाण व जगजीवनराम नव्या लोकसभेतही पुढल्या रांगेतच कायम आहेत. फक्त एकाची (यशवंतरावांची) जागा बदलली आहे. पण यापेक्षा अधिक काही फरक दोघांमध्ये पडलेला नाही. दोघांचेही गाडी–बंगला–फोन–पी. ए. वगैरे लवाजमा कायम आहे. एकाचा मंत्री म्हणून तर दुसरा विरोधी पक्षनेता म्हणून. स्वातंत्र्यानंतरच्या लोकसभेत अधिकृत विरोधी पक्ष व विरोधी पक्ष नेता यावेळी प्रथमच अस्तित्वात आला आहे. अधिकृत विरोधी पक्षनेत्याला कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा व सोयी–सवलती दिल्या जातात. त्यामुळे साहेब होते तिथेच व तसेच राहिले. फक्त सरकारी सत्ता गेली. डोंगरे (पी. ए.) कायम, गाडी–बंगला–टेलिप्रिंटरही कायम !

काँग्रेस सरकारने रेडिओ व टेलिव्हिजन यांचा वापर पक्षीय उद्दिष्टांसाठी केला असा त्यावेळच्या विरोधी पक्षीयांचा आरोप होता, तो खराही होता. पण हे विरोधी पक्ष स्वतः जेव्हा सत्तेवर आले तेव्हा त्यांची वागणूक काही वेगळी घडली नाही. दि. २५ मार्चला मोरारजींचा पंतप्रधान म्हणून शपथविधी झाला. त्याच दिवशी जनता पक्षाच्या वतीने रामलीला मैदानावर विजयसभा झाली. मोरारजीही त्या सभेत बोलले. ही सबंध सभा ती चालू असतानाच दिल्ली टेलिव्हिजनवर दाखविली गेली व रेडिओवरही ऐकविली गेली. सत्ताधारी पक्षाची सभा सरकारच्या ताब्यात असलेल्या रेडिओ–टेलिव्हिजनवरून प्रक्षेपित करणे हे जनता पक्षाने केले तर क्षम्य थोडेच होते? दुसऱ्या दिवशी जॉर्ज फर्नांडिसनी याविषयी नाराजी व्यक्त केली तर, कोणी म्हणाले तो विक्षिप्त, तर अन्य कित्येकांनी त्याकडे दुर्लक्षच केले. पण त्यानंतर कोणी त्यावर बोलले नाही. विजयामुळे आलेला उत्साहाचा, आनंदाचा भर ओसरताच शांतपणाने झाली चूक कबूल करून ती पुन्हा न करण्याचे अडवानीजी ठरवितील तर बरे होईल !

(३१ मार्च १९७७)

□

---

काँग्रेसची 'अर्धी चड्डी' : पृष्ठ ४ वरून

होताच. पक्ष (?) जिवंत राहावा–वाढावा–मोठा व्हावा म्हणून ते करीत होते असे वाटत नाही.

नेतेबदल हातातोंडाशी आला हे स्पष्ट दिसत असतानाही 'बीचमे मेरा वाळवा' राजारामबापू दाखलच. चव्हाण हटाव मोहीम ही शुगर सिंडिकेटवाल्यांनी चालविल्याचे निवेदन 'वाळवा' साखर कारखान्याच्याच गाड्या अन् डायरेक्टरांना वापरून त्यांनी करावी, हे हास्यास्पदच नव्हे काय? पण एकीकडे खुजगाव–नांदोली वादातच बापूदादा वाद संपल्याचे सांगत असताना ह्या मोहिमेच्या नेतृत्वाचा त्यांनी संशय घ्यावा व सच्चरित्र मुख्यमंत्री हवा, असेही सांगावे, या परस्पर विरोधी विधानांचीही संगती लागत नाही. दादा नकोत–शंकरराव हवेत, की मोहिते हवेत, असे स्पष्ट सुचविण्याचे धैर्य नाही.

नेतेबदलाच्या वादाचा निकाल तर लागलेलाच आहे. त्यासाठी एक शॅडो कॅबिनेट गतिमान होते. त्यातही विशेषतः एक खाते. (हे अगदी जाहीरपणेही आमदार निवासाच्या वर्तुळात गंमतीने सांगितले जाई !) ते खाते म्हणजे 'वातावरण निर्मिती खाते ! त्याचे कॅबिनेट मिनिस्टर होते आमदार विलासराव लोणारी (नासिक), राज्यमंत्री बाबूराव जगताप (सातारा), उपमंत्री डॉ. शंकरराव राख (जालना) आणि सेक्रेटरी होते विनायकराव पाटील (निफाड). निर्णय झाल्याचे काल रात्री (३१ मार्च) जगतापांच्या घरी जेव्हा दिल्लीहून फोन आल्यावर कळले, तेव्हा ही मिनिस्ट्री डिझॉल्व झाल्याची आनंदाची घोषणा तिथल्या तिथे करण्यात आली. नेते कुणीही होवोत, आपला 'सलाम !!'

आता प्रश्न असा आहे की, नामदार मुख्यमंत्रिमहोदय हे एवढ्या सहजासहजी आपले पद सोडायला तयार होतील का? चव्हाण गेली किती तरी म्हणजे जवळजवळ दोन दशके मिनिस्ट्रीत आहेत. तेव्हा ते उद्धट आहेत, तुसडे आहेत, माणूसघाणे आहेत, आडमुठे आहेत, असे कधी कुणी चुकूनसुद्धा (बरोबर) बोलल्याचे आठवत नाहीय. मग 'बाळा ती जन्मकळा' या उक्तीप्रमाणे जो माणूस वीस वर्षे वागला नाही तो तसे वीस महिन्यांत वागेल का? हे पटत असले तरी चव्हाण तसे झाले हे खरेच आहे. कारण 'गांधीं'च्या हृदयपरिवर्तनाचा विश्वास ! इंदिरा गांधींनी आणीबाणी जाहीर करून स्वतःसहित सर्वांचेच आसन निरंकुश करून ठेवलेले होते. चव्हाणही अपवाद नाहीत. गरिबांच्या कळवळ्याच्या ढालीखाली त्यांना खरे म्हणजे चेचायचे होते ते शुगर सिंडिकेट. का? तर वसंतरावदादांच्या पाठिंब्याने अवघा सहकार–महाराष्ट्र यशवंतरावांच्या पाठीशी उभा होता. म्हणजेच विरोध यशवंतरावांना होता. आता हादेखील इंदिराजींचाच पवित्रा असणार. 'यशवंतराव चव्हाणांबरोबर शंकरराव चव्हाण संयुक्त दौरा करणार,' ही डबल

कॉलमी बातमी वीस कलमीच्या काळात झळकताच शंकररावांनी त्याचा जाहीर इन्कार करावा, यातच इंदिरानिष्ठा स्पष्ट होते. आणि जर इंदिराजींसाठीच शंकररावांनी यशवंतरावांशी वाईटपणा घेतला असेल (किंबहुना असावाच!), तर त्यांचेही चुकते कुठे?

—आज जर फासे वेगळे पडले असते आणि केंद्रसत्ता इंदिराजींच्याच हाती असती तर यशवंतरावांनाही औरंगाबादेत पुनः जाऊन (नाईकांऐवजी) जाहीरपणे शंकररावांच्या (?) समर्थ नेतृत्वाची पावती द्यावी लागली असती. एवढेच नव्हे तर आणखी पाच वर्षे तेच या पदावर राहतील, असे सांगावे लागले असते.

ही सगळी अवस्था शंकरराव जाणून का नाहीत! दैव फिरले तरी १०० टक्के नाही. जगजीवनरामबाबूंनी नाराज काँग्रेसजनांची सोय करून ठेवली आहे: कारणे कोणतीही असोत, गरिबांचा कळवळा दाखवून काँग्रेस हाऊसमधून बाहेर पडणारांसाठी CFD चे आऊट हाउस खडे आहेच.

—शिवाय बापूसाहेब काळदातेंशी अर्धा—एकतास चर्चा. तीही 'अर्थ' पूर्ण, सुसंवादशील.

— खेरीज कांटावालांपासून, मुरारजींच्याही गाठीभेटी!

— नेतेपदाचे बदल व्हावेत हा निर्णय काँग्रेसश्रेष्ठींनी घेतला! ठीकच. पण नेता घडवता येत नाही — तो जन्मावा लागतो. लोकशाहीत तर तो निवडूनही यावा लागतो. लादून काय होते — तर फक्त 'शंकरराव चव्हाण!'

□

### खुळभर दुधाची कहाणी

□ नाहीतरी केंद्रात इंदिराजींचे राज्य येणारच आहे. मग आपल्याकडची एक जागा पाडून, 'यांनी' भाग न घेतल्याने काँग्रेसला एक जागा गमवावी लागली, असे श्रेष्ठींना कळले म्हणजे अनायासे भाव वाढेल, असा विचार प्रत्येकजण करीत होता. एक तर, निवडणूक मोहिमेत स्वतः भाग न घेता कार्यकर्त्यांना 'कानमंत्र' देऊन पक्षाचा उमेदवार पाडण्याचा प्रयोग झाला. नाहीतर उघडपणे निवडणूक मोहिमेत भाग घेऊन काँग्रेस यंत्रणा जेवढी कच्ची ठेवता येईल तेवढी ठेवण्यात आली. परिणामी महाराष्ट्रातल्या शंभर टक्के विजयाची खात्री असलेल्या जागांत 'डायनामाईट' पेरले गेले व यथाकाल त्याचा स्फोटही झाला. माझ्या एका सीटच्या पराभवाने काँग्रेसचे काय जाणार? शंकरराव चव्हाणांचेच नाक कापले जाईल! हा विचार एक अन् अवलंबिणारे अनेक. परिणामी काँग्रेसचेच नाक कापले गेले आहे. अगदी त्या खुळभर दुधाच्या कहाणी सारखेच घडले. पाऊस पडावा म्हणून शंकराला (पुनः शंकरच) गावाने दुधाचा अभिषेक करावा असे ठरले. प्रत्येकाने एक एक वाटीभर दूध रांजणात ओतावे, अशी दवंडी पिटली गेली. एवढा सारा गाव, दूध त्या रांजणात टाकणारच आहे, तेव्हा आपण दूध न टाकता वाटीभर पाणीच टाकले तर बिघडले कुठे! असा विचार एकाने केला व त्याने वाटीभर पाणी रांजणात टाकले. अभिषेकाची वेळ आली तेव्हा रांजण पाण्यानेच भरत होता. कारण प्रत्येकाने तोच विचार केलेला होता. या 'सीट' पाडापाडीतही नेमके तेच घडले, असा स्पष्ट खुलासा पराभवाची मीमांसा करताना मराठवाड्याच्या एका आमदाराने माझ्याजवळ केला.

### मुख्यमंत्रिपद

□ अहो या काँग्रेसवाल्यांनी तर मुख्यमंत्रिपद म्हणजे अगदी 'डिसग्रेस्ड' केलेय. विरोधीपक्षीय आमदार × म्हणाले, यांची काय भांडणे असतील ती इतक्या खालच्या पातळीवर आलीय की त्या 'पदा' चा देखील मान ठेवला जात नाही. असे जर असेल तर मुख्यमंत्र्यांचा सरकारी अधिकाऱ्यांवरचा वचक तरी कसा कायम राहील? त्या 'पदा' चा दरारा टिकून शासकीय अधिकारी लोकाभिमुख कामे करतील असाच विरोध हवा. काँग्रेसवाले सरधोपटपणे शंकररावांबरोबर त्या पदालाही लाजवीत आहेत, अन त्यामुळे मुख्यमंत्रिपद हे अगदी शेळीच्या शेपटासारखं झालंय. धड माशी देखील हुसकावता येत नाही अन् अब्रूही झाकता येत नाही.

### सह्याद्रीचा शाप?

□ महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे निवासस्थान म्हणून 'सह्याद्री' मराठी माणसांना परिचित झाला. हिंद–चीन युद्धाचे वेळी चव्हाण दिल्लीत दाखल झाले. त्यानंतर कै. कन्नमवार हे तिथे राहायला गेले. त्यांची कारकीर्द अल्पायुषी ठरली. 'सह्याद्री' चे (वास्तू) नि ज्यांचे जमते त्यांना एकदम उच्चतम जागा मिळते किंवा ज्यांचेशी जमत नाही ते राजकीयदृष्टया अल्पायुषी ठरतात, असा प्रवाद असल्याने नाईकसाहेब (माजी मुख्यमंत्री) 'वर्षा' निवासीच होते. नंतरचे गोदापुत्र मुख्यमंत्री वाजतगाजत 'सह्याद्री' वर गेले आणि तेवढेच वाजत आपल्या अयशस्वी, अल्पायुषी, कारकीर्दीचे बोचके बांधून घर गोदेच्या काठी पोचण्याच्या तयारीत आहेत. याचा अर्थ 'सह्याद्री' शी वागताना सावधान!! कडेकपाऱ्यात काय काय वास करीत असते ते लवकर कळणे अशक्य.

□


ग्रामीण आंदोलनांचा मागोवा घेणारे पुस्तक

**श्री ग्रामायन**

(दुसरी आवृत्ती : प्रकाशनाच्या वाटेवर)

**श्री. ग. माजगावकर**

**राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव । पुणे ३०**

मूल्य पंधरा रुपये

रंगभूमी । शिरीष सहस्रबुद्धे

# समोरच्या घरात

**शेवट चुकवू नये**
**बाकी काही पाहू नये**

योगायोग असा की, 'समोरच्या घरात' पाहायला गेलो त्याच दिवशी जोशी-अभ्यंकर प्रकरणातले गुन्हेगार सापडले होते. त्यामुळे आधीच पुष्कळांच्या डोळ्यात आणि डोक्यातही खून चढलेले. त्यात हे नाटकही खुनाविनापासूनच–खरं म्हणजे खुनाच्या आभासामुळं फोडलेल्या कर्कश किंकाळीपासून–सुरू झालं. त्यामुळे नाटक पाहण्यापेक्षा त्यातल्या (आणि बाहेरच्याही) रहस्याबद्दल तर्कवितर्क लढविण्यातच पब्लिकनं इंटरेस्ट घ्यायला सुरुवात केली. प्रत्यक्ष नाटक आणि कलाकारांची कामं यामुळेही या नाट्यबाह्य उद्योगाला उत्तेजनच मिळत गेलं. लेखकापासून शेवटच्या कलाकारापर्यंत सर्वच जण जरा जास्त नामवंत असल्यामुळे असा प्रकार होत असावा.

तर हे नाटक लिहिलंय रत्नाकर मतकरी यांनी. रहस्यमय कथाबिथा आणि एकांकिका यात त्यांनी खूप यश मिळवलंय. या तीन अंकी नाटकातूनही ते कुशल एकांकिका लेखक असल्याचंच सिद्ध होतं. कारण नाटकाचा एकंदर प्राण एखाद्या मोठ्या एकांकिकेपेक्षा जास्त नाही. तो फाटेपर्यंत ताणून हे लांबलचक नाटक बेतण्यात आलंय. त्यामुळे पुनरावृत्ती भरपूर. 'धंदेवाईक नाटक तीन–सव्वातीन तास चाललं नाही, तर आपण प्रेक्षकांच्या पैशाच्या पुरेसा मोबदला दिला नाही असं होईल', अशी भीती आमच्या निर्मात्यांना वाटते की काय कुणास ठाऊक! अशा मोबदल्याचा संबंध नाटकाच्या लांबीपेक्षा दर्जाशी जास्त असतो, हे त्यांना जितक्या तऱ्हेनं समजेल तितकं आम्हाला सोयीचं पडेल.

मतकरींच्या या नाटकाचा प्रयोग यापूर्वी १९७५ मध्ये इंडियन नॅशनल थिएटरनं (बहुधा) वेगळ्या नावानं केला होता. तथापि त्यावेळी त्याला यश लाभलं नव्हतं. निर्मिती भावना व सादरकर्ते हरीश कुलकर्णी–दिग्दर्शक अरविंद ठक्कर यांनी त्याचं पुनरुज्जीवन केलं आहे. का केलं आहे कुणास ठाऊक! अनुराधा (भावना) या सुखवस्तू महिलेवर कोसळलेल्या आपत्तीची आणि विलक्षण धैर्यानं आणि चातुर्यानं तिनं त्यांतून करून घेतलेल्या सुटकेची ही कहाणी. तिच्या पहिल्या पतीनं–चंद्रकांतनं–आपल्या सेक्रेटरीच्या प्रेमात पडून तिची फसवणूक केलेली, त्याच्या अपघाती निधनानंतर तिनं ज्याच्याशी लग्न केलं, त्या श्रीरंगनंही (अरुण सरनाईक) तिची इस्टेट आणि तिची मैत्रीण माधुरी (आशा पोतदार) यांच्यावरच डोळा ठेवला आणि तिला मनोरुग्ण ठरवून उपचारासाठी कायमचं स्वित्झर्लंडला पाठवायचं, असा डाव टाकला. त्यातच त्यांच्या समोरच्या घराच्या खिडकीत दोन खून झाल्याचे भास अनुराधाला होऊ लागले. मग पोलिसांना सतत फोन करून त्यांना दमविण्याचा चाळाच तिनं सुरू केला. त्यातच कार्तिकेय (गणेश सोळंकी) मानसोपचारतज्ज्ञ डॉ. पंडित (जनार्दन सोहनी) आणि तिला सामील असणारा इरसाल, घरगडी किसन (राघवेन्द्र कडकोळ) यांची गुंतागुंत.

नाटक खरोखरीच रहस्यमय ठरतं ते त्याच्या शेवटी दिलेल्या अनपेक्षित कलाटणीमुळे. तेव्हा त्याचा शेवट सांगण्यात स्वारस्य नाही. मतकरींना दाद द्यायला हवी ती या शेवटासाठीच. शेवटापाशी आल्यानंतर त्यांच्या आधीच्या आखणीचं कौतुक वाटल्याखेरीज राहत नाही. या रहस्याची जात बरीचशी विजय आनंदच्या 'ज्युएल थीफ' नावाच्या नामी चित्रपटाच्या शेवटासारखी. त्या सिनेमाचं बाकी सगळं सोडा, पण त्याच्या रहस्याचा स्फोट झाल्यानंतर विजय आनंदची अगोदरची डोकेबाज कारागिरी डोकं भिरभिरवते, तसंच या नाटकाचं आहे. मात्र एवढं खरं की, शेवट सोडता बाकीचं नाटक नितांत बोअर आणि मानसिक छळणूक करणारं आहे. एकतर एखाद दोन अपवाद वगळता विनोद गचाळ आहेत 'इथे भेटलात, 'तिथे' भेटू नका,' असली सनातन वाक्यं विनोद म्हणून नव्यानं वापरण्यातली विनोदबुद्धी वाखाणावी तेवढी थोडीच. दुसरं, मागे म्हटल्याप्रमाणे नाटकातल्या घटनांचा तोचतोचपणा अपरिहार्यपणे लेखनात–संवादातही उतरला आहे. भावनाबाईंनी वारंवार कर्णकटू किंकाळ्या फोडून डोळे फिरवणे आणि मग श्रीरंगमाधुरीनं तिची खरीखोटी समजूत काढणं, किसननं पुन्हापुन्हा चोरून बोलणी ऐकणं आणि पुन्हापुन्हा सापडणं, कार्तिकेय हा वृत्तपत्रप्रतिनिधी, त्यामुळे त्यानं लोचटपणा करणं हे सगळे प्रकार प्रेक्षकांनी वन्समोअर दिल्याचं अकारण गृहित धरून प्रामाणिकपणे वारंवार पार पाडले जातात. कार्तिकेय आणि किसन यांना वाजवीपेक्षा कितीतरी लांबलचक भूमिका मिळाल्या आहेत, आणि त्यांचा उद्देश मात्र विशेष महत्त्वाचा ठरत नाही; तर माधुरीची भूमिका संपूर्ण एकसुरी single-track बेतली गेल्यानं कंटाळवाणी ठरते. स्क्रिप्टच्या या आणि अशा मर्यादांच्या चौकटीमध्ये दिग्दर्शक अरविंद ठक्कर यांना काहीही उल्लेखनीय करता आलेलं नाही. किंबहुना दिग्दर्शक या नात्यानं त्यांची वेगळी उठून दिसणारी कामगिरी — distinctive Contribution –काय याचा बोध मला झालेला नाही. नामवंत कलासंचाला राबविण्यात त्यांना आलेलं अपयश निरनिराळ्या भूमिकांवरून स्पष्ट होतंच. पण व्यावसायिक नाटकाला किमान अपेक्षित असलेली सफाईसुद्धा ते आणू शकलेले नाहीत, हे अडखळणारी प्रकाशयोजना (अडखळणारी पात्रेही), कच्चे पाठांतर ( वीस दिवसात नाटक उभं केल्याचा किंवा बसविल्याचा विक्रम नडला! ) आणि पोलिसस्टेशनचं दृश्य दाखवताना वेळीअवेळी दगा देणारा तो पडदा, एवढे साक्षीदार नक्की सिद्ध करतात. नाटकाच्या तिसऱ्या अंकात अनुराधेचं पूर्वायुष्य त्यांनी आठ–दहा मिनिटांच्या एका फिल्मद्वारे – तीही रंगीतसंगीत – दाखवलंय. ही काय थट्टा आहे? दोन व्हिज्युअल आर्टफॉर्म्सचं जंगी मिश्रण करून नवा फॉर्म निर्माण केल्याचं श्रेय त्यांना हवं होतं, की निर्मात्यांच्या जादा पैशाची सोय करायची होती? तो प्रकार एकुणात फारसा सुखद नाही एवढं खरं.

नाटकाचा प्रयोग नुसता कंटाळवाणाच नव्हे तर त्रासदायकही करण्यात फार मोठा वाटा टाकल्यासारखी कामं उरकणाऱ्या कलाकारांचा. यातही पहिला क्रमांक अरुण सर-

नाईकचा. अडखळत चालणं, प्रचंड घाईनं आणि भावरहित बोलणं, आसपासच्या विनोदांना हसू आवरण्याचा प्रयत्न आणि विलक्षण 'कॉन्शसनेस'. त्यांचं एवढं उरकलेलं काम मी प्रथमच पाह्यलंय. कदाचित त्यांची तब्बेत ठीक नसावी. भावनाबाईंनी मधून-मधून चांगली एक्स्प्रेशन्स दिली. तसंच अधनंमधनं अतिरेकही केला. इंग्रजी उच्चारात आणि लयीत मराठी बोलायच्या नव्या लाटेत त्याही वाहून गेलेल्या दिसतात. दुसऱ्या अंकाच्या प्रारंभीचा त्यांचा आणि श्रीरंगचा प्रेमसंवाद आठवावा. 'पुराणी पहचान' आणि 'हमशकल' मधल्या तनुजाच्या यासारख्या भूमिकेतल्या अभिनयाची आठवण त्यांचं काम पाहताना सतत होत होती. पण तो आपला एक योगायोग असावा. त्यामानानं माधुरीच्या भूमिकेत आशा पोतदार ठीक होत्या. गणेश सोळंकी आणि राघवेन्द्र कडकोळ यांनी खूपच तयारीनं आणि समरसून कामं केली हे खरं. मात्र दोघांचाही स्वत:वर यापेक्षा जरा जास्त ताबा हवा आहे. विशेषत: कडकोळांचा मोहन कोठीवान (इन्स्पेक्टर) आणि जनार्दन सोहनी (डॉ. पंडित) या दुय्यम भूमिका विशेष उल्लेखनीय. एकंदरीतच दुय्यम भूमिका आणि कलाकार सरस ठरलेलं हे एक नाटक. रहस्याच्या दृष्टीनं साधूनही बाकीची भट्टी फसलेलं. □

---

हिंदी चित्रपट

# पापी

## पाप कुणाचे ताप कुणा

---

हिंदी सिनेमातली बहीणभावंडे (जुळी असल्यास हमखासच) निव्वळ बालपणीच्या ताटातुटीसाठीच (आणि अर्थातच थोरपणीच्या पुनर्भेटीसाठीही) जन्माला घातलेली असतात, अशी माझी इतक्या वर्षांच्या (कटु) अनुभवानं पक्की खात्री पटली आहे. विशेष म्हणजे सिनेमांची नावं व बहीणभावंडांचे चेहरे वेगवेगळे दिसले तरी, त्यांच्या हरवण्यासापडण्याच्या पद्धतीत फारसा बदल होत नाही. 'पापी' चित्रपट वरील आणि इतर सर्व प्रथा पाळूनच काढण्यात आलेला आहे. साहजिकच त्यांतल्या भावंडांमैकी बहीण राणी (झीनत अमान) चोर-लुटेरा बनते, तर भाऊ राजकुमार (सुनीलदत्त) पोलिस इन्स्पेक्टर. मग तो सतत बहिणीच्या शोधात असतो. भारतीय सी. आय्. डी. इन्स्पेक्टर असल्यानं वेळोवेळी डोळे ऊर्ध्वदिशेला लावून व नाकपुड्या फुगवून दबल्या खर्जात 'जबतक......तबतक' छापाचे टाळीचे डायलॉग फेकले, (उदाहरणार्थ, जबत्तक मेरी राणो मुझे नहीं मिल जाती, तबत्तक दुनियाकी हर खुशी मेरे लिए) की जोशी-अभ्यंकर खूनप्रकरणांप्रमाणेच राणीचाही शोध लागेल असा जबरदस्त आत्मविश्वास त्याला असतो. इकडे राणी त्याच्या (फुगीर) नाकावर टिच्चून दरोडे घालता घालता, एकाचवेळी एका बुरखेधारी बॉसच्या टोळीत, बॉसहस्तक प्रेम चोप्रांच्या तावडीत व डॉ. अशोक रॉय (संजीवकुमार) यांच्या प्रेमात (सा-)पडते. हा डॉक्टर अहिंसावादी असून (सुद्धा) त्याचं पोट फारसं सुटलेलं नसतं, कारण 'पापी'चं चित्रीकरण दोन-तीन वर्षं चालू होतं. डॉक्टरांची मानलेली बहीण आशा (रीना रॉय)चं राजकुमारांवर, राणीची आठवण सोडून राहिलेल्या वेळात प्रेम. गुन्हेगारांबाबतीत डॉक्टर विनोबावादी, हृदयपरिवर्तनवीर, तर राजकुमार हे लॉरेन्स फर्नांडिसना पकडणाऱ्या आणीबाणीवीराच्या सरळचा नात्यातले. त्यामुळे नाचगाण्यांच्या जोडीने थोडा भावनात्मक, थोडा मानवतावादी, थोडा कौटुंबिक, थोडा तात्त्विक, थोडाथोडा नैतिक, मानसिक आणि बराचसा शारीरिक असा मिसळमस्तानी संघर्ष. आणि हा सर्व आधीचा प्रकार सेन्सॉरमधून सुटण्यासाठीच बहुधा, शेवट नुसताच गोड न करून देशभक्तीपर आणि ध्येयवादी वगैरे सुद्धा दाखवण्याची खटपट केली आहे.

या सगळ्या भानगडीतले मुख्य पापी अर्थातच ओ. पी. रल्हन. कारण तेच या सिनेमाचे कथाकार, दिग्दर्शक व निर्मातेसुद्धा. साहजिकच पाप एकाचं आणि ताप इतरांना असा प्रकार इथं झालाय्, अर्थात तसं पाहिलं तर तिकिटं काढून सिनेमा पाह्यला यायचं पाप प्रेक्षक करतातच, तेव्हा त्यांनाही प्रायश्चित मिळायला हवंच. 'पापी' हे काम चोख बजावील. स्वत: रल्हनसाहेबांनी रॉकी फोटोग्राफरची विनोदी भूमिका सहजतेनं आणि संयमानं केली असून निदान एक-चतुर्थांश पापातून मान सोडवून घेतली आहे. सर्व कलाकारांनी आपापली कामे शक्य तितक्या घिसाडघाईने उरकली आहेत. संजीव-सुनील या दोघांचीही कामं अत्यंत एकसुरी. झीनत-रीना दोघीही दिसल्या आहेत छान, आणि भूमिकेतला सर्कसचा भाग वजा जाता झीनतनं प्रभाव पाडण्याचा बराच प्रयत्न केल्याचं जाणवतं. तिला बांधून ठेवून कबूलीजबाब घ्यायचा प्रयत्न होतो त्या प्रसंगातला तिचा अभिनय हे एक उदाहरण. रल्हनने दोनचार जोक्स तब्येतीत टाकलेत. 'काफी समझदार लगते हो,' हा त्यातला एक. सुनील-रीनाचं एक सोडा, पण संजीवकुमारनं अशी भूमिका का स्वीकारावी हे कोडंच आहे.

चित्रपटातली साहसे अवास्तव आहेत. बॉस नं. १ व २ ही प्रकरणे हास्यास्पद आहेत. सुसंगत व सुसूत्र कथाप्रवाहाशी सामान्यत: फटकून वागणूक आहे. भप्पी लाहिरी यांचं संगीत कामचलाऊ म्हणून लक्ष्मीप्यारेचा दर्जापेक्षा खूपच बरं आहे. 'प्यार है गुनाह सुनो' हे गाणं उल्लेखनीय. भप्पी लाहिरी हे उदयोन्मुख संगीतकारांपैकी एक! बरेच आशादायक असले तरी रवींद्र जैनची depth त्यांच्यात दिसत नाही. पण त्याबद्दल पुन्हा केव्हातरी.

माणूस भूतकाळापासून एकंदरीत काही शिकत नाही. हेच खरं. एरवी 'तलाश'मध्ये कोटीचा मार खाल्यानंतर रल्हननी पापीचे सेट्स असे चैनबाज का बनवले असते?

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

९।४।७७ ते १५।४।७७

**मेष : प्रतिष्ठा वाढेल**

भाग्यस्थानी चंद्र असताना आज आठवडा सुरू होत आहे. ग्रहांची कृपा आहे. दि.१३च्या राशीत प्रवेश करणाऱ्या रवीमुळे अनेक चांगल्या घटना घडतील. प्रतिष्ठा वाढेल. आठवड्याचा उत्तरार्ध पूर्वार्धापेक्षा अधिक उत्तम आहे. नोकरीत आजवर ज्या कारणासाठी तुमचे भांडण होते ते भांडण यावेळी नाहीसे होणार आहे. वरिष्ठांना तुमचे काम पसंत पडणार असून तुमच्या मागण्यांचा साहानुभूतीने विचार होणार आहे. पूर्वार्धात राजकारणात थोडी माघार घ्यावी लागणार आहे. मनातील हेतू कुणाकडे उघड न करणे जास्त हिताचे ठरणार आहे. रेस, लॉटरीत भाग घ्यावा, फायदा होईल. खते, रसायने खरेदी-विक्री करणारे भरपूर नफा मिळवू शकतील. बेकारांना उद्योगासाठी कर्ज मिळू शकेल. शुभ दिनांक ९–१३.

**महिलांना** : नोकरीत चांगले दिवस येतील.

**विद्यार्थ्यांना** : चांगली संगत ठेवणे आवश्यक आहे.

**वृषभ : यशस्वी वाटचाल**

खरे म्हणजे राशीत गुरू आल्यापासूनच तुमचे यश वाढत चालले आहे. साधारणतः जे जे मनात ठरवाल ते ते पुरे होऊ शकेल. दि. १३ ला रवी बारावा होत आहे. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तुम्ही राजकारणात रस घेणारे असाल तर, थोडे मनाविरुद्ध घडण्याची शक्यता आहे. तरी पण आठवडा अनेक बाबतीत लाभदायक ठरणार आहे. आर्थिक बाजू कमालीची भक्कम होणार आहे. उद्योगात गुंतवलेले भांडवल आता तुम्हाला फायदा देऊ लागणार आहे. शेती, रसायने, खते, औषधे, कापड व्यापार अडचणीच्या परिस्थितीतून बाहेर पडणार आहे. नोकरीत अडचणी नाहीत. वरिष्ठांबरोबर चांगले संबंध जुळून येतील. बेकारीने त्रासलेल्यांना दिलासा मिळेल. शुभ दिनांक ११–१२.

**महिलांना** : यश आणि आनंद मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : आळस दूर होऊन अभ्यासाला गती येईल.

**मिथुन : पुढे पाऊल पडेल**

सातवा चंद्र आज आहे. आठवड्याची सुरुवात चांगली होणार आहे. बारावा गुरू आहे. बौद्धिक क्षेत्रात थोडा फार आळस येऊ शकेल. लेखनात खंड पडेल किंवा लेखनाचा कंटाळा येईल. पण प्रकाशन व्यवसाय सुधारेल. दि. १३ ला रवी अकरावा होत आहे. ही शुभ घटना मानावी लागेल. प्रामुख्याने आर्थिक बाजू भक्कम होईल. पैसे मिळवण्याचे अनेक मार्ग दृष्टिपथात येतील. गुंतवलेल्या भांडवलामुळे धंदा सुधारणार आहे. व्यापार प्रगतीकडे झुकू लागेल. प्रवासाला हा आठवडा अनुकूल आहे. यात्रा, सहलीला जाणार असाल तर चांगले सहकार्य मिळू शकेल. नोकरी-व्यवसाय सुधारेल. साधारणतः आजवरच्या कामाचे योग्य मोल तुमच्या पदरात पडेल. बेकारीला कंटाळलेल्यांना यावेळी समाधान मिळणार आहे. शुभ दिनांक ९–१३.

**महिलांना** : घरसंसार अडचणीतून बाहेर पडेल.

**विद्यार्थ्यांना** : अभ्यासाला चालना मिळेल.

**कर्क : नोकरीत प्रमोशन.**

सामान्यतः हा आठवडा तुम्हास प्रतिकूल नाही. गुरू खूपच अनुकूल आहे. दि. १३ च्या रवी बदलानंतर नोकरीधंद्यात खूपच सुधारणा होणार आहे. एखाद्या राजकारणी व्यक्तीचा परिचय होऊन आगामी काळातील सूचक घटनांचे धागेदोरे जुळून यायची मदत होईल. प्रामुख्याने हा आठवडा एकंदरीत आशादायक स्थित्यंतर घडवून आणण्याची शक्यता आहे. कामात बदल होईल वा अधिकारात बदल होईल. पण जे घडेल ते बरेच आशादायक असेल. चालू धंद्यात आकर्षक प्रगती होईल. व्यापाऱ्यांची परिस्थिती समाधानकारक राहील. मंदीकडे झुकलेला व्यवसाय उभारण्याला संधी मिळेल. लोकांकडे येणे असलेली रक्कम वसूल होईल. जुन्या येण्याचा लाभ होईल. रेसमध्ये नशिबाची परीक्षा घ्यायला हरकत नाही. मध्यंतरी तुमचे जर नुकसान झाले असेल तर ते आता भरून येईल. प्रवासाचा बेत सध्यातरी लांबणीवर टाका. कारण शनि–मंगळाचा षडाष्टक योग आहे त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. शुभ दिनांक ९–१३.

**महिलांना** : आवश्यक घरगुती वस्तू खरेदीला अनुकूलता आहे.

**विद्यार्थ्यांना** : निराशा व भावनावशता टाळा.

**सिंह : अपेक्षा पूर्ती.**

गुरू दशमस्थानी असल्यापासूनच खरे म्हणजे तुमच्यावर दैवाची कृपा होऊ लागली आहे. तुमच्या प्रगतीचे गाडे जे अडचणीत गुंतून पडले होते ते मोकळे झाले आहे. आता चिकाटीने उद्योगाला लागलात तर तुमचे मनोरथ पूर्ण झाल्याशिवाय राहणार नाहीत. हा आठवडा आपल्या अपेक्षापूर्ती करणारा आहे. नोकरी करणाऱ्यांना शुभवार्ता कळावी. गेलेले न्याय हक्क परत मिळतील. झालेले नुकसान भरून निघेल. वरिष्ठांच्या कृपेचा प्रत्यय येईल. त्यांची मर्जी राहील. बेकारांना नोकरी मिळेल. राजकारणात ज्यांना उपेक्षा सहन करावी लागली होती त्यांना महत्त्व येईल. उद्योगाची स्थिती समाधानकारक राहील. नवीन भांडवल गुंतवणूक करण्याची योजना अमलात येईल. ठरवलेल्या योजना गती घेतील. तब्येत मात्र नरम गरम राहील. शुभ दिनांक १०–१२.

**महिलांना** : संसारात आनंद निर्माण होईल.

**विद्यार्थ्यांना** : परीक्षेत मोठे यश पदरात पडेल.

**कन्या : मिळकतीत वाढ.**

अकराव्या शनीचा लाभ तुम्हाला मिळू शकेल. श्रमाशिवाय किंवा कष्टाशिवाय संपत्ती मिळण्यामध्ये कन्या राशीच्या लोकांना नशीब क्वचितच लाभते. तुम्ही लॉटरी अगर रेसमध्ये प्रयत्न करा. हा आठवडा तुमचे एकूण काम अनुकूलतेने होणार आहे. स्वतंत्र उद्योगाची एखादी योजना पुढे येईल. ती धैर्याने स्वीकारा. दुय्यम धंदा चांगलाच सुधारेल. नोकरीची परिस्थिती समाधानकारक राहील. पगारवाढ, प्रमोशन अगर खास लाभ असे काहीतरी घडू शकेल. खर्चाच्या एकूण विवंचना दूर होऊ लागतील. आर्थिक ओढाताण संपुष्टात येण्याची चिन्हे दिसू लागतील. लोकप्रियता वाढीस लागेल, पत्रव्यवहार फलदायी होईल वरिष्ठांच्या मर्जीने अनेक कामे होतील. शुभ दिनांक १०–१३.

**महिलांना** : तब्येत सुधारून धावपळ कमी होईल.

**विद्यार्थ्यांना** : मन आनंदी राहील.

## तूळ : नोकरीत शुभदायक

भाग्यस्थानी गुरू असणे ही एक असामान्य अशी बाजू आहे. माणसाचे अल्पसामर्थ्य वाढवणे व भविष्यात घडणाऱ्या घटनांची पूर्ण जाणीव होणे असे विलक्षण कार्य भाग्यस्थानी असलेल्या गुरूकडून होते. तुम्ही जर उपासना करीत असाल तर, त्याला अनुकूल साथ मिळणार आहे. साक्षात्कार होईल. एरवी इतर बाबतीत आठवडा फारच अनुकूल आहे. नोकरीत समाधान मिळेल. स्थलांतर वा स्थित्यंतर होऊ शकेल. धंद्यात नवा प्रवाह आणू शकाल. भागीदारीत एखादा नवा व्यवसाय सुरू होऊ शकेल. कर्जातून मुक्त होण्यासारख्या योजना कार्यान्वित होतील. सहकार्य व मदत मिळेल. तुमच्यापैकी ज्यांचे विवाह ठरलेले असतील वा ठरावयाचे असतील त्यांना अपेक्षापूर्तीचा उच्चांक मिळेल. शुभ दिनांक ११–१३.

**महिलांना** : कलाक्षेत्रात प्रसिद्धी व पैसा मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : श्रमाचे फळ पदरात पडेल.

## वृश्चिक : अर्थलाभ

तुमच्या बाबतीत अनुकूल बदल होत आहे व त्याचे प्रत्यंतर याच वेळी येऊ लागेल. आठवा गुरू आहे. रवी दिनांक ९ ला सहावा होत आहे. प्रगतीच्या आड येणारे सर्व अडथळे दूर होतील. लोकांचे सहकार्य मिळणार आहे. धंद्यात नवे पर्व सुरू होईल. स्वतंत्र धंदा अवश्य करा. पैशाचे व तांत्रिक असे सहकार्य मिळू शकेल. नोकरीत वरिष्ठांबरोबर संयमाने वागा. त्यामुळे फायदा होईल. अपेक्षा सफल होतील. ज्यांना नोकरीत कायम केले नसेल त्यांना नोकरीत कायम करण्यात येईल. अनिश्चित परिस्थिती संपेल. प्रवासाला अत्यंत उपकारक असा आठवडा आहे. विदेशी जाण्याचे स्वप्न साकार होईल. यात्रा सहलीचेदेखील स्वप्न साकार होईल. खर्चात वाढ होईल. परंतु पैसाही मिळेल. निराशा व अनुत्साह कमी होईल. शुभ दिनांक १३–१४.

**महिलांना** : राहणीत आकर्षक बदल होईल.

**विद्यार्थ्यांना** : करमणुकीवर पैसा उडवाल.

## धनु : संधी मिळेल

राशिस्वामी गुरू सहावा झाला आहे. तो काही तसा चांगला नाही. तरी पण दशमस्थानावर त्याची दृष्टी असल्यामुळे प्रत्यक्षात तुमचे नुकसान असे काहीही होणार नाही. उद्योगात अगर नोकरीत नवी संधी मिळणार आहे. बदली अगर कामात बदल असे काही तरी होऊ शकेल. प्रवासास अचानक जावे लागेल. अनेक क्षेत्रात नवे संबंध प्रस्थापित होण्याची शक्यता आहे. दुरावलेले मित्र पुन्हा सहवासात येतील. आर्थिक ताण कमी होईल. तुम्ही लेखक असाल तर, ग्रंथ प्रकाशनाची योजना दृष्टिपथात येईल. उपासना उपयोगी पडेल. मात्र आध्यात्मिक यश यावे तेवढे येणे कठीणच. विवाहाचा प्रश्न थोडा लांबणीवर टाका. बेकारांना आश्वासन मिळेल. शुभ दिनांक १०–११.

**महिलांना** : यात्रा, सहल घडू शकेल. पैसा मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : अभ्यासात काळजी घेणे आवश्यक.

## मकर : योजनांना चालना

गुरू पाचवा ही एक तुमच्याबाबतीत समाधान देणारी गोष्ट आहे, परंतु उपासना, आध्यात्मिक साधना अगर अभ्यास यांखेरीज आज तरी त्याचा म्हणावा तसा उपयोग होणे कठीण आहे. दुसरा मंगळ धनस्थिती बरीच सुधारून देणार आहे. व्यापार व उद्योग प्रगतीच्या दिशेने गतिमान होतील. नव्या योजना आखून काही पावले टाकाल तर, त्याला अनुकूल साथ मिळेल. अनेकांचे सहकार्य मिळेल. तोटा भरून निघेल. उद्योगाला कर्ज अगर इतर मार्गाने पैसा उभा करण्यात यश मिळेल. नोकरीच्या बाबतीत सारी अनुकूलता राहील. मात्र हेतू प्रामाणिक ठेवूनच वागा. नाही तर एखादे जुने प्रकरण निघून त्यात अडकून जाण्याची शक्यता नाकारू नका. कौटुंबिक स्वास्थ्य मिळेल. प्रवासाला अनुकूलता नाही. शुभ दिनांक १२–१३.

**महिलांना** : नोकरीत बहुमान मिळेल. आरोग्य सुधारेल.

**विद्यार्थ्यांना** : परीक्षेत पास व्हाल.

## कुंभ : सामर्थ्य वाढेल

राशीतच रवि–मंगळ आहेत. दिनांक १३ रोजी रवी दुसरा होणार आहे. तोपर्यंत त्याचे उत्तम सहकार्य आहे. यावेळी अंतरिक्षातील सर्वांत सामर्थ्यवान रास म्हणजे कुंभच होय. चौथा गुरू नोकरीत काही तरी अनुकूल घडवणार आहे. बक्षीस, प्रमोशन मिळणे शक्य आहे. ज्यांच्या नोकऱ्या कायम झाल्या नसतील त्यांच्या नोकऱ्या कामय होतील. व्यापारात लाभ होईल. व्यापारात नवीन गुंतवणूक करता येईल. इंजिनियरिंग उद्योग, रबर, तेले, साबण या उद्योगांत भरपूर लाभ होईल. तुम्ही रेसमध्ये यावेळी तुमचे नशीब उघडू शकाल. कर्जातून मुक्त होण्यासाठी जे प्रयत्न कराल त्यात यश येईल. परदेशी प्रवासाचा योग आहे. तुमच्यापैकी ज्यांचे विवाह अजून झाले नसतील त्यांचे विवाह पार पडतील. शुभ दिनांक १०–१३.

**महिलांना** : नोकरीच्या प्रयत्नांना यश लाभेल.

**विद्यार्थ्यांना** : डोके शांत ठेवण्याची गरज आहे.

## मीन : अनुकूल वातावरण

मंगळ बारावा व दि. १३ पर्यंत रवी दुसरा तर गुरू तिसरा अशी एकंदर सध्याची तुमची ग्रहांची परिस्थिती आहे. तरी पण हा आठवडा प्रतिकूल जाणार नाही याची खात्री बाळगा. राशिस्वामी गुरू तिसरा आहे. तो सर्व प्रकारच्या अडचणींतून मार्ग काढायला मदत करणार आहे. यावेळी कोणत्याही नव्या उद्योगाला मात्र सुरुवात करू नका. वाजवीपेक्षा जास्त खर्च होणार आहे. कर्जाची व्यवस्था होईल. परंतु त्यासाठीदेखील अनावश्यक खर्च होईल. तुमची नोकरी कायम होईल. चालू नोकरीत कामाचा बोजा वाढणार असला तरी, नवी जबाबदारी मुद्दाम स्वीकारा. त्याचा आगामी काळात भरपूर लाभ होईल. बेकारांना त्रास नाही. धंद्यात जास्त लक्ष घालणे श्रेयस्कर आहे. शुभ दिनांक ११–१४.


**महिलांना** : संसारात नावीन्य येईल. प्रेम वाढेल.

**विद्यार्थ्यांना** : फक्त अभ्यासावर लक्ष केंद्रित करा.

☐

डोले पीक सर्वदूर ऽऽ..
सुख समृद्धी भरपूर..

अैका हो अैका . . . ऽऽऽ . . .
पिकं भरघोस होणार . . .
अन् डोलू लागणार . . .
व्हय, व्हय - आणि आपणही नाचणार
पण कवा ?
पिकांना लागणारी खते भरपूर
प्रमाणात मिळतील तवा.
खते - मग ती जमिनीतून देण्याची असोत
अथवा पिकावर फवारण्याची असोत - भरपूर
प्रमाणात द्या. त्या साठी जर आर्थिक
सहाय्याची जरुरी असेल तर आमच्या
जवळच्या शाखेस भेट द्या.



बँक ऑफ महाराष्ट्र
११७७, बुधवार पेठ, पुणे ४११००२.

जेथे अर्थसहाय्याची खरी जरूरी। तेथे 'बँक ऑफ महाराष्ट्र' लावी हजेरी।

PRAJAKTA